इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – १४० ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

रांजणगावचा
॥ श्रीमहागणपती ॥
गणपती बाप्पा मोरया

वक्रतुण्ड महाकाय सुर्यकोटि समप्रभः । निर्विघ्नं कुरुमेदेव सर्वकार्येषुसर्वदा ।।

शनिवार,ता.१९ सप्टेंबर २०२६ | भाद्रपद शु. ८ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००



इचलकरंजी – चांदणी चौक येथील नवरत्न टायगर युवक मंडळाची सिंहासनारूढ भव्यदिव्य अशी गणेशमूर्ती. (छाया.– छोटूसिंग)

## टीईटी पेपरफुटी प्रकरणी
# ३,५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल

■ ठाणे,ता.१८–

**महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणी ठाणे पोलिसांनी १८ आरोपींविरुद्ध न्यायालयात सुमारे ३,५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे, तर दोन आरोपी अद्याप फरार आहेत.**

ठाणे पोलिसांच्या तपासातून एक धक्कादायक बाब समोर आली आहे. परीक्षेच्या अवघ्या दोन दिवस आधी आग्रा येथील एका छपाईखान्यातून प्रश्नपत्रिका बुटांच्या तळव्याखाली लपवून बाहेर काढण्यात आली होती. या कामासाठी छपाईखान्यातील कर्मचाऱ्यांना प्रत्येकी आठ हजार रुपये देण्यात आले होते.




सध्या १८ आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तपासादरम्यान समोर येणाऱ्या नवीन तथ्यांच्या आधारे पोलीस नंतर पूरक दोषारोपपत्र दाखल करू शकतात. भिवंडीतील एका स्थानिक रहिवाशाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे छापा टाकून (पान २ वर)

# तृणमूलच्या दोन्ही गटांना नवी ओळख
## ममता गटाला 'फुटबॉलपटू', तर रॉय गटाला 'लिफाफा'

■ नवी दिल्ली,ता.१८–

**तृणमूल काँग्रेसमधील ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाला शुक्रवारी 'ममता अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस' हे नाव देण्यात आले. तर त्यांचे प्रतिस्पर्धी अरूप रॉय यांच्या नेतृत्वाखालील गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' हे नाव देण्यात आले आहे.**



पश्चिम बंगालमधील दोन विधानसभा मतदारसंघांत ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीपूर्वी हा निर्णय घेण्यात आला. निवडणूक आयोगाच्या आदेशात ही माहिती देण्यात आली आहे.आदेशानुसार, ममता गटाला निवडणूक चिन्ह म्हणून 'फुटबॉलपटू' हे चिन्ह देण्यात आले आहे. तर अरूप रॉय यांच्या नेतृत्वाखालील गटाला 'लिफाफा' हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने गुरुवारी रात्री अंतरिम आदेश जारी केला होता. अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस (एआयटीसी) (पान २ वर)

### पाठिंबा दिलेल्या काँग्रेस उमेदवाराला अटक

प.बंगालच्या राजकारणात अनेक घडामोडी पहायला मिळत आहेत. नंदीग्राम पोट निवडणुकीतील ममता बॅनर्जींच्या गटाच्या उमेदवार संचिता प्रधान (डे) यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. यामुळे ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस उमेदवार मिलन प्रधान यांना पाठिंबा जाहीर केला. दरम्यान, पश्चिम बंगाल पोलिसांनी काँग्रेस उमेदवार मिलन प्रधान यांना एका जुन्या खून प्रकरणात अटक केल्यामुळे खळबळ उडाली आहे.

# शहापूरमध्ये पाच लाखाचे एमडी ड्रग्ज जप्त

■ इचलकरंजी,ता.१८–

**एम.डी.सदृश्य अंमली पदार्थाची विक्री करण्यास आलेल्या एकाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा कोल्हापूर व शहापूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत अटक केली. पिंटू उर्फ धनाजी पांडुरंग जाधव (वय ३४ रा. कारंडे मळा शहापूर) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून पोलिसांनी २८ ग्रॅम वजनाचा ५ लाख ४ हजार रुपयांचा अंमली पदार्थ व १५ हजाराचा मोबाईल मिळून ५ लाख १९ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर ज्याच्याकडून जाधव याने अंमली पदार्थ खरेदी केला तो सिध्दार्थ बडे (रा. इचलकरंजी) हा मिळून आलेला नाही.**




### दोघांवर गुन्हा दाखल; एकास अटक

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, शहापूर परिसरातील शहापूर ओढा ते आर.के.नगरकडे जाणाऱ्या रोडवर एकजण अंमली पदार्थ विक्रीसाठी (पान २ वर)

## राज्यात दुष्काळ जाहीर करावा
### शरद पवारांची मागणी

■ मुंबई,ता.१८–

**राज्यात अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**

राज्यातील सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद यांसारखी पिके पावसाअभावी करपून गेली (पान २ वर)

## परतीचा पाऊस हजेरी लावणार

■ मुंबई,ता.१८–

**राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली असली, तरी अनेक भाग अद्यापही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, बंगालच्या उपसागरातील हवामानातील बदलामुळे राज्यात पुन्हा पावसाचे आगमन होण्याची शक्यता आहे.**

येत्या २० ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळण्याची शक्यता असून, विशेषतः अंतर्गत भागातही (पान २ वर)

## नाम.शिंदेंना दोन तासांनी मोबाईल परत मिळाला

■ सातारा,ता.१८–

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लंडनचा दौरा आटोपून १२ सप्टेंबरला मध्यरात्री २ वाजता मुंबई विमानतळावर उतरताना मोबाईल विमानातच विसरले अशी माहिती सूत्रांनी दिली होती.**

घरी परतल्यानंतर शिंदेंना (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | १०२.९८ |
| राधानगरी | ८.३६ | ०८.३४ |
| तुळशी | ३.४७ | ०३.४७ |
| वारणा | ३४.४० | ३४.४० |
| काळम्मावाडी | २५.३९ | २५.३९ |
| कासारी | २.७७ | २.७७ |
| कडवी | २.५२ | २.५० |
| कुंभी | २.७२ | २.७० |
| पाटगाव | ३.७२ | ३.७२ |
| चिकोत्रा | १.५२ | १.४१ |
| चित्री | १.८९ | १.८९ |
| जंगमहट्टी | १.२२ | १.२२ |
| घटप्रभा | १.५६ | १.५५ |
| जांबरे | ०.८२ | ०.८२ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.२४ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |
| कोदे.ल.पा. | ०.२१ | ०.२१ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५३८०० रु. | २३८५०० रु. |

अंडी ६१० रुपये शेकडा

# निपाणीत युवकाचा निर्घृण खून

■ निपाणी,ता.१८(प्रतिनिधी)

**एकमेकांकडे बघण्याच्या कारणातून २६ वर्षीय युवकाचा धारदार गुप्तीने वार करून खून करण्यात आला. शहरातील जत्राट वेस परिसरातील चर्मकार गल्लीमध्ये सदरची घटना गुरूवारी रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान घडली. अभिषेक अनिल बामणे (वय २६, रा. चर्मकार गल्ली) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. गणेश चतर्थी उत्सवाच्या काळात खूनाची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.**



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मयत अभिषेक व साईनाथ रामनाथ बामणे यांच्यात गेल्या महिनाभरापासून वैर निर्माण झाले होते. त्यांच्यात एकमेकांना बघून घेण्याची भाषा सुरू होती. गुरूवारी रात्री चर्मकार गल्लीतील खंडोबा मंदिर परिसरात महिलांचा गौराई खेळ सुरू होता. यावेळी अभिषेक, लहान भाऊ रोहण बामणे व त्यांचा मित्र रोहण घट्टेगीरी तेथे आले. यावेळी संशयीत आरोपीचे वडिल रामनाथ बामणे यांनी तेथे येवून अभिषेक व इतरांना जाण्यास सांगितले.

यावेळी अभिषेक बरोबर असलेले रोहण घट्टेकरी, शुभम बामणे व रामनाथ (पान २ वर)

# कणेरीवाडीत अफू पावडर साठा जप्त

■ कोल्हापूर,ता.१८ (प्रतिनिधी)–

**करवीर तालूक्यातील कणेरीवाडी येथील बालाजीनगरमध्ये अफूची पावडर करून विक्री करण्यासाठी साठा करणाऱ्या राजस्थानी युवकाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली. त्याच्याकडून सुमारे सात किलो अफूची तयार पावडर आणि इतर साहित्य असा एकूण एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

### राजस्थानच्या युवकाला अटक

सागरराम भागीरथराम डारा (वय ३०, सध्या रा.बालाजीनगर, कणेरीवाडी, मूळ रा.आरटीया, राजस्थान) असे (पान २ वर)

## विश्वास सपकाळ स्लोव्हाकचे राजदूत

■ सांगली,ता.१८(प्रतिनिधी)–


**सांगलीच्या मातीत जन्मलेले आणि संपूर्ण शिक्षण सांगलीत पूर्ण केलेले १९९८ बॅचचे भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी विश्वास सपकाळ यांची स्लोव्हाक प्रजासत्ताकातील भारताचे पुढील राजदूत म्हणून नियुक्ती झाली आहे.**

सध्या ते पेरू प्रजासत्ताकातील भारताचे राजदूत म्हणून कार्यरत आहेत. (पान २ वर)

# ऑस्करसाठी 'गोंधळ' चित्रपटाची निवड

■ मुंबई,ता.१८–

**महाराष्ट्र सिनेमा सृष्टीसाठी एक अभिमानास्पद बातमी आहे. यामुळे मराठी सिने सृष्टीला एक मोठा सन्मान मिळाला आहे. मराठी चित्रपट गोंधळची २०२७ च्या ऑस्करसाठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड झाली आहे, अशी घोषणा भारतीय चित्रपट महासंघाने शुक्रवारी केली.**




या चित्रपटाचे दिग्दर्शन, लेखन आणि निर्मिती संतोष दवाखर यांनी केली आहे. हा चित्रपट १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी प्रदर्शित झाला. संतोष दावखर यांनी लिहिलेला आणि दिग्दर्शित केलेला हा चित्रपट ग्रामीण महाराष्ट्रात घडतो आणि एका नवविवाहित जोडप्याच्या पारंपरिक विधींच्या रात्रीभोवती फिरतो.

निवड समितीचे अध्यक्ष पी. शेषाद्री यांनी सांगितले की, २०२७ च्या ऑस्करसाठी ३३ चित्रपटांच्या शॉर्टलिस्टमधून या चित्रपटाची निवड करण्यात आली आहे. २०२७ च्या ऑस्कर पुरस्कारांसाठी एकूण ३३ चित्रपट सादर करण्यात आले होते, त्यापैकी १४ हिंदी होते. मराठी, (पान २ वर)

### हास्यतुषार –सुरेंद्र दास



विरोधकांच्या विषयी जरा सुद्धा ममत्व नाही तर नामो निशाण सुद्धा राहतकी नाही याची भीती वाटू लागली आहे..!



(पान १ वरून)

## परतीचा पाऊस हजेरी लावणार

पावसाचा जोर वाढू शकतो. येत्या १९ ते २२ सप्टेंबर दरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. २१ सप्टेंबर रोजी नाशिकमध्येही मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांतही मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २२ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात पाऊस कायम राहण्याची शक्यता आहे. तसेच २१ ते २८ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस होण्याची शक्यता असून, मान्सूनच्या अखेरच्या टप्प्यात होणाऱ्या या पावसामुळे दीर्घकाळ कोरड्या हवामानाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळू शकतो.

## निपाणीत युवकाचा निर्घृण खून

यांच्यात वाद सुरू झाला. तेव्हा साईनाथचा लहान भाऊ विशाल तेथे गेल्याने वाद आणखी वाढला. वाद वाढत गेल्याने साईनाथने आपल्या गाडीत असलेली गुप्ती आणली आणि अभिषेकच्या पोटात खूपसली. यावेळी अभिषेक रक्ताच्या थारोळ्यात पडला. यावेळी जवळ असलेल्या रोहण व इतरांनी अभिषेकला एका खाजगी रूग्णालय घेवून गेले. पण तेथे उपचार होत नसल्याने सरकारी महात्मा गांधी रूग्णालयात दाखल केले. मात्र उपचार्थ दाखल करताच त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त जिल्हा पोलिसप्रमुख आर.बी.बसरगी, डीवायएसपी गोपाळकृष्ण गौडर, सीपीआयबी एस. तळवार, बसवेश्वर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक रमेश पोवार, ग्रामीणचे शिवराज नाईकवाडी यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी जादा पोलीस कुमक मागवित या ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला. याप्रकरणी मयताचा भाऊ शुभम बामणे यांनी बसवेश्वर चौक पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार संशयीतांवर बसवेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

## ऑस्करसाठी 'गोंधळ' चित्रपटाची निवड

तेलगू आणि गुजरातीमध्ये प्रत्येकी चार चित्रपट होते. तीन तमिळमध्ये, तर मल्याळम आणि नागामीमध्ये प्रत्येकी एक चित्रपट होता. यामध्ये एका मूकपटाचाही समावेश होता. तथापि, गोंधळची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड झाली.

## नाम. शिंदेंना दोन तासांनी मोबाईल परत मिळाला

आपला मोबाईल विमानात राहिल्याचे लक्षात आले होते. त्यानंतर दोन तासांनी एकनाथ शिंदेंचा मोबाईल मिळाला. मात्र, हे वृत्त शिंदे यांच्या कार्यालयाने आणि स्वत: एकनाथ शिंदे यांनी फेटाळले आहे.

एकनाथ शिंदे यांचा मोबाईल ब्रिटिश एअरवेजच्या विमानात विसरल्याचे लक्षात आल्यानंतर ब्रिटिश एअरवेजच्या सुरक्षा कार्यालयाशी संपर्क साधण्यात आला. अखेर पहाटे चारच्या सुमारास पोलिसांनी एकनाथ शिंदेंचा मोबाईल शोधून काढला. मात्र सूत्रांच्या माहितीचे शिंदेंच्या कार्यालयाने खंडन केले आहे.

## ३,५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल

पोलिसांनी ही फुटलेली प्रश्नपत्रिका हस्तगत केल्याची माहिती पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांनी प्रसारमाध्यमांना दिली. पेपरफुटीच्या प्रकरणांच्या सुनावणीसाठी फास्ट-ट्रॅक न्यायालयांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे या प्रकरणातील कायदेशीर प्रक्रिया आणि निकाल तुलनेने लवकर लागतील, अशी अपेक्षा आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार बिजेंद्र गुप्ता हा आहे, जो पूर्वी एका कोचिंग क्लासमध्ये शिक्षक होता. त्याने आग्रा येथील 'महिम पत्रन प्रायव्हेट लिमिटेड' या छपाईखान्यातील दोन विद्यमान आणि एका माजी कर्मचाऱ्याला पैशांचे आमिष दाखवून आपल्या कारस्थानात सामील करून घेतल्याचा आरोप आहे. या कर्मचाऱ्यांनी टीईटीची प्रश्नपत्रिका आपल्या बुटांच्या तळव्याखाली लपवून छपाईखान्यातून बाहेर काढली आणि ती बिजेंद्र गुप्तापर्यंत पोहोचवली. त्यानंतर, पेपरफुटीच्या जाळ्याशी संबंधित इतर व्यक्तींनी पैशांच्या बदल्यात प्रश्नपत्रिका पुढे पसरवण्यास आणि ती परीक्षार्थींपर्यंत पोहोचवण्यास मदत केली. बिहारमधून हस्तगत केलेली मूळ प्रश्नपत्रिका आणि आरोपींमधील आर्थिक व्यवहार हे या तपासातील अत्यंत महत्त्वाचे पुरावे मानले जात आहेत.

पोलिसांनी बिजेंद्र गुप्ताच्या एका नातेवाईकाच्या बिहारमधील घरातून मूळ प्रश्नपत्रिका जप्त केली आणि त्यानंतर गुप्ताला अटक केली. पेपरफुटीची बाब उघडकीस आल्यानंतर २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती.




क्रांती कला क्रीडा मंडळ आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराप्रसंगी घेतलेले छायाचित्र. (छाया.-गजानन खोत)

## तारदाळ क्रांती मंडळाच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

■ तारदाळ,ता.१८(वार्ताहर)-

**क्रांती कला क्रीडा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.**

क्रांती कला क्रीडा मंडळाचे आधारस्तंभ कै.एकनाथ शिंदे यांच्या स्मरणार्थ आयोजित रक्तदान शिबिरामध्ये युवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. शिबिरासाठी हिंदरत्न प्रकाश बापू पाटील ब्लड सेंटर सांगली यांच्या वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# रशियाशी व्यापारावर तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप नको

## चीनचा अमेरिकेला स्पष्ट संदेश

■ बीजिंग,ता.१८-

**चीनने गुरुवारी रशियन तेल आणि वायूच्या खरेदीवर शुल्क (टॅरिफ) लावण्याच्या अमेरिकेच्या 'लाँग-आर्म ज्युरिस्डिक्शन'च्या प्रयत्नाला विरोध केला. 'लाँग-आर्म ज्युरिस्डिक्शन' म्हणजे एखाद्या देशाने आपल्या अधिकारक्षेत्राबाहेरील व्यवहारांवरही कायदे लागू करण्याचा प्रयत्न करणे. चीनने स्पष्ट केले की, इतर देशांसोबतच्या त्याच्या सामान्य व्यापार आणि आर्थिक सहकार्यामध्ये कोणत्याही तिसऱ्या देशाने हस्तक्षेप किंवा दबाव आणू नये.**

अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने 'लिंडसे ओ. ग्राहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट २०२६' हे विधेयक मंजूर केले आहे. या कायद्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रशियावर निर्बंध लादण्यास तसेच भारत आणि चीनसारख्या रशियाच्या प्रमुख व्यापार भागीदारांवर मोठे शुल्क लावण्याचा अधिकार मिळू शकतो.या विधेयकाबाबत विचारले असता, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी सांगितले की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची मंजुरी नसलेल्या अशा कोणत्याही कारवाईला चीनचा विरोध आहे.

गुओ जियाकुन म्हणाले की, चीन इतर देशांसोबत समानता आणि परस्पर लाभाच्या तत्त्वावर सामान्य आर्थिक आणि व्यापारिक सहकार्य करतो. चीन 'लाँग-आर्म ज्युरिस्डिक्शन' आणि एकतर्फी निर्बंधांना विरोध करतो. अशा कारवायांना आंतरराष्ट्रीय कायद्यात कोणताही आधार नसतो आणि त्यांना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची मंजुरीही मिळालेली नसते.

# पेपरफुट रोखण्यासाठी एनटीएमध्ये सुधारणा आवश्यक-सुप्रीम कोर्ट

■ नवी दिल्ली,ता.१८-

**नीट परीक्षेतील वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटना रोखण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा संस्थेची (एनटीए) व्यवस्था संस्थात्मकदृष्ट्या अधिक सक्षम आणि स्थायी करण्यावर सर्वोच्च न्यायालयाने भर दिला आहे. या व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिल्लीतील एनटीएच्या नव्या आणि आधुनिक कार्यालयाला भेट देणार आहेत.**

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आराधे यांच्या खंडपीठाने दिल्लीतील मिंटो रोड येथील एनटीए कार्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील व्यवस्था, मनुष्यबळ आणि संस्थेची कार्यक्षमता यांचा आढावा घेण्याचे जाहीर केले. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांनी सांगितले की, एनटीएची यंत्रणा योग्य पद्धतीने कार्यरत आहे की नाही, तसेच तेथील मनुष्यबळ आणि इतर व्यवस्थांची स्थिती काय आहे, हे पाहण्यासाठी न्यायालयाचे न्यायमूर्ती स्वतः कार्यालयाला भेट देतील.

केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात उपस्थित असलेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्याशी संवाद साधताना खंडपीठाने एनटीएच्या नवनिर्मित आणि आधुनिक सुविधेची पाहणी करण्याची इच्छा व्यक्त केली.

पेपरफुटीच्या घटना रोखण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना पुरेशा ठरणार नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. एनटीएची संपूर्ण व्यवस्था स्थायी आणि संस्थात्मक स्वरूपाची असणे आवश्यक असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले.

**नंदन नीलेकानी यांच्या समितीचा अहवाल लवकरच**

नीट परीक्षेतील संरचनात्मक सुधारणांसाठी नंदन नीलेकानी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली उच्चस्तरीय समिती या महिन्याच्या अखेरपर्यंत आपला पहिला अंतरिम अहवाल सादर करू शकते, अशी माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली.

# समाजाच्या प्रगतीसाठी सत्ता काबीज करणे गरजेचे - प्रा.पांचाळ.

■ छत्रपती संभाजीनगर,ता.१८(प्रतिनिधी)-

**आगामी काळात सुतार, लोहार, शिल्पकार, सोनार, तांबट या अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याकडे सत्ता असणे आवश्यक आहे. सत्ता मिळवण्यासाठी आपण समाजकारणाबरोबरच राजकारण केले पाहिजे आणि सत्तेत सहभागी झाले पाहिजे, असे प्रतिपादन विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ यांनी केले.**




विश्वकर्मा मंदिरात आयोजित मेळाव्याप्रसंगी दिपप्रज्वलन करताना मान्यवर.

विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने श्री क्षेत्र वेरूळ येथील विश्वकर्मा मंदिराच्या प्रांगणात आयोजित समाज मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी प्राथमिक शिक्षक भाऊसाहेब राऊत, युवा उद्योजक पवन शेटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण लाटेकर, पुरोगामी चळवळीचे पुरस्कर्ते विष्णू गरुड, साहित्यिक चंद्रकांत पोतदार यांना समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी राजेश नागपुरे, पराग अहिरे, अमित भुईगळ, ॲड. डॉ. अरुण जाधव, राजेंद्र पातोडे यांचीही भाषणे झाली.

कार्याध्यक्ष अरुण भालेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शुभदा धामापूरकर, भगवान राऊत, प्रसाद गडकर यांनी पुरस्कारार्थींच्या सन्मानपत्राचे वचन केले. सरचिटणीस संजय सुतार व सचिव विलास पवार यांनी सूत्रसंचालन केले. राजकुमार राऊत यांनी आभार मानले.

याप्रसंगी श्री विश्वकर्मा मंदिराचे पुजारी महेंद्र बापूजी, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, युवा आघाडीचे नेते अमित भुईगळ, वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव, उद्योजक पराग अहिरे, संघटनेचे प्रदेशाध्यक सचिन सुतार, कार्याध्यक्ष अरुण भालेकर, राज्य उपाध्यक्ष गोपाल राऊत, महिला आघाडीच्या कार्याध्यक्षा शुभदाताई धामापूरकर, उपाध्यक्ष धनराज वेलणकर यांचेसह पदाधिकारी उपस्थित होते.



विश्वास सपकाळ यांचे अभिनंदन करताना केंद्रीय जीएसटीचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र मेढेकर व इतर.

## सपकाळ स्लोव्हाकचे राजदूत

(पान १ वरून)

यापूर्वी रशिया, अमेरिका, इजिप्त, फिजी आदी देशांत भारताचे प्रतिनिधित्व करत त्यांनी उल्लेखनीय राजनैतिक अनुभव मिळविला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सांगलीसह महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. सांगली भेटीदरम्यान नवनियुक्त राजदूत विश्वास सपकाळ यांचे विविध मान्यवरांनी अभिनंदन केले. यावेळी केंद्रीय जीएसटीचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र मेढेकर, उपजिल्हाधिकारी रवींद्र खाडे, पोलीस उपअधीक्षक के. एन. पाटील, उपजिल्हाधिकारी मुद्रांक धनंजय जोशी, उपसंचालक वित्त सेवा प्रकाश कोळेकर, उपायुक्त राज्य जीएसटी किरण रसाळ, उपअभियंता संग्रामसिंह हराळे-भोसले तसेच एकलव्य अकॅडमीचे संचालक शहाजी शिंदे आदी उपस्थित होते.



अटक केलेल्या संशयितासह पोलिस अधिकारी व कर्मचारी.

## पाच लाखाचे एमडी ड्रग्ज जप्त

(पान १ वरून)

येणार असल्याची माहिती गोपनीय सूत्रांकडून मिळाली होती. प्राप्त माहितीवरुन शहापूर पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास सापळा रचून पिंटू उर्फ धनाजी जाधव याला ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेता त्याच्याकडील एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये पांढरट बारीक खड्याप्रमाणे दिसणार एम.डी.सदृश्य अंमली पदार्थ मिळून आला. त्याचे वजन २८ ग्रॅम असून बाजारभावाप्रमाणे त्याची किंमत प्रती ग्रॅम १८ हजार रुपये असल्याचे समजले. त्यानुसार ५ लाख ४ हजार रुपयांचा हा अंमली पदार्थ व १५ हजाराचा एक मोबाईल असा ५ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन जाधव याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत हा अंमली पदार्थ त्याने सिध्दार्थ बडे याच्याकडून आणला असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी बडे याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. या प्रकरणी पिंटू उर्फ धनंजय जाधव व सिध्दार्थ बडे या दोघांवर शहापूर पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा कोल्हापूर पथकातील पोऊनि सचिन चंदन, पोहेकॉ परशुराम गुजरे, प्रदीप पाटील, सत्यजित तानुगडे, महेंद्र कोरवी, संदीप गायकवाड, सुशिल पाटील आणि शहापूर पोलिस ठाण्याकडील सपोनि सुरेखा गाताडे, अविनाश मुंगसे, संजीव कराड, पोकॉ रोहित डावाळे, सतिश कुंभार यांच्या पथकाने केली.

# राज्यात दुष्काळ जाहीर करावा

(पान १ वरून)

असून शेतकरी, शेतमजूर आणि पशुधन मोठ्या संकटात सापडले आहे. या संदर्भात पाठवलेल्या पत्रात एकूण ९ मागण्यांचा समावेश आहे.

शरद पवार यांनी प्रमुख नऊ मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये राज्यातील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, औपचारिक निकषांची प्रतीक्षा न करता तत्काळ दुष्काळ जाहीर करण्यात यावा. गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांना तातडीने दुष्काळसदृश परिस्थितीग्रस्त घोषित करून दुष्काळी सवलती लागू करण्यात याव्यात.

शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये मदत जाहीर करावी. तसेच, शेतमजूर कुटुंबांना देखील प्रत्येकी २५ हजार रुपये विशेष मदत देण्यात यावी. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी योजनेची तातडीने अंमलबजावणी करून तत्काळ पीककर्ज उपलब्ध करून देण्यात यावे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहनपर अनुदान ५० हजारांवरून १ लाख रुपये करण्यात यावे. तसेच, २०२५-२६ मध्ये पीककर्ज घेऊन यंदा थकीत झालेल्या शेतकऱ्यांचाही कर्जमाफी योजनेत समावेश करण्यात यावा.

एक रुपयात पीकविमा योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करून शेतकरी हिताचे पूर्वी वगळलेले सर्व ट्रिगर पूर्वलक्षी प्रभावाने लागू करून शेतकऱ्यांना पीक विम्याचे संरक्षण द्यावे. तसेच, गेल्यावर्षी अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी जाहीर करण्यात आलेली हेक्टरी १७ हजार रुपयांची पीकविमा मदतही तत्काळ वितरित करावी. यासह अन्य मागण्यांचा समावेश आहे.

शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण जनजीवनावर निर्माण झालेल्या या गंभीर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, वरील मागण्यांवर मुख्यमंत्री महोदय सकारात्मक निर्णय घेत तातडीने आवश्यक उपाययोजना करतील, अशी अपेक्षा शरद पवार यांनी पत्राद्वारे व्यक्त केली आहे.

# कणेरीवाडीत अफू पावडर साठा जप्त

(पान १ वरून)

अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी जिल्ह्यात अमली पदार्थांचा साठा व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांनी पथके तयार करून अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, सहायक पोलीस निरीक्षक सागर वाघ यांच्या पथकातील पोलीस अंमलदार प्रविण पाटील यांना कणेरीवाडी येथील बालाजीनगरमध्ये एका खोलीत अफूची पावडर करून विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी बालाजी नगर मधील एका इमारतीतील खोलीवर छापा टाकला.

झडती दरम्यान सागरराम डारा याच्याकडे सुमारे सात किलो वजनाची अफूची तयार पावडर आणि इतर साहित्य आढळून आले. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त करून डारा याला ताब्यात घेतले. याप्रकरणी गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अफूचा साठा त्याने कोणाकडून आणला, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास गोकुळ शिरगाव पोलीस करीत आहेत.

ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक सागर वाघ, पोलीस अंमलदार प्रविण पाटील, दिपक घोरपडे, अशोक पोवार, सतीश सूर्यवंशी आणि संजय हुंबे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## आप्पासो डपाले यांचे निधन

तारदाळ,ता.१८(वार्ताहर)-



तारदाळ येथील सामाजिक कार्यकर्ते सुखनिवास डपाले यांचे वडील व प्रगतशील शेतकरी आप्पासो दादू डपाले (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सूना नातवंडे असा परिवार आहे.

## दुष्काळी परिस्थितीवर सर्वेक्षण सुरू-महसूलमंत्री

नागपूर,ता.१८-

पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना पिके करपण्याची चिंता सतावत असून, दुष्काळी परिस्थितीची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण सुरू केले असून, महसूल विभागाकडून पंचनामे करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत सर्व विभागांना दुष्काळी परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व विभागांकडून परिस्थितीचा आढावा घेतला जात असून महसूल विभागानेही पंचनाम्यांना सुरुवात केली आहे.

# तृणमूलच्या दोन्ही गटांना नवी ओळख


(पान १ वरून)

या नावाच्या वापरावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर आगामी पोटनिवडणुकीत दोन्ही गटांना पक्षाचे मूळ नाव वापरण्यास मनाई करण्यात आली होती. तसेच, पक्षाचे 'जोडा घासफूल', म्हणजेच दोन फुले आणि गवत असलेले पारंपरिक निवडणूक चिन्ह वापरण्यासही दोन्ही गटांना बंदी घालण्यात आली होती.

आयोगाने दोन्ही गटांना शुक्रवारी सकाळपर्यंत त्यांच्या पसंतीची नावे आणि निवडणूक चिन्हे सुचवण्याचे निर्देश दिले होते. एआयटीसीच्या मूळ नावाशी साधर्म्य असलेली नावे ठेवण्याची परवानगी दोन्ही गटांना देण्यात आली. मात्र, त्यांनी अपक्ष उमेदवार आणि नोंदणीकृत मात्र अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी उपलब्ध असलेल्या निवडणूक चिन्हांच्या यादीतील चिन्हांची निवड करणे आवश्यक होते.पश्चिम बंगालमधील पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील नंदीग्राम आणि मुर्शिदाबाद जिल्ह्यातील रेजीनगर विधानसभा मतदारसंघात ६ ऑक्टोबर रोजी पोटनिवडणूक होणार आहे. मतमोजणी ९ ऑक्टोबर रोजी होईल. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील टीएमसी गटाने शुक्रवारी निवडणूक आयोगाकडे नवीन निवडणूक चिन्हांचे पर्याय सुचवले होते.

निवडणूक आयोगाच्या १४ पानी अंतरिम आदेशात एक बाब स्पष्ट करण्यात आली होती. दोन्ही गटांना त्यांच्या अंतरिम नावांमध्ये मूळ पक्षाशी संबंधित दिसणारे कोणतेही चिन्ह किंवा शब्द वापरण्याची परवानगी होती. आयोगाने सांगितले की, दोन्ही गटांना समान संधी मिळावी तसेच त्यांचे अधिकार आणि हितसंबंध सुरक्षित राहावेत, यासाठी ही अंतरिम व्यवस्था करण्यात आली आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत ही व्यवस्था लागू राहणार आहे.

भावपूर्ण श्रध्दांजली!



श्री.आप्पासो दादू डपाले

श्री. आप्पासो दादू डपाले (वय ९०) यांचे शुक्रवार दि. १८/०९/२०२६ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना

बसवेश्वर राजा तरूण मंडळ, तारदाळ
समस्त डपाले परिवार, तारदाळ

* टिप : माती सावडणे-शनिवार, दि. १९/०९/२०२६ रोजी सकाळी ९ वाजता

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||



आमचे हितचिंतक,
उद्योगपती हाजी अजीज खान (शेठ)
यांचे गुरूवार, दि. १७/९/२०२६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हिच ईश्वर चरणी प्रार्थना!

• उमर फारूख हाजी महमद हनिफ लाटकर
• अनिस रियाज मुजावर
• जाफर रसुल मुजावर

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||



उद्योगपती हाजी अजीज खान (शेठ)

आमच्या संघटनेचे सदस्य,
उद्योगपती हाजी अजीज खान (शेठ)
यांचे गुरूवार, दि. १७/९/२०२६ रोजी दु:खद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हिच ईश्वर चरणी प्रार्थना..!

इचलकरंजी वजन काटे मालक संघटना
इचलकरंजी सर्व सदस्य



घरगुती गौरी–गणपतीची केलेली आकर्षक आरास. (छाया : सारंग दास)

# कृष्णा नदीत ७०० क्युसेसने पाण्याचा विसर्ग

## पाटबंधारे विभागाला आ. यड्रावकरांच्या सूचना

जयसिंगपूर ता १८(प्रतिनिधी)–

**कोरड्या पडलेल्या कृष्णा नदी पात्रात शेतकऱ्यांनी पाणी सोडण्याची मागणी आ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत आ.यड्रावकर यांनी पाटबंधारे विभागाला संपर्क साधून वारणा धरणातून कृष्णा नदीपात्रात ७०० क्युसेसने पाण्याचा विसर्ग करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कृष्णा नदीपात्रात लवकरच पाणी प्रवाहित होणार असून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**

गेल्या काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांना पाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. नदीकाठच्या नागरिकांमध्येही पाण्याबाबत चिंता व्यक्त होत होती.

नदीपात्रातील पाणीपातळी कमी झाल्याने तसेच पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके अडचणीत सापडली होती.या पार्श्वभूमीवर संबंधित शेतकऱ्यांनी आ.यड्रावकर यांच्याकडे कृष्णा नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी केली होती. वारणा धरणातून ७०० क्युसेसने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. हे पाणी शनिवारी सायंकाळपर्यंत नदीपात्रात पोहोचणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांना खरीप पिकांसाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

# घरगुती गौरी गणपतीचे आज विसर्जन

## प्रशासकीय,पोलीस यंत्रणा सज्ज

इचलकरंजी,ता.१८–

**मोठ्या उत्साहात गणरायाचे आगमन झाल्यानंतर पाच दिवसांच्या मुक्कामानंतर घरगुती गौरी गणपतीचे शनिवार ता.१९ सप्टेंबर रोजी विसर्जन केले जाणार आहे. श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी महानगरपालिकेची प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आली असून आयुक्त पल्लवी पाटील यांनी घरगुती श्री गणेश मूर्ती विसर्जनाच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना नियंत्रण अधिकारी तसेच सर्व विभाग प्रमुख यांना दिल्या.**

यावर्षी श्रीगणेश मूर्ती विसर्जन शहापूर खणीसह शहरातील विविध ४६ ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने ठेवण्यात येणाऱ्या कृत्रिम विसर्जन कुंडात करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. शहापूर खण येथील विसर्जन स्थळी तसेच गणेश मूर्ती कृत्रिम विसर्जन कुंड आणि निर्माल्य कुंड असलेल्या सर्व ठिकाणी गणेश मूर्ती संकलन करण्यासाठी तसेच मूर्ती वाहतूक करण्यासाठी दोन शिप्टमध्ये जवळपास ६०० पूर्णवेळ अधिकारी–कर्मचारी तसेच स्वयंसेवक यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये आरोग्य विभाग , बांधकाम विभाग, वाहन विभाग,



शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम कुंडाची व्यवस्था करण्यात आली आहे. (छाया : मयूर चिंदे)



पंचगंगा नदीघाटावर तयार करण्यात आलेले कृत्रिम तळे. (छाया : छोटूसिंग)

प्राथमिक शिक्षण विभाग,आपत्कालीन विभाग आणि अतिक्रमण विभाग त्याचबरोबर इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय यांचा समावेश आहे. पंचगंगा नदी घाट परिसरात लाईटची सोय तसेच कृत्रिम तलाव तयार करण्यात आला आहे.त्याचबरोबर शहापूर खण येथे विद्युत व्यवस्था तसेच सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर खणीमध्ये आकर्षक कारंजे सुरू करण्यात आले आहेत.

त्याचबरोबर १६ आयशर टेंपो,५ ट्रॅक्टर, २ यांत्रिक बोटी, २ रुग्ण वाहिका,१ अग्निशमन वाहन अशी यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात येणार आहे.तरी नागरिकांनी आपल्या घरगुती गणेश मूर्तींचे विसर्जन शहापूर खण येथे किंवा आपल्या घराजवळच्या कृत्रिम विसर्जन कुंडात करून पर्यावरण पूरक आणि आनंदी वातावरणात गणेशोत्सव साजरा करुन महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त पल्लवी पाटील यांनी केले आहे.



शहापूर खणीमध्ये लावण्यात आलेला आकर्षक कारंज्या.

### पोलीस यंत्रणाही सज्ज

**घरगुती गौरी गणपतीचे उद्या शनिवारी विसर्जन होत आहे.या पार्श्वभुमीवर पोलीस यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आली आहे.पंचगंगा नदी घाट परिसर,शहापूर खण परिसरात विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.शंहरातील विविध चौक तसेच प्रमुख मार्गावर पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे.**

# गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या ५९ जणांवर हद्दपारीची कारवाई

## २६ सप्टेंबरपर्यंत नो एन्ट्री : संबधितांना धाडल्या नोटींसा

इचलकरंजी,ता.१८–

**गणेशोत्सव काळात कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून येथील शहापूर पोलिसांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ५९ जणांवर २६ सप्टेंबरपर्यंत हद्दपारीची कारवाई केली आहे. त्यापैकी ४१ जणांना १४ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या कालावधीत तर १८ जणांना २० सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या कालावधीसाठी हद्दपार केले आहे.**

शहर परिसरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भव्य मंडप, विद्युत रोषणाई, विविध रुपातील विघ्नहर्त्या बाप्पांच्या मूर्ती आणि आकर्षक देखावे यामुळे उत्सवात कार्यकर्त्यांच्या आनंदाला पारावार राहत नाही.

अनंत चतुर्दशीला पारंपरीक वाद्ये आणि बाप्पांचा जयघोष करत मिरवणुकाही काढण्याची परंपरा आहे. त्यामुळे या उत्सवात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांकडून कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून दरवर्षी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांवर हद्दपारीच्या कारवाईसाठी प्रत्येक पोलीस ठाण्याकडून विभागीय दंडाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवला जातो. त्यानुसार शहापूर पोलिसांनी तब्बल ५९ जणांच्या हद्दपारीचा प्रस्ताव पाठवला होता. त्याला मंजुरी मिळाली आहे. पोलिसांनी संबधितांना हद्दपारीच्या नोटींसा धाडल्या आहेत.

# 'इन्स्टा रोड पॅचर' तंत्रज्ञानाने पॅचवर्क कामे सुरु



पॅचवर्कच्या शुभारंभप्रसंगी आम. राहुल आवाडे, महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या व इतर मान्यवर.

इचलकरंजी,ता.१८–

**गणेशोत्सवातील विसर्जन मिरवणूक मार्गावरील रस्त्यांवरील पॅचवर्क करण्याची गरज ओळखून आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते 'इन्स्टा रोड पॅचर' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पॅचवर्क कामाचा शुभारंभ शुक्रवारी करण्यात आला.**

इचलकरंजी शहरातील रस्त्यांवरील खड्डे जलदगतीने तसेच प्रभावी आणि टिकाऊ पद्धतीने पॅचवर्क करण्यासाठी आमदार राहुल आवाडे यांच्या विशेष प्रयत्नातून 'इन्स्टा रोड पॅचर' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. या कामाचा शुभारंभ आदि व्यंकटराव शाळा झेंडा चौक येथे करण्यात आला. खड्ड्यांची दुरुस्ती कमी वेळेत आणि आधुनिक पद्धतीने करण्यात येत असून रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत होण्यास तसेच नागरिकांची गैरसोय कमी करण्यास मदत होणार आहे.

यावेळी महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या, सभागृह नेते विठ्ठल चोपडे, स्थायी सभापती सतिश मुळीक,प्रभाग समिती अध्यक्ष सुशांत कलागते, अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे, नितेश पोवार, राजू बोंद्रे, बाळासाहेब कलागते,शेखर शहा, राहुल घाट, संग्राम स्वामी, प्रमोद बचाटे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

My old Name **Vaishali Tatoba Kabade.** Do Hear by solemnly Declare My New Name as **Vaishali Santosh Wani.**

# सांगलीत गणपती पंचायतन संस्थानच्या मानाच्या श्रींचे जल्लोषात विसर्जन

सांगली,ता.१८(प्रतिनिधी )–

**सांगली गणपती पंचायतन संस्थानच्या उत्सवमूर्ती श्री गणरायाला शुक्रवारी शाही विसर्जन मिरवणुकीने निरोप देण्यात आला. भाविकांनी गणपती बाप्पा मोरया चा जयघोष करत पेढ्यांची उधळण करून पुढच्या वर्षी लवकर येण्याचे आवाहन केले. ढोल ताशांचा कडकडाट, हलगी घुमक्यावर लेझीमचा फेरा, टाळ मृदंगाच्या तालावर डोलणारे भगवे ध्वज आणि लाठ्या काठ्यांच्या मर्दानी खेळांनी मिरवणुकीची रंगत वाढविली. मिरवणुकीच्या मार्गावर भाविकांनी दुतर्फा गर्दी केली होती.**



सांगली गणपती पंचायतन संस्थानच्या श्रीं ची शाही थाटात निघालेली विसर्जन मिरवणूक.

संस्थानचे अधिपती विजयसिंह पटवर्धन,राजलक्ष्मी पटवर्धन, आदित्य राजे यांच्या हस्ते आरती झाली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी, महापालिकेच्या आयुक्त संजिता महापात्र, अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, महापालिकेचे उपायुक्त राहुल रोकडे उपस्थित होते. पंचायतनचे व्यवस्थापक जयदीप अभ्यंकर यांनी स्वागत केले. राजवाड्यातील दरबार हॉलमध्ये विराजमान झालेल्या उत्सव मूर्तीची आरती करण्यात आली. प्रथेप्रमाणे समाजातील विविध घटकांना पान सुपारी देणे, संगीताचा कार्यक्रम झाल्यानंतर उत्सवमूर्ती विसर्जनासाठी लाकडी रथात विराजमान होताच वाद्यांचा गजर झाला.पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल ताशांच्या निनादात दुपारी राजवाड्यातून मिरवणुकीला सुरुवात झाली.

गणेश दुर्ग या राजवाड्याच्या मुख्य दरवाजातून श्री गणेशाचा रथ बाहेर पडताच भाविकांनी उत्सव मूर्तीवर पेढ्यांची उधळण केली. अलोट गर्दीत रथ मुख्य गणपती मंदिरासमोर आला. त्यानंतर मंदिरात उत्सव मूर्तीची आरती झाल्यानंतर पुन्हा विसर्जन मिरवणूक मार्गस्थ झाली. मिरवणूक पुढे कृष्णा नदीकाठी सरकारी घाटावर आली. त्या ठिकाणी धार्मिक विधी पार पडल्यानंतर सजवलेल्या बोटीतून श्रींच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

**पाहिजेत**

कोहिनूर सहकारी बँक लि. इचलकरंजी येथे स्वतंत्रपणे आय.टी. विभाग सांभाळणेसाठी जेन्टस/लेडीज उमेदवार त्वरीत भरणेचे आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी दिनांक २५/०९/२०२६ पर्यंत खाली दिलेल्या ई–मेल आयडी वर किंवा प्रत्यक्ष बँकेत अर्ज करावेत.

(अनुभवी उमेदवारास प्राधान्य)

E-mail ID - kohinoorbank@ksblbk.com

(मोबाईल नंबर–९९७५४३७६८८)

**कोहिनूर सहकारी बँक लि. इचलकरंजी**

बंगला रोड, इचलकरंजी

# हद्दपारी आदेशाचा भंग ; तिघांना अटक

कोल्हापूर, ता.१८ (प्रतिनिधी)–

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हद्दपारीचा आदेश भंग करून शहरात वास्तव्य करणाऱ्या तीन गुन्हेगारांना जुना राजवाडा पोलिसांनी अटक केली. हर्षवर्धन उमेश मोरे (२८, रा. संध्यामठ गल्ली, शिवाजी पेठ), प्रथमेश राजू कलकुटगी (२३, रा. सुधाकर जोशीनगर) आणि यश खंडू माने (१९, रा. वारे वसाहत, मंगळवार पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.**

गणेशोत्सव शांततेत पार पडावा, तसेच सराईत गुन्हेगारांकडून अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी तिघांना शहर व करवीर तालुक्यातून हद्दपार केले होते.यातील दोघांना १४ दिवस, तर एकाला सहा महिन्यांसाठी हद्दपार केले होते. मात्र, तिघेही कोल्हापुरात असल्याची माहिती निरीक्षक किरण लोंढे यांना मिळाली.मोरे याला गांधी मैदान परिसरातील हायस्कूलच्या रस्त्यावरून, माने याला वारे वसाहतीतील महादेव मंदिराजवळून, तर कलकुटगी याला सुधाकर जोशीनगरातील पेट्रोल पंपाजवळून ताब्यात घेतले.

**॥ हार्दिक शुभेच्छा ॥**



**श्री. प्रभाकर आण्णाप्पा बावने**

आमचे परममित्र व युवा नेते श्री.प्रभाकर आण्णाप्पा बावने यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

**शशिकांत मोहिते**
अध्यक्ष : भाजपा इचलकरंजी शहर (पश्चिम)
**इम्रान बागवान**
नगरसेवक : इचल. महानगरपालिका
विजय जासूद | गणेश चोळके
आशिष कोळेकर | विकास खोराटे
शिवाजी कांबळे

**हार्दिक शुभेच्छा!**



श्री. अमर रामचंद्र खोत

आमचे परममित्र मा.श्री.अमर रामचंद्र खोत यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

▪ उदय पांडूरंग आजगेकर ▪ विनायक पांडूरंग आजगेकर
▪ दिनेश बलवान (बल्ली) रूई
▪ आजगेकर टेक्स्टाईल ▪ डी. बी. खोत टेक्स्टाईल



ॲड.एम.यु. जमखंडी

**हार्दिक शुभेच्छा !**

इचलकरंजी शहरातील नामवंत वकिल, ॲड.एम.यु. जमखंडी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**ॲडव्होकेट जमखंडी चेंबर्स, इचलकरंजी**




मा.श्री. प्रकाश बसगोंडा पाटील टाकवडेकर

**हार्दिक शुभेच्छा !**

आमचे मार्गदर्शक मा.श्री. प्रकाश बसगोंडा पाटील टाकवडेकर, माजी सभापती पंचायत समिती शिरोळ, संचालक शरद सह. साखर कारखाना, यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..!

◆ उमेश आनंदराव देसाई
◆ देवगोंडा दुंडाप्पा पाटील
◆ विनायक दादासो–पाटील दानवाडकर



महासत्ता

सुविचार :- एखाद्याचा पराभव करणे फार सोपे असते. मात्र, एखाद्याला जिंकणे खूपच अवघड असते.

शनिवार,ता.१९ सप्टेंबर २०२६

■ संपादकीय ■

# उत्सवातही व्हीआयपी संस्कृती

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे शहर म्हटले की,डोळ्यांसमोर उभी राहते ती एक शिस्तप्रिय, विद्वानांची आणि संतांची परंपरा. समाजसुधारकांचा संपन्न वारसा.परंतु,अलीकडच्या काही वर्षांत या पुण्याचे रूप गणेशोत्सवाच्या काळात पूर्णपणे बदलून जाते आहे.मानाचे पाच गणपती असोत वा प्रसिद्ध श्रीमंत गणेश मंडळे,बाप्पाच्या दर्शनासाठी उसळणाऱ्या जनसागरामुळे उत्सवाच्या काळात मध्यवर्ती भागात पुरता बोजवारा उडतो आणि त्यालाच हातभार लागतो तो व्हीआयपी संस्कृतीचा. लोकांची श्रद्धा आणि बाप्पाप्रती असलेली भक्ती पूर्णपणे आदरणीय आहे. प्रश्न श्रद्धेचा नसून, उत्सवाच्या काळात निर्माण होणाऱ्या व्यवस्थापनाच्या ढिसाळपणाचा आणि महत्त्वाच्या व्यक्तींच्या म्हणजे माननीयांच्या लवाजम्याचा आहे.जेव्हा एखादा व्हीआयपी किंवा राजकारणी गणपती दर्शनासाठी निघतो, तेव्हा संपूर्ण पुण्याच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक व्यवस्था केवळ कागदावर उरते आणि प्रत्यक्षात बोजवारा उडतो. अचानक रस्ते बंद करणे, वाहतूक अन्यत्र वळवणे, ताफ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे आणि सर्वसामान्य जनता तासन्तास रांगेत ताटकळत असताना व्हीआयपींसाठी रेड कार्पेट अंथरून त्यांना तत्काळ दर्शनाचा लाभ देणे, हे कोणत्या भक्ती संस्कृतीचे लक्षण आहे? बाप्पाच्या दरबारात राजा आणि सामान्य सगळेच समान असतात, असे आपण मानतो; त्याच्या दर्शनासाठी कोणालाही प्राधान्य नसते आणि मज्जावही नसतो. तसेच जे त्याच्या दर्शनासाठी आलेले नाहीत.तथापि,आपली रोजची जगण्याची लढाई लढत कर्मवादाला प्राधान्य देत आपल्या व्यापात गुंतले आहेत त्यांच्या घरी जाण्याच्या अथवा कामाच्या ठिकाणी जाण्याच्या मार्गात व्यवधान निर्माण व्हावे अशी तर बाप्पाची बिलकुलच इच्छा नसते; परंतु व्यवहारात जे चित्र दिसते ते त्याच्या अगदीच उलट असते.महत्त्वाची मंडळी येतात. त्यांनी येऊ नये अशातला भाग नाही. मात्र,हल्ली आपली ताकद दाखवण्यासाठी त्यांनाही गळ घालून आणले जाते. तेही आपला माणूस दुखावू नये म्हणून मुंबईहून तर काही मंडळी चक्क दिल्लीहून वारी करतात. काही माननीयांच्या एक-दोन नव्हे तर तीन-तीन वाऱ्या पुण्यात होतात. वारी करणाऱ्या व्हीआयपींनाही पुण्याच्या कोंडीचा झटका बसला आहे.तरीही केवळ त्यांच्या भक्तांच्या श्रद्धेसाठी ते पुण्याचा दौरा ऐन गणेशोत्सवाच्या काळात करतात. या व्हीआयपी दर्शनामुळे व अनियोजित बंदीमुळे लक्ष्मी रोड,बाजीराव रोड,शिवाजी रोड आणि केळकर रोड यांसारख्या शहराच्या मुख्य वाहिन्या पूर्णपणे ठप्प होतात. सकाळी कामानिमित्त कार्यालयात जाणारे कर्मचारी,परीक्षा किंवा वर्गासाठी निघालेली शाळकरी मुले या कोंडीत अडकून पडतात. पीएमपीएमएलच्या बसेसचे मार्ग बदलल्यामुळे किंवा फेऱ्या रद्द झाल्यामुळे सर्वसामान्य पादचारी आणि बस प्रवाशांचे अतोनात हाल होतात. या सर्व प्रकारात सर्वात भयानक बाब म्हणजे रुग्णवाहिका. साध्या उपचारासाठी किंवा गंभीर अवस्थेत रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांच्या जीवाला या वाहतूककोंडीमुळे धोका निर्माण होतो. व्हीआयपींच्या सायरन वाजवणाऱ्या गाड्या पुढे निघून जातात आणि मागे ॲम्ब्युलन्स व अन्य वाहने तासन्तास रखडतात,हे दृश्य कोणत्याही संवेदनशील मनाला पटणारे नाही. मध्यवर्ती पेठांमध्ये राहणाऱ्या स्थानिक नागरिकांचे दुःख तेच बिचारे जाणोत. घराबाहेर पडणे, वाहने पार्क करणे किंवा साधी दैनंदिन कामे करणेही अशक्य होऊन बसते.लहान व्यापाऱ्यांचा सणासुदीचा व्यवसाय या कोंडीमुळे बुडतो, कारण ग्राहक मध्यवर्ती भागात येण्याचे टाळतात. हा प्रश्न आता केवळ वाहतूक पोलिसांच्या नियमनापुरता उरलेला नाही,तर तो नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा आणि प्रशासकीय इच्छाशक्तीचा आहे. जर पुण्याच्या या ऐतिहासिक गणेशोत्सवाला गालबोट लागायचे नसेल,तर काही कठोर पावले तातडीने उचलणे गरजेचे आहे. मानाच्या गणपतींमध्ये किंवा अन्य मंडळांमध्ये व्हीआयपींसाठी ऐन गर्दीच्या वेळी होणारी विशेष दाराची वा सवलतीची व्यवस्था पूर्णपणे बंद करावी.जमलेच तर त्यांनी नंतर किंवा त्यांच्या व मंडळांच्या सोयीने दूरस्थ दर्शनाचा लाभ घ्यावा.नेत्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे ताफे नियमांचे उल्लंघन करून चुकीच्या दिशेने जाताना आढळले,तर त्यांच्यावरही सामान्य नागरिकांप्रमाणेच कठोर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे.कोणत्याही परिस्थितीत रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्यांसाठी ग्रीन कॉरिडॉरची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी,जेणेकरून कोणाचा जीव कोंडीमुळे जाणार नाही.व्हीआयपी किंवा पाहुण्यांसाठी डिजिटल दर्शन किंवा ऑनलाइन प्रणाली उत्तम पर्याय आहे, जेणेकरून रस्त्यावर कोणताही लवाजमा उभा करण्याची वेळ येणार नाही. गणेशोत्सव हा आपल्या अस्मितेचा आणि आनंदाचा सोहळा आहे.हा उत्सव उत्सवच असावा,त्रासाचा अनुभव नव्हे. पुण्याच्या या वैभवाला शिस्तीची आणि समानतेची जोड देण्याची गरज आहे.

# विघटनाच्या उंबरठ्यावर ब्रिटेन

**एक काळ असा होता की ब्रिटिशांचे जगातील जवळपास एक चतुर्थांश भूभागावर राज्य होते. ब्रिटिश साम्राज्य एवढे शक्तिशाली बनले होते की, 'ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधीच मावळत नाही', असे म्हटले जात असे. याचा अर्थ ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार जगाच्या वेगवेगळ्या भागांपर्यंत झाला होता. ब्रिटनमध्ये सूर्यास्त होत असताना भारत आणि ऑस्ट्रेलियासारख्या ब्रिटिश वसाहतींमध्ये सूर्योदय होत असे. त्यामुळेच ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधीही मावळत नाही, असे म्हटले जात होते.**

ब्रिटिश साम्राज्य भारत आणि ऑस्ट्रेलियापुरते मर्यादित नव्हते; अमेरिका,कॅनडा आणि आफ्रिकेपर्यंत त्याचा विस्तार झाला होता.पहिल्या महायुद्धापूर्वी ब्रिटनपेक्षा मोठी महासत्ता जगात नव्हती.सुमारे १०० वर्षांच्या काळात ७० देशांवर राज्य करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याच्या उदयापासून अस्तापर्यंतचा प्रवास हा प्रदीर्घ इतिहासाचा भाग आहे.आज मात्र ब्रिटनचा विस्तार मूठभर बेटांपुरता मर्यादित झाला आहे. भारतावर सुमारे २०० वर्षे राज्य करणारा आणि १९४७ मध्ये भारताची फाळणी करणारा ब्रिटन आज स्वतःच विभाजनाच्या उंबरठ्यावर उभा असल्याची चर्चा सुरू झाली आहे.एकेकाळी जगभरातील नकाशे बदलणाऱ्या आणि देशांच्या सीमा निश्चित करण्यात भूमिका बजावणाऱ्या ब्रिटनची राजकीय रचना आज मोठ्या घटनात्मक संकटाच्या उंबरठ्यावर असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. वेल्स, स्कॉटलंड आणि नॉर्दन आयर्लंडमधील स्वातंत्र्याच्या मागण्यांनी वेस्टमिन्स्टरसमोर नवे आव्हान उभे केले आहे.या तिन्ही भागांच्या प्रमुख राजकीय नेतृत्वाने सोमवारी एका ऐतिहासिक आणि अभूतपूर्व त्रिपक्षीय करारावर स्वाक्षऱ्या केल्या.लंडनस्थित ब्रिटिश संसद अर्थात वेस्टमिन्स्टरच्या अधिकारांना आव्हान देणे आणि तिन्ही प्रदेशांना पूर्ण स्वायत्तता तसेच स्वातंत्र्याबाबत सार्वमत घेण्याचा अधिकार मिळावा, ही या करारामागील प्रमुख मागणी आहे. वेल्सची राजधानी कार्डिफ येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत तिन्ही प्रदेशांच्या प्रमुख नेत्यांनी एकत्र येत ब्रिटनचे पंतप्रधान अँडी



बर्नहॅम आणि त्यांच्या सरकारला इशारा दिला. या करारावर स्वाक्षऱ्या केल्यानंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनातून वेस्टमिन्स्टरच्या सत्ताव्यवस्थेवर थेट टीका करण्यात आली. या बेटांवर राहणाऱ्या नागरिकांसाठी आणि या घडामोडींकडे पाहणाऱ्या जागतिक समुदायासाठी यापेक्षा स्पष्ट संकेत असू शकत नाहीत; लंडनमधून चालणाऱ्या वेस्टमिन्स्टरच्या व्यवस्थेचे युग आता अखेरच्या टप्प्यात आले आहे, अशी भूमिका त्यातून मांडण्यात आली. युरोपीय महासंघातून ब्रिटन बाहेर पडल्यानंतर, म्हणजेच 'ब्रेक्झिट' नंतर आपल्या आर्थिक आणि सामरिक हितांवर मोठा परिणाम झाला, अशी या तिन्ही प्रदेशांतील नेतृत्वाची धारणा आहे.आपल्या नागरिकांचे समृद्ध आणि सुरक्षित भविष्य युनायटेड किंगडममध्ये राहण्यापेक्षा पुन्हा युरोपीय महासंघ आणि जागतिक भागीदारांशी अधिक जवळचे संबंध प्रस्थापित करण्यात आहे,अशी त्यांची भूमिका आहे.या तिन्ही प्रदेशांतील असंतोषाला अमेरिकेचे अध्यक्ष

## दैनंदिनी

डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका वक्तव्यामुळे आणखी धार मिळाली. नॉर्दन आयर्लंडचे आयर्लंड प्रजासत्ताकात विलीनीकरण व्हावे, याला आपण पाठिंबा देतो आणि दोन्ही भाग एकत्र येणे ही चांगली कल्पना आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यानंतर अवघ्या ४८ तासांत हा मुद्दा राजकीयदृष्ट्या अधिक संवेदनशील बनला. अमेरिकेचे अध्यक्ष नॉर्दन आयर्लंडच्या प्रश्नाबाबत सहसा सावध भूमिका घेत आले आहेत. मात्र ट्रम्प यांच्या वक्तव्यामुळे हा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला.ब्रिटनचे पंतप्रधान अँडी बर्नहॅम यांनीही अलीकडेच स्कॉटलंड आणि नॉर्दन आयर्लंडमध्ये युनायटेड किंगडमपासून वेगळे होण्याच्या बाजूने सहमती निर्माण झाल्यास सार्वमताचा विचार केला जाऊ शकतो, असे म्हटले होते.त्यांच्या या वक्तव्यानंतर स्कॉटलंडमधील सत्ताधारी 'एसएनपी'ने हा मुद्दा उचलून धरला.मात्र त्यानंतर बर्नहॅम यांनी सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी स्वातंत्र्याबाबत सार्वमत घेतले जाणार नाही,असे स्पष्ट केले. स्कॉटलंड,वेल्स आणि नॉर्दन आयर्लंडची ही बैठक युनायटेड किंगडमपासून वेगळे होण्याच्या मागणीपुरती मर्यादित नाही.नॉर्दन आयर्लंडचे आयर्लंडमध्ये विलीनीकरण झाल्यास तो भाग युरोपीय महासंघाशी जोडला जाईल, कारण आयर्लंड प्रजासत्ताक आधीपासूनच युरोपीय महासंघाचे सदस्य आहे. २०२० मध्ये ब्रिटन युरोपीय महासंघातून बाहेर पडला.त्यापूर्वी झालेल्या सार्वमतात ब्रिटनमधील मतदारांनी युरोपीय महासंघ सोडण्याच्या बाजूने कौल दिला होता.स्कॉटलंडच्या स्वातंत्र्याची मागणी २०१६ मध्येही पुन्हा तीव्र झाली होती.त्यावेळी स्कॉटलंड मधील बहुसंख्य मतदारांनी युरोपीय महासंघात कायम राहण्याच्या बाजूने मतदान केले होते;मात्र संपूर्ण ब्रिटनच्या मतदारांनी युरोपीय महासंघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. यामुळे स्कॉटलंड आणि ब्रिटनच्या उर्वरित भागातील राजकीय मतभेद अधिक ठळक झाले. ब्रिटनची अर्थव्यवस्थाही सध्या अडचणींचा सामना करत आहे. गेल्या काही वर्षांत एकामागोमाग एक पंतप्रधान बदलले आहेत. अशा परिस्थितीत स्कॉटलंड, वेल्स आणि नॉर्दन आयर्लंडच्या राजकीय नेतृत्वाने दाखविलेली एकजूट लंडन अर्थात वेस्टमिन्स्टरवरील घटनात्मक बदलांचा दबाव वाढवू शकते. ब्रिटिश सत्तेने या असंतोषाची कारणे वेळेत समजून घेतली नाहीत आणि दूरदृष्टीने आवश्यक घटनात्मक व राजकीय सुधारणा केल्या नाहीत,तर युनायटेड किंगडमच्या स्वरूपापुढील आव्हान अधिक गंभीर होऊ शकते. ◆◆◆

# उपोषण थांबवून जरांगेंचा आंदोलनाला अल्पविराम



मराठा आरक्षण आंदोलन कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित केले असले, तरी मराठा आरक्षणाचा संघर्ष संपलेला नाही. मुंबईच्या दिशेने निघालेला मोठा ताफा,आझाद मैदानावरील उपोषणाला परवानगी नाकारली जाणे, प्रकृती खालावणे आणि अखेरीस बीडमध्ये सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेली चर्चा, या घटनाक्रमाने आंदोलनाला नवे वळण मिळाले आहे. सरकारला मागण्या पूर्ण करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देत जरांगे यांनी उपोषण थांबवले आहे. त्यामुळे हा शेवट नसून सरकारला दिलेला वेळ आणि त्याचवेळी स्वतःच्या आंदोलनाची पुढील दिशा ठरविणारा विराम आहे. जरांगे यांच्या आंदोलनाची सकारात्मक बाजू म्हणजे त्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न सातत्याने सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी ठेवला. समाजातील असंतोषाला संघटित स्वरूप देत त्यांनी सरकारवर दबाव निर्माण केला. आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला वारंवार चर्चेसाठी पुढे यावे लागले.

## तीन महिन्यांची मुदत देत राज्य सरकारवर दबाव

सामान्य मराठा कुटुंबातील आरक्षणाचा प्रश्न हा राजकीय मुद्दा नसून रोजगार,शिक्षण आणि भवितव्याशी जोडलेला प्रश्न आहे, हे त्यांनी ठळकपणे मांडले.त्यांच्या आंदोलनामुळे या मागणीभोवतीचा सामाजिक दबाव कायम राहिला.मात्र, आंदोलनाच्या या ताकदीसोबत काही गंभीर प्रश्नही आहेत.मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत दाखल झाल्यास गणेशोत्सवाच्या कालावधीत वाहतूक, सार्वजनिक व्यवस्था आणि सुरक्षेवर ताण येऊ शकला असता.

गणेशोत्सवासारख्या काळात गर्दीचा प्रश्न अधिक संवेदनशील बनतो. आंदोलनाचा अधिकार महत्त्वाचा असला तरी सामान्य नागरिकांना होणारा त्रास आणि प्रशासनासमोरील आव्हाने यांचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे आंदोलनाची तीव्रता आणि सार्वजनिक हित यांचा समतोल साधणे जरांगे यांच्यासाठी महत्त्वाचे ठरणार होते. पाणी, सलाईन आणि उपचार सोडण्याचा निर्णय त्यांच्या निर्धाराचे प्रतीक म्हणून पाहिला जाऊ शकतो; परंतु स्वतःच्या प्रकृतीला गंभीर धोका निर्माण करून आंदोलन करणे कितपत योग्य, हा प्रश्नही उपस्थित होतो.मागण्यांसाठी संघर्ष करताना आंदोलनकर्त्याच्या आरोग्याची जबाबदारीही महत्त्वाची आहे. संघर्षाची नैतिक उंची टिकवण्यासाठी टोकाची भूमिका घेण्यापेक्षा ठोस परिणाम साधणारी रणनीती आवश्यक ठरते.जरांगे यांच्या भाषाशैलीवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकारवर किंवा राजकीय नेत्यांवर कठोर टीका करणे हा आंदोलनाचा भाग असू शकतो; मात्र शिवराळ किंवा वैयक्तिक स्वरूपाची भाषा वापरल्यास मूळ प्रश्न बाजूला पडण्याचा धोका असतो. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह काही नेत्यांवर त्यांनी केलेली तीव्र टीका आणि नंतर त्याच विखे पाटलांसह सरकारचे शिष्टमंडळ चर्चेसाठी येणे, हा या आंदोलनातील महत्त्वाचा विरोधाभास आहे.आता सरकारसमोर सर्वांत मोठे आव्हान आहे ते आश्वासनांची अंमलबजावणी करण्याचे. हैदराबाद गॅझेटियर, सातारा आणि औंधसह संबंधित नोंदी, कुणबी प्रमाणपत्रांची वैधता आणि ५८ लाख नोंदी कायम ठेवण्याची मागणी हे प्रश्न कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रियेशी जोडलेले आहेत.

त्यामुळे केवळ राजकीय घोषणा करून भागणार नाही. निर्णय घेताना कायदेशीर चौकट, उपलब्ध नोंदी आणि त्यातून निर्माण होणारे परिणाम यांचा विचार करावा लागेल.विशेषतः५८ लाख नोंदींचा मुद्दा जरांगे यांनी ठामपणे मांडला आहे.या नोंदींपैकी एकही नोंद कमी होणार नाही,याची लेखी हमी त्यांना अपेक्षित आहे.तीन महिन्यांत काय निर्णय होतात आणि त्यांची अंमलबजावणी कितपत होते, यावर पुढील संघर्षाची दिशा ठरेल. या टप्प्यावर जरांगे यांचीही जबाबदारी कमी नाही. तीन महिन्यांची मुदत स्वीकारल्यानंतर सरकारच्या प्रत्येक निर्णयाचे बारकाईने परीक्षण करणे आवश्यक आहे. कायदेशीर अडचणी आणि प्रशासकीय मर्यादा समाजासमोर स्पष्टपणे मांडणेही तितकेच गरजेचे आहे. मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.त्यामुळे या काळात आंदोलनाची दिशा भावनिक दबावापेक्षा तथ्य, कायदा आणि संवाद यांच्या आधारे ठरवावी लागेल. सरकारसाठीही हा केवळ तात्पुरता दिलासा आहे.मुंबईतील संभाव्य गर्दी आणि सुरक्षेचा प्रश्न तूर्तास टळला असला, तरी तीन महिन्यांची मुदत आता सरकारच्या कामगिरीची कसोटी बनली आहे. आश्वासनांची पूर्तता झाली तर संवादातून मार्ग काढण्याचा आदर्श निर्माण होऊ शकतो; मात्र ठोस प्रगती झाली नाही तर आंदोलन पुन्हा तीव्र होण्याची शक्यता आहे. म्हणूनच जरांगे यांनी उपोषण स्थगित केले आहे, संघर्ष नाही. आता रस्त्यावरच्या शक्तिप्रदर्शनापेक्षा शासनाच्या कागदावरील निर्णयांना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीला महत्त्व आहे. पुढील नव्वद दिवसांत सरकार काय करते आणि जरांगे या प्रक्रियेवर कसे लक्ष ठेवतात, यावर पुढील दिशा ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवाहन केले आहे की, राज्य सरकारने मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या १३ पैकी १२ मागण्या मान्य केल्या आहेत. एका मागणीबाबत कायदेशीर अडचण आहे, ती तात्काळ मान्य करता येत नाही.त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, पुण्यासह राज्यातील नागरिकांची गैरसोय किंवा कायदा-सुव्यवस्थेवर ताण निर्माण होईल, अशी कोणतीही भूमिका जरांगे पाटील यांनी घेऊ नये. जरांगे यांनी मागच्या गणपतीला मुंबईत येऊन राज्य सरकारला वेठीस धरले होते. जरांगेने यावेळी गनिमी काव्याचा उल्लेख केला होता. जरांगे पुन्हा मुंबईत आले तर गणेशोत्सवात मागेच्या वर्षीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. जरांगेंना मुंबईत येण्याअगोदर थांबवून राज्य सरकारने त्यांना सध्या शांत केले आहे, पण मराठाचा आरक्षणाचा प्रश्न अजून सुटलेला नाही. त्यासाठी सरकारला मोठी तयारी करावी लागेल. कारण हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही.

■ शिवाजी चौगुले

## वाचकांचा पत्रव्यवहार

### अनधिकृत बॅनरबाजीला आळा घालण्याची गरज



अनधिकृत बॅनरबाजीविरोधात नागरिकांमध्ये निर्माण झालेली जागरूकता ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.गणेशोत्सवातील डीजेच्या दणदणाटाला विरोध करण्यासाठी पुण्यात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने मोर्चा काढला, त्याचप्रमाणे शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्या अनधिकृत बॅनर आणि जाहिरातींविरोधातही जनतेने आवाज उठवणे गरजेचे आहे. स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध शहर ही केवळ प्रशासनाची नव्हे,तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विशेषतः धार्मिक उत्सव, राजकीय कार्यक्रम,वाढदिवस,शुभेच्छा आणि विविध समारंभांच्या निमित्ताने चौकाचौकांत मोठमोठे बॅनर लावले जातात.अनेकदा या बॅनरमुळे रस्ते, पदपथ आणि वाहतुकीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.काही ठिकाणी बॅनरमुळे वाहतुकीच्या संकेतांकडे किंवा दिशादर्शक फलकांकडे दुर्लक्ष होऊ शकते. वादळी वाऱ्यात किंवा पावसात कमकुवतपणे लावलेले फलक धोकादायक ठरू शकतात. महत्त्वाचे म्हणजे नियम सर्वांसाठी समान असायला हवेत. परवानगी शिवाय बॅनर लावणाऱ्यांवर कारवाई होत असेल,तर त्यात राजकीय पक्ष, सामाजिक संस्था किंवा अन्य कोणालाही अपवाद असता कामा नये.केवळ बॅनर काढून टाकणे पुरेसे नाही; पुन्हा अनधिकृत बॅनर लावले जाणार नाहीत यासाठी सातत्याने देखरेख आणि दंडात्मक कारवाई आवश्यक आहे.नागरिकांनीही आपली सामाजिक जबाबदारी ओळखून अनधिकृत बॅनरबाजीला प्रोत्साहन देऊ नये. शहराचे सौंदर्य, वाहतुकीची सुरक्षितता आणि सार्वजनिक जागेचा योग्य वापर यासाठी नियमांचे पालन करणे हीच खरी लोकसेवा आहे.

■ श्याम ठाणेदार

### वस्त्रपरीचे अभिनंदन....

इचलकरंजी शहरात वस्त्रपरी या शहरांतर्गत सुरू झालेल्या बससेवेबद्दल सर्व लोकप्रतिनिधी आणि परिवहन मंत्री यांचे अभिनंदन. सदरची बससेवा हि अत्याधुनिक आणि स्वच्छ व खूप चांगली आहे. नेमलेले कर्मचारी सुद्धा अगदी मनापासून सेवा करत आहेत. विद्युतीकरण तसेच ए सी अशा विविध सुविधांनी ती परिपूर्ण आहे. तुर्तास शहरवासीयांना माहिती होण्यासाठी महिनाअखेर पर्यंत ही बससेवा मोफत आहे.




बससेवा सुरु झाल्यापासून याच्या चालक व वाहकांना संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे.अनेकांनी याचे कौतुक केले तर काही विघ्नसंतोषी लोकांकडून त्रास देण्यात आला. हि बससेवा काही लोकांच्या डोळ्यात खूपत आहे हे पाहून वाईट वाटले. एका वाहकाने सांगितले की, एका ठिकाणी बस टर्न घेत असताना काही लोक मुद्दाम आपले वाहन लावून त्यांना वळण घेण्यापासून रोखत आहेत.ही बससेवा सुरू झाल्यामुळे कोणाच्याही पोटावर पाय येणार नसून आपल्या शहराचाच फायदा होणार आहे. आणि या बससेवेचा सर्वाधिक फायदा हा इचलकरंजी शहर व वाढीव हद्द जसे की शहापूर, तारदाळ, जे के नगर आणि तुळजाभवानी नगर या परिसरातील विद्यार्थी तसेच व्यापारी व सामान्य नागरिकांना होणार आहे. बससेवा तर उत्तम आहे यामध्ये आणखी चांगले बदल करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी याचे एक परिपत्रक टाईम टेबल, (वेळापत्रक) दर आणि ज्या ठिकाणी वाहक व चालक यांना त्रास होत आहे त्याठिकाणी लोकांना भेटून त्यांना सक्त ताकीद दिली पाहिजे. अथवा तिथे पोलिस उभे करून या बसेसचा मार्ग अधिक सुखकर करण्यात आला पाहिजे. हि वस्त्रपरी कोल्हापूरातील केएमटी बस सेवेसारखी अविरत सुरू असायला हवी. सध्या मोफत बससेवा असलेले बरेचजण याचा लाभ घेत आहेत पण उद्या दर निश्चित करून बससेवा सुरू झाली तरी प्रशासनाने संयम पाळून हि बससेवा अविरत सुरू ठेवावी.

■ इंद्रजित नाझरे,इचलकरंजी

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार,ता.१९.०९.२०२६**, विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, वर्षा ऋतो, भाद्रपद मासे शुक्ल पक्षे अष्टमी तिथी, १५.२७ नंतर नवमी तिथी, मूळ नक्षत्र २५.४३ नंतर पूर्वाषाढा नक्षत्र, धनुरास आयुष्यमान योग, १४.२९ नंतर सौभाग्य योग, बवकरण, १५.२७ नंतर बालवकरण २८.४१ पर्यंत, दिनमान १२.०४, सुर्योदय ०६.२५, सुर्यास्त १८.२९ (कोल्हापूरचे) राहूकाळ सकाळी ०९ ते १०.३०, दुर्गा दुर्वा अष्टमी, गौरी गणपती विसर्जन, दारक धारण, गणेश नवरात्र समाप्ती, दग्ध १५.२७ नंतर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष**- नोकरदार वर्गाने कामाकडे लक्ष द्यावे. आर्थिकदृष्ट्या इतरांवर अवलंबून राहू नका. कुटुंबातील सदस्यांची काळजी घ्या. मानसिक शारीरिक आरोग्य जपा.

**वृषभ**-व्यवसायात मोठे धाडस करू नका. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य घ्यावे लागेल. आर्थिक व्यवहार जपून करा. प्रकृतीची काळजी घ्या.

**मिथून**-आज तुमच्या मनाची द्विधा अवस्था निर्माण होऊ शकते. त्यामुळे निर्णय घ्यायला अवघड जाणार आहे. काय करावे काय करू नये अशी परिस्थिती निर्माण होईल.

**कर्क**- भावनिक गोष्टी टाळा. व्यावहारिक राहून निर्णय घ्या म्हणजे त्रास होणार नाही. इतरांना सल्ला देणे टाळा. बाकी दिवसातील कालावधी चांगला असेल.

**सिंह**-आजचा दिवस थोडा धावपळीचा राहणार आहे. अतिरिक्त कामाचा ताण येऊ शकतो.यामुळे तुम्हाला अतिरिक्त मेहनत आणि प्रयत्न करावे लागतील.

**कन्या**- व्यवसायात चढ-उताराचा दिवस असेल.नोकरदार वर्गाचे काम सुरळीत चालू राहील. आर्थिक बाबतीत बचत करणे योग्य राहील. आपल्या आरोग्याची काळजी घ्या.

**तुळ**- कामे मार्गी लागतील.गौरी गणपतीचा सण अगदी उत्साहाने साजरा कराल.नोकरदार वर्गाचे तांत्रिक अडथळे दूर होतील.त्यामुळे तुमची कामातील उत्कंठा वाढेल.

**वृश्चिक**- आर्थिक व्यवहार मार्गी लागतील. कुटुंबातील हेवेदावे दूर होतील.आज तुम्हाला मानसिक समाधान लाभेल. आज लॉटरी लागण्याची शक्यता आहे.

**धनु**- आजचा दिवस तुमच्यासाठी सुखाचा क्षण अनुभवायला लावणारा आहे. बऱ्याच दिवसांतून असा कालावधी आला आहे असे म्हणायला हरकत नाही.

**मकर**- आज तुम्ही तुमच्या कार्यक्षमतेमुळे अनेक कामे योग्य प्रकारे पूर्ण करू शकाल. यावेळी तुमचे विचार पूर्णपणे व्यावहारिक ठेवा. धार्मिक गोष्टींची आवड राहील.

**कुंभ**- कौटुंबिक जीवन सुखाचे राहील. एकूण सप्ताह शुभ असेल.आरोग्य उत्तम राहील.घरी आनंदी वातावरण असेल. मुलांशी संबंधित चांगली बातमी मिळेल.

**मीन**-जवळच्या नातेवाईकाकडे जाणे आज तुम्हाला फायदेशीर ठरणार आहे.अनपेक्षित फायदा अथवा घबाड मिळण्याची शक्यता आहे. सुवर्णालंकार खरेदी कराल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६०, पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# गणपती बाप्पाचे विसर्जन करा,पण माझेही अस्तित्व जपा..!

प्रिय चिकोत्रा खोरा वासियांनो, सप्रेम नमस्कार,
मी... तुमची चिकोत्रा नदी बोलत आहे....

**पत्रास कारण की 'सुखकर्ता दुखहर्ता' श्री गणरायाचे आगमन प्रत्येकाच्या घरात आणि मनात नवचैतन्य घेऊन आले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून जगभरात महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा सिद्ध होत आहे. गेली पाच-सहा दिवस गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने भक्तिभावाने साजरा केला आहे. त्या आपल्या घरातील बाप्पांचे आज विसर्जन आहे.माझ्या घाटांवर आरतीचे स्वर दुमदुमणार, मंत्रोच्चारांनी वातावरण भारावून जाणार, फुलांच्या सुगंधाने माझे काठ दरवळून जाणार, तुमच्या डोळ्यातील श्रद्धा आणि माझ्या वरील प्रेम पाहून माझे मन कृतज्ञेने भरून जाणार आहे.पण...**



## चिकोत्रा नदीची आर्त साद

भुदरगड तालुक्यात असलेल्या नागझरी,केळेवाडी आणि अदृश्य सरस्वतीच्या पवित्र संगमातून जन्मलेली मी...आजरा, भुदरगड आणि कागल तालुक्यातून व कर्नाटक राज्यातील निपाणी भागातील काही गांव,असे माझे चिकोत्राखोरे ३५१ चौरस किलोमीटर क्षेत्रात जवळपास ५२ गांवाहून अधिक क्षेत्रात पसरले आहे. नैऋत्येस टेकड्या व डोंगर ईशान्येकडे मैदानी प्रदेश असा असमान भुभाग आहे. त्यामुळे सरासरी पाऊस पडतो. माझी पाणीसाठा क्षमता महत्त्वाची असून, याच्या बॅकवॉटर क्षेत्राचा व सिंचनाचा परिसरातील शेतीला व पिण्यासाठी महत्त्वाचा आहे. खडतर अशा प्रवासातून वाहत असलेली मी, शतकानुशतके तुमच्या संस्कृतीची, श्रद्धेची आणि जीवनाची साक्षीदार आहे. तुमच्या सुखदुःखात सहभागी होत मी अखंड वाहत आहे. तुमच्या शिवारांना हिरवाई दिली. तहानलेल्या कंठांना पाणी दिले. आणि मुक्या जनावरांना जीवन दिले.मात्र हे पत्र लिहिताना माझे मन भरून आले आहे.

उगमापासून संगमापर्यंत माझ्या प्रवाहात आता दूषित पाण्याचे ओढे-नाले मिसळत आहेत. गावातील सांडपाणी, कारखान्यातून येणारे रासायनिक विष, ओढ्यातून वाहत येणारा प्लास्टिकचा कचरा, वाढणारे केंदाळ माझ्या अस्तित्वाला पोखरत आहे. कधीकाळी निर्मळ आणि पारदर्शक असणाऱ्या माझ्या लाटांशी खेळणारे हजारो जलचर प्राणी मृत्युमुखी पडत आहेत. त्यामुळे आता दुर्गंधी आणि प्रदूषणाचे सावट पसरले आहे.

पिंपळगाव, चिवणे, ओठ्याच्या शांततेतून, नागणवाडी लघु पाटबंधाऱ्याच्या वेगातून, हणबरवाडी तलावाच्या जीवनदायी प्रभावातून जे पाणी माझ्यात सामावते ते पुढे मानवनिर्मित प्रदूषणामुळे दूषित होत जाते. तरीही मी न थकता वाहत आहे.... कारण तुम्हा सर्वांची तहान भागवणे हेच माझे कर्तव्य आहे.निवडणुकीचे दिवस आले की, माझ्या नावाने घोषणा होतात. झुलपेवाडी येथील माझ्या पाणीसाठ्याचे मुख्य स्त्रोत असलेले, धरण शंभर टक्के भरले की,पाणी पुजनासाठी पुढाऱ्यांची लाईन लागते. भाषणे होतात. चिकोत्राशुद्ध करू, गाळमुक्त करू, प्रदूषण थांबवू अशी अनेक आश्वासने दिली जातात. घाटावर नेत्यांच्या पाहण्या होतात. पण ते निघून गेल्यावर व वर्तमान पत्रकातून बातमी आल्यानंतर,त्यांची आश्वासने माझ्याचं प्रवाहात विरघळून जातात.

म्हणून माझ्या चिकोत्रा खोऱ्यातील तमाम ५२ गांवातील निसर्गप्रेमी व भाविकांना आवाहन करते. गणेश विसर्जनाच्या काळात नागरिक मोठ्या श्रद्धेने माझ्याकाठी येतात. मात्र विसर्जना दरम्यान प्लास्टिकच्या पिशव्या, प्लास्टिक सजावटीची सामुग्री, निर्माल्य, माळा, वेस्टने व अन्य अविघटनशील साहित्य मोठ्या प्रमाणात माझ्याकाठावर व माझ्यापात्रात येते. विसर्जनानंतर हे साहित्य माझ्यातून बाहेर काढणे व त्याचे नियोजन करणे, ग्रामपंचायतीस मोठे आव्हान ठरते.

**गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असतानाच, नदी संवर्धनाचा उत्सव व्हावा एवढीच माफक अपेक्षा आहे. मला तुमच्या फुलांचा मोह नाही....मला आरतीच्या प्रकाशाची आस नाही.... मला फक्त हार फुले नकोत तर स्वच्छ आणि निर्मळ प्रवाह हवा आहे. माझे पात्र स्वच्छ ठेवा.माझ्या लाटांना पुन्हा निर्मळ श्वास घेऊ द्या.कारण मी फक्त नदी नाही तर तुमच्या संपूर्ण चिकोत्रा खोऱ्याच्या संस्कृतीचा श्वास आहे. भविष्यातील पिढ्यांचा जीवनाधार आहे. तुम्हीच सांगा... माझं चुकलं तरी काय? माझ्यावर प्रेम असेल तर, मला प्रदूषणमुक्त ठेवा.हीच माझी तुम्हा सर्वांना कळकळीची विनंती.**

**- आपलीच**
**चिकोत्रा नदी**

(शब्दांकन: यशवंत पाटील)



संकेश्वर: वार्षिक सभेत बोलताना श्रीनिवास कोळेकर.

## श्री नामदेव सौहार्दला १७ लाख ८५ हजारांचा नफा-कोळेकर

संकेश्वर,ता.१८(प्रतिनिधी)-

**संकेश्वर श्री नामदेव सौहार्द पत्तीन सहकारी संघाला चालू आर्थिक वर्षात १७ लाख ८५ हजार १३४ रुपये नफा झाला असून सभासदांना २० टक्के लाभांश देत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास कोळेकर यांनी सांगितले. ते संस्थेच्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.**

स्वागत संचालक किरण खटावकर यांनी केले.अहवाल वाचन सीईओ एम.एस मठपती, नफा-तोटा अंदाजपत्रक वाचन अरुणा खाडे हिने केले. २०२६-२७ अंदाजपत्रक बजेट कविता बागेवाडी यांनी तर लाभांश विभागणी संस्थेचे उपाध्यक्ष आनंद काकडे यांनी केले. सभेला उपाध्यक्ष आनंद काकडे, संचालक चरण खटावकर,किरण खटावकर,प्रसाद भागवत, कांचन कोळेकर, सभासद,हितचिंतक, कर्मचारी उपस्थित होते. आभार संचालक गायत्री गोंदकर यांनी मानले.

## 'गृहलक्ष्मी' योजनेची पडताळणी प्रक्रिया सुलभ पार पाडावी-पाटील

निपाणी,ता.१८(प्रतिनिधी)-

**कर्नाटक सरकारची महत्त्वपूर्ण व लोकप्रिय गृहलक्ष्मी' योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी लाभार्थी महिलांची पडताळणी प्रक्रिया करण्यात येणार आहे. ही पडताळणी अंगणवाडी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून केली जाणार असून ही प्रक्रिया सुलभपणे पार पाडावी, असे आवाहन केपीसीसी सदस्य व कर्नाटक प्रदेश महिला काँग्रेसच्या जनरल सेक्रेटरी सौ. सुप्रिया पाटील यांनी केले.**



निपाणी: सीडीपीओ सुप्रीया जडगे यांच्याशी चर्चा करताना कर्नाटक महिला काँग्रेसच्या जनरल सेक्रेटरी सुप्रीया पाटील.

या प्रक्रियेबाबत माहिती घेण्यासाठी सौ.पाटील यांनी निपाणी सीडीपीओ कार्यालयास भेट देऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी सीडीपीओ सुप्रीया जडगे यांनीही विविध माहिती दिली. यावेळी धनाजी चव्हाण, युवक काँग्रेस अध्यक्ष अवधूत गुरव, उपाध्यक्ष प्रशांत हांडोरी तसेच काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# निढोरी मुख्य कालव्यास अखेर सोडले पाणी

## पिकांना जीवदान

निढोरी,ता.१८(वार्ताहर)-

**निढोरी परिसरातील भात पिके पाण्याअभावी संकटात आल्याचे वृत्त 'दैनिक महासत्ता'मध्ये प्रसिद्ध होताच, जलसंपदा विभाग कोल्हापूर (मुख्य शाखा निढोरी) येथील अधिकारी वर्गाने अत्यंत तत्परता दाखवत मुख्य कालव्यातून (कॅनॉल) शेतीसाठी पाणी सोडले आहे. प्रशासनाच्या या जलद कारवाईमुळे सुकत चाललेल्या पिकांना जीवदान मिळाले आहे.**



निढोरी: येथे कालव्यास सोडलेले पाणी.

### 'दैनिक महासत्ता'च्या वृत्ताची दखल

१६ सप्टेंबर २०२६ रोजीच्या 'दैनिक महासत्ता'च्या अंकात ''पाण्याअभावी भात पिके धोक्यात, कॅनॉलला पाणी सोडण्यात यावे, शेतकरी बांधवांची मागणी!'' अशा आशयाचे सविस्तर वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. या भागात पाऊस लांबल्याने आणि कालव्याला पाणी नसल्याने भात आणि ऊस पिके वाळून जाण्याच्या मार्गावर होती. शेतकऱ्यांचे होणारे मोठे आर्थिक नुकसान आणि त्यांची बिकट अवस्था या बातमीच्या माध्यमातून प्रशासनासमोर मांडण्यात आली होती. कालव्यातून खळाळत आलेले पाणी पाहताच निढोरी पंचक्रोशीतील अनेक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आहे. हवालदील झालेल्या शेतकरी बांधवांनी भात व ऊस पिकांना पाणी देण्यासाठी शेतात एकच लगबग सुरू केली आहे.

**सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव आणि कृतज्ञता**

'दैनिक महासत्ता'ने सामाजिक बांधिलकी जपत शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडल्याबद्दल निढोरी पंचक्रोशीतील अनेक मान्यवरांनी आणि शेतकरी संघटनांनी दैनिक महासत्ता परिवाराचे विशेष आभार मानले आहेत.

## 'श्रीं'ची मूर्ती दान करून गारगोटीची परंपरा जपावी-सरपंच वास्कर

गारगोटी,ता.१८(प्रतिनिधी)-

**आज गौरी गणपतीचे विसर्जन होत असून दरवर्षी प्रमाणे श्री गणेशमूर्ती व निर्माल्य नदीत विसर्जित न करता ग्रामपंचायतीस दान करून आपली गेल्या दहा वर्षातील परंपरा जपावी, असे आवाहन ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच प्रकाश वास्कर यांनी केले आहे.**

वेदगंगा नदी प्रदूषित होऊ नये व पर्यावरणाचे रक्षण व्हावे या भावनेतून गेल्या दहा वर्षांपासून गारगोटी येथील गणेशभक्त गणेशमूर्ती व निर्माल्य वेदगंगा नदीत विसर्जित करत नाहीत. त्यासाठी ग्रामपंचायत हा उपक्रम राबवित आहे.यावर्षीही आपली मूर्ती व निर्माल्य नदीत विसर्जित करू नये त्यासाठी नदी काठावर व ग्रामपंचायत शेजारी खास कुंड उभारण्यात आले आहेत.शिवाय दिवसभर ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी नदी घाटावर उपस्थित राहणार आहेत तरी गणेशभक्तांनी आपल्या मूर्ती ग्रामपंचायतीस दान कराव्यात, असे आवाहन ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच प्रकाश वास्कर व उपसरपंच भरत शेटके यांनी केले आहे.



निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगले यांचेकडे उमेदवारी अर्ज सादर करताना रणजितसिंह पाटील.

## भुदरगडमधून रणजितसिंह पाटील यांचा अर्ज दाखल

### गोकुळ दूध उत्पादक संघ निवडणूक

मु.तिट्टा,ता.१८(प्रतिनिधी)-

**गोकुळच्या पंचवार्षिक निवडणुंकीसाठी भुदरगडमधून सर्व साधारण गटातून गोकूळचे माजी संचालक युवा नेते रणजितसिंह कृष्णराव पाटील रा.मुदाळ (ता.भुदरगड)यांनी निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगले यांचेकडे उमेदवारी अर्ज सादर केला.**

यावेळी मा.आम.व बिद्रीचे चेअरमन के.पी.पाटील,मौनी विद्यापीठाचे चेअरमन व बिद्री संचालक मधू आप्पा देसाई, पंडीतराव केणे,उमेश भोईटे, राजेंद्र पाटील, फत्तेसिंह भोसले, धैर्यशील पाटील कौलवकर, नविद मुश्रीफ आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पट्टणकोडोली.... येथील खो-खो स्पर्धेतील विजेता संघ.

## पट्टणकोडोली न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचे खो-खो स्पर्धेत दैदिप्यमान यश

पट्टणकोडोली,ता.१८(प्रतिनिधी)-

**आदर्श गुरुकुल पेठवडगाव येथे पार पडलेल्या हातकणंगले शालेय तालुकास्तरीय १४ व १७ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत पट्टणकोडोली (ता.हातकणंगले) येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या १७ वर्षे वयोगटातील मुलींनी खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला तर १४ वर्षे वयोगटातील मुलांनी खो-खो स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला.**

याशिवाय ३६ किलो वजनी गटात १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या कुस्ती फ्री स्टाईलमध्ये आरोही संदीप भोसले हिने प्रथम क्रमांक ४५ किलो वजनी गटात १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या ग्रीको रोमनमध्ये अर्जुन लिंगाप्पा शिरोळे याने प्रथम क्रमांक तसेच ४८ किलो वजनी गटात प्रतिक प्रविण हराळे याने प्रथम क्रमांक पटकाविला. किणी हायस्कूल किणी येथे घेण्यात आलेल्या शालेय १४ वर्षे वयोगटातील मुलींचा कबड्डी स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक तसेच १४ वर्षे वयोगटातील मुलांनी कबड्डी स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला.

यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक योगेश सुतार, क्रीडा व्यवस्थापक गौराप्पा धनगर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.संस्थेचे उपाध्यक्ष सत्यजित मगदूम, सचिव प्रमोद बोरगावे, शैक्षणिक सल्लागार जितेंद्र वसगडेकर, मुख्याध्यापक उदय बिरांजे, पर्यवेक्षिका संगीता भातमारे आदींनी विजयी स्पर्धकांचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सभासदांच्या विश्वासाने धनलक्ष्मी संस्थेची प्रगती

## सुषमा केस्ते

बारवाड,ता.१८(वार्ताहर)-

**भोज,भोजवाडी परिसरात सर्वांच्या विश्वासास पात्र ठरलेली एकमेव अशी संस्था म्हणजे धनलक्ष्मी क्रेडिट सौहार्द संस्था असून तुम्हा सर्व सभासदांच्या विश्वासाने या संस्थेने प्रगती केली असल्याचे प्रतिपादन या संस्थेच्या चेअरमन सुषमा केस्ते यांनी केले.**



भोज: येथील धनलक्ष्मी सौहार्द संस्थेच्या सभेत अहवाल वाचन करताना चेअरमन सुषमा केस्ते.

भोज येथील धनलक्ष्मी क्रेडिट सौहार्द संस्थेच्या २० व्या सर्वसाधारण सभेप्रसंगी त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, संस्थेकडे ठेवी १५ कोटी ७ हजार ५२ रु., गुंतवणूक ७ कोटी ४२ लाख ९७ हजार ७३९ रु.,कर्जे ७ कोटी ८२ लाख ९३ हजार ८८७ रु.इतकी असून संस्थेस १५ लाख २ हजार ३७९ रु.इतका नफा झाल्याचे सांगितले.सभेचे विषय वाचन व नफा तोटा ताळेबंद पत्रकाचे वाचन मुख्य कार्यनिर्वाहक विनोद टाकळे यांनी केले.

प्रतिमा पूजन संस्थापक सचिन केस्ते यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ.सुदर्शन मुराबट्टे यांनी संस्थापक सचिन केस्ते यांचा सत्कार केला. यावेळी व्हा.चेअरमन प्रशांत चौगुले, संचालक बाळासाब मालबा, बसगौंडा पाटील, उत्तम कणंगले, सुकुमार चौगुले, शीतल चौगुले, शीतल वैगुडे,कीर्तीकुमार पाटील, विनायक खोत,मोनिका कोनापन्नावर, रुपाली चौगुले, संजय आरगे, जिलानी मुजावर यांच्यासह मान्यवर, सभासद, ठेवीदार व सेवक वर्ग उपस्थित होते.



वार्षिक सभेप्रसंगी उपस्थित संस्थापक डॉ. शंकर माळी, शेजारी रामगोंडा पाटील,उपाध्यक्ष मुरारी एदमाळे व इतर.

## जनता क्रेडीट सोसायटीची वार्षिक सभा उत्साहात

बोरगाव,ता.१८(प्रतिनिधी)-

**बोरगांव येथील दि जनता को-ऑप. क्रेडिट सोसायटीची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक डॉ.शंकर माळी होते.**

याप्रसंगी बोलताना डॉ.माळी यांनी सांगितले की, संस्थेने ११ कोटी १लाख रुपये ठेवी गोळा करून सभासदांना ६ कोटी ९८ लाख१० हजार रुपये कर्जे वाटप केले आहे. यावर्षी संस्थेला ४५ लाख ४३ हजार रुपये इतका नफा झाला आहे. संचालक प्रदीप माळी यांनी मनोगत व्यक्त केले. व्यवस्थापक धनंजय काकडे यांनी नफा तोटा अंदाजपत्रकाचे वाचन करून मंजुरी मिळवली. यावेळी हालशुगर संचालक रामगोंडा पाटील, बाबासाहेब पाटील, बाबासाहेब डुणुंग, संस्थेचे उपाध्यक्ष मुरारी एदमाळे, संचालक देवगोंडा पाटील, भीमगोंडा पाटील, रावसाहेब पचंडी, अण्णासाहेब पाटील, बाहुबली अम्मान्नवर यांच्यासह सर्व संचालक व सभासद उपस्थित होते.

# निपाणीत आज विविध ठिकाणी निर्माल्य संकलनाची सुविधा

निपाणी,ता.१८(प्रतिनिधी)-

**येथील निकू पाटील मळा ग्रुप, दौलतराव पाटील सोशल फाउंडेशन आणि हेल्थ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी पाटील खण येथे गणेशमूर्ती विसर्जनासह निर्माल्य संकलनाची सोय करण्यात आली आहे.**

### निपाणी पालिकेकडून चार ठिकाणी सोय

फाउंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाच्या विधीला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि परिसराचे पावित्र्य राखण्यासाठी फाउंडेशनतर्फे विसर्जन स्थळी निर्माल्य संग्रह केले जाणार आहे. यासाठी एका मोठ्या काहीलीमध्ये निर्माल्य विसर्जनाची स्वतंत्र सोय करण्यात आली आहे. निपाणी शहर आणि परिसरातील हजारो गणेशभक्तांनी या पर्यावरणपूरक उपक्रमाचा लाभ घ्यावाअसे आवाहन निकू पाटील मळा ग्रुप, दौलतराव पाटील सोशल फाउंडेशन व हेल्थ क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच यावर्षी निपाणी नगरपालिकेने अमलझरी तळे, रामनगर, मराठा मंडळ, तासिलदार प्लॉट याठिकाणी कायलीची सोय करून गौरी विसर्जनानंतर निर्माल्य गोळा करण्यासाठी ट्रॉलीची व्यवस्था केली आहे. याठिकाणी नगरपालिका कर्मचारी व पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त ठेवला जाणार आहे. दान करण्यात आलेल्या गौरींचा गांढूळ खत निर्मितीसाठी वापर करण्यात येणार आहे.

# मुरगूड पालिकेने विसर्जनासाठी आवश्यक सुविधा पुरवण्याची मागणी

मुरगूड,ता.१८(प्रतिनिधी)-

**गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर मुरगूड शहरात गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच विसर्जन प्रक्रिया सुरक्षित, स्वच्छ व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी मुरगूड नगरपरिषदेने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा व उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी नागरिक व विविध गणेश मंडळांच्या प्रतिनिधींनी नगराध्यक्षा सौ. सुहासिनीदेवी प्रवीणसिंह पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**



मुरगूड: गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर विविध आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे निवेदन नगराध्यक्षा सौ.सुहासिनीदेवी प्रवीणसिंह पाटील यांना देताना नागरिक व गणेश मंडळांचे प्रतिनिधी.

गणेश विसर्जनासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी घरगुती तसेच सार्वजनिक गणेशमूर्तींसाठी कृत्रिम विसर्जन कुंड किंवा हौद उभारण्यात यावेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जनस्थळी अत्याधुनिक क्रेन, पुरेशी प्रकाश व्यवस्था तसेच वीजपुरवठा खंडित झाल्यास जनरेटरची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी तसेच कुरणी बंधाऱ्याच्या घाटावरील पायऱ्या दुरुस्त कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी किरण मडीलगेकर, संग्राम साळोखे, दगडू शेणवी, ओंकार पोतदार, सर्जेराव भाट, मयूर सावर्डेकर, निखिल कलकूटकी, धीरज सावर्डेकर, विशाल इंदलकर, राहुल चौगले, रोहित कोळेकर, नाना डवरी तसेच विविध गणेश मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## आदिती जाधव हिची निवड

कोगनोळी,ता.१८(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्यातर्फे सिंथेटिक ट्रॅक, शिवाजी विद्यापीठ येथे घेण्यात आलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत कोगनोळी (ता. निपाणी) येथील श्री अंबिका करिअर अकॅडमी अँन्ड ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी आदिती सुभाष जाधव हिने १००० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकाविले.**



आता तिची डेरवण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी तिला संस्थेचे संस्थापक व्ही.आर. गायकवाड यांचे मार्गदर्शन तर प्राचार्य अनिस मुल्ला, शिक्षकांचे व आई-वडिलांचे प्रोत्साहन लाभले.

## डॉ.अशोक पाटील-चंदुरकर यांचे निधन



कोल्हापूर ता.१८(प्रतिनिधी)

स्टेशन रोड येथील डॉ. अशोक शंकरराव पाटील चंदुरकर (वय ७४) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, मुलगी, भाऊ असा परिवार आहे.

# छोट्या जाहीराती

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**चालू स्थितीतील स्टेशनरी** कौंटर, कपाट, टेबल कलर झेरॉक्स मशिन लॅमिनेशन मशिन पूर्ण नवीन सेटअपसहीत त्वरीत विकणे व गाळा भाड्याने देणे. संपर्क- ९८८१०७०८६६, इचलकरंजी.

**फॅन्सी मोठा** सोफा डायनिंग टेबल प्युअर सागवान त्यासोबत सनमाईक आहे. टीव्ही आणि सिटींग टेबल विकणे आहे. मो. ९४२२३५९३५९.

**कपडे वाळत** घालण्याचे हॅंगिंग स्टॅण्ड, डासाची जाळी,किचन ट्रॉली, कबुतर जाळी. संपर्क- राहुल एंटरप्रायजेस. ७५०७७१६६६४, ७५०७७२६६६४.

**प्लॉट विकणे** रूई मानेनगर येथील २ गुंठेचा एनए प्लॉट ४० बाय ५० कंपौंडसह विकणे. मो. ९४२२०३२०९९.

**विकणे रामलिंग** रोडटच १५ गुंठे फार्म हाऊससाठी ताबडतोब विकणे आहे. मो. ७९७२५८०५५३.

**व्हॉईट कॉटन** रेडिमेड शर्ट, भरपूर व्हरायटी फक्त होलसेल विक्रीसाठी संपर्क-९३२६८९२१११

**विकणे.** आळते माळ ४ गुंठे जागा विकणे. ३० लाख रू. व ९९ वर्षे करार नोटरी १ गुंठे जागा घर विकणे आहे. रू. ७ लाख रूपये संपर्क-७२१८००१८६८

**नवीन कोल्हापूर नाक्याजवळ,** कोल्हापूर रोडटच इचलकरंजी येथे ३६१६ स्क्वे. फूट क्षेत्र जागा व त्यावरील आरसीसी बांधकाम असलेली इमारत विकणे आहे. संपर्क-९४०४१०४०६७, ९३७२००४०६७

**फेस्टीव्हल ऑफर-** जुन्या किचन ट्रॉली किती दिवस रिपेअर करत बसणार? मग यावर उपाय फक्त एक कॉल करा आणि निश्चित रहा... मे किचन सम्राट घेवून आले आहेत आता २०२६ चे लेटेस्ट किचन तेही आपल्या बजेटमध्ये आणि बोनस म्हणजे तुमच्या जुन्या किचन ट्रॉलीला योग्य मोबदला देऊन... मग आजच कॉल करा. ९८२२२४३६९३

**२ बीएचके** फ्लॅट विकणे आहे. फक्त २८ लाखात (फायनल), ८०७ स्केअर फुट. लोन वापरण्यास देऊ, पत्ता- सेंचुरी प्लॉजा, झुडिओच्या बाजूला, इचलकरंजी. मो. ९९२२७७२७८८ (मुल्ला)

**हातकणंगले येथे** कलेक्टर एन.ए. ३ प्लॉट अर्जंट विकणे आहे. प्लॉट एरिया १७२२ स्क्वे. फूट संपर्क- ९०९६१०७९९९, ९११२६४८३९९

**जुने व नवीन पॉवरलूम** घेवू व देवू तसेच फवारा, कांडीमशीन डक्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू. ८३१७२९१००८

मोकळी जागा विकणे आहे.३५०० स्क्वे.फूट. राणी बागेसमोर, एचडीएफसी बँक शेजारी. मेन रोड. ९२५६५७२७२७

## * व्यवसाय *

**महिलांसाठी सुवर्णसंधी** घरबसल्या अश्वगंधा बिया पॅकींग करा फक्त ६०० रूपये भांडवलात. दररोज १०००/- रूपये मिळवा. बाळासो भोसले, जांभळी. मो. ९२७०५८१४५२.

## * नोकरी विषयक *

**सेवाभारती संचलित** डॉ. हेडगेवार रुग्णालय, इचलकरंजी स्वागतिका (Receptionist) व फार्मासिस्ट आवश्यक १. स्वागतिका (Receptionist) शैक्षणिक पात्रता : कोणत्याही शाखेतील पदवीधर संगणकाचे ज्ञान, संवाद कौशल्य व रुग्णालयीन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य २. फार्मासिस्ट शैक्षणिक पात्रता D Pharm/B. Pharm अनुभवी उमेदवारांना प्राधान्यरुग्णालयीन फार्मसीचा अनुभव असल्यास विशेष प्राधान्य वेतन : पात्रता व अनुभवानुसार योग्य व आकर्षक वेतन. इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा रुग्णालयाच्या कार्यालयात जमा करावा. संपर्क साधावा. पत्ता-४/१८५,नाट्यगृह चौक, इचलकरंजी. संपर्क नंबर- (०२३०) २४२६१७१/ ९८३४०४१४०४

**Accountant Required** knowledge of tally, miracle Industries, Contact 9175492404.

**कापड दुकानात कामासाठी** हेल्पर मुले, शिकाऊ, अनुभवी मुले पाहिजेत. (पुरुष) आकर्षक पगार दिला जाईल. श्री राम टेरिन सेंटर, इचलकरंजी. वेळ- सकाळी ९.३० ते रात्री ९ संपर्क-९८२३५८११८८

**मॅकेनिकल कंपनीमध्ये** पाहिजेत. सीएनसी/व्हीएमसी/ग्राईडिंग ऑपरेटर-४०, क्वालिटी हेड-०२, प्रोगॅमर/०२, डिझाईन सुपरवायझर-०२. डॉक्युमेंटसाठी बी.एससी/एम.एससी मुले/मुली-०५, इचलकरंजी. ९१७५९६७७६७, ८९५६१६९६९६.

**रूम बॉय** पाहिजे इचलकरंजी मधील लॉजमध्ये रूम सर्व्हिस करणेसाठी सुशिक्षित मुले पाहिजेत. मो. ८६६८२१९७६३.

**TELE SALES** REQUIRED we ar looking for a Tele sales executive with good communication and customer handling skills, miracle Industries. co.- 9175492404.

**सुजाता सेल्स** कॉर्पोरेशन ड्रायव्हर+ऑफिस बॉय पाहिजे. मो. ९०२१२५७९०३.

**नामांकित रेस्टारंट** कॅफेमध्ये कामासाठी इनचार्ज व क्रु मेंबर पाहिजे आहेत. आकर्षक पगार मिळेल. पार्ट टाईम, फुल्ल टाईम कामाची सुवर्णसंधी. मो. ७७९८६९५२६९.

**पाहिजेत मशिन** शॉपसाठी त्वरीत सीएमएम, सीएनसी/एचएमसी/व्हीएमसी ऑपरेटर पाहिजे. जागा प्रत्येकी-१, आकर्षक पगार, ईएसआयसी सुविधा उपलब्ध. मो. ७८४१९११२९६, ९८५०८७१४८१.

**नामवंत कंपनीमध्ये** पाहिजेत. १० वी/१२ वी शिकाऊ ऑपरेटर-२०, आयटीआय/डिप्लोमा इन्स्पेक्टर-१०, डिप्लोमा/पदवीधर मुली जॉब इन्स्पेक्टर-१०, इचलकरंजी. मो. ८९५६१६९६९६.

**कामगार पाहिजेत** कापडाच्या दुकानात लेडीज/जेन्टस्. संपर्क- ९७६६०७५९१०.

**हॉस्पिटल साफसफाई** कामासाठी मावशी पाहिजे. हॉस्पिटलची अनुभवी असणारी पाहिजे. मो. ९६६५०४६१३९.

**रूमाल शिलाई** गारमेंटममध्ये महिला भरती सुरू आहे. अनुभवी महिलांना प्राधान्य. पत्ता- गायत्री गारमेंट, पंचवटी टॉकीज मागे, गुंज गल्ली, मो. ९६५७८३८४१६.

**अरिहंत व्युमेन्स** हॉस्पिटलमध्ये मावशी पाहिजे. वेळ ८ ते ४ व १२ ते ८, पत्ता- स्टेशन रोड, कॅबसन्स हॉटेल समोर, मो. ७०३८७७२७२७.

**कर्मचारी हवे** आहेत जम्बोकिंग इचलकरंजी किचन स्टाफ पदासाठी फ्रेशर्सची आवश्यकता. फ्रेशर्सचे स्वागत, आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल. शिफ्टमध्ये काम करण्याची तयारी आवश्यक. चांगल्या करिअरची सुरूवात करण्याची संधी. स्टेशन रोड, फायर ब्रिगेड समोर, इचलकरंजी. मो. ९१५६६१९५७३, ९३७१०४५६१५.

**इचलकरंजीतील बारमध्ये** अनुभवी/शिकाऊ,पार्ट टाईम/फुलटाईम वेटर व हेल्पर पाहिजे. आकर्षक पगार, राहण्याची व जेवणाची सोय. मो. ९४२३८५९३१२.

**आण्णाज् फॅशनमध्ये** सेल्मन व अकौंटट पाहिजेत. सेल्समन-४ पगार (७ ते ११ हजार), अकौंटट-२ पगार (९ ते ११ हजार). अनुभव किमान १ वर्षे. मो. ९५६१७१४२६२.

**वर्कशॉपमध्ये** १) हेल्पर-३, २)व्हीएमसी प्रोग्रॅमर-१ ३) अकौंटट-१ ४) सीएनसी सेटर-१, ४)फोरमन-१ पाहिजेत. आकर्षक पगार, फुलटाईम/पार्ट टाईम. मो. ८३२९१०४२२३, विक्रमनगर, इचलकरंजी.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**पाहिजेत व्हीएमसी** ऑपरेटर, जॉब इन्स्पेक्टर, सीएनसी व लेथ ऑपरेटर, हेल्पर. पगार-१०००० पासून पुढे. पाहिजेत- हॉटेलमध्ये वेटर कामासाठी. संध्या. ६ ते ११.०० मो. ९७६५४०९३९७.

**कोरोचीमधील नामांकित** अकॅडमीमध्ये इयत्ता ३ री (सर्व विषय) व ५ ते ९ वर्गासाठी हिंदी विषयासाठी शिक्षक पाहिजेत. ७०२०४६९०२५.

**ऑफिस कामासाठी** लेडीज पाहिजे. संभाषण कौशल्य आवश्यक. वर्धमान चौक, इचलकरंजी. मो. ८१७७८४१४७७, ९२७०२०५६९०.

**नामवंत कंपनीमध्ये** सीएनसी, व्हीएमसी ऑपरेटर, लाईन इन्स्पेक्टर, प्रोगॅमर ग्रॅडींग ऑपरेटर व इन्स्पेक्शनसाठी मुले,लेडीज पाहिजेत. मो. ९६८९५८३४९५.

**कौन्सिलर आवश्यक** शैक्षणिक संस्थेसाठी कौन्सिलर पदासाठी पुरूष व महिला उमेदवारांची आवश्यकता आहे. शैक्षणिक पात्रता- बीई/बीटेक/एमबीए, अनुभवी उमेदवारांना प्राधान्य. आकर्षक पगार, संपर्क वेळ- सकाळी ९.०० ते संध्या ५.००. संपर्क- ८८३०८२०२१२.

**खोतवाडीमध्ये किचन** ट्रॉली, डिस्प्ले, ऑफिस कामासाठी जेन्टस्/लेडीज पाहिजेत खोतवाडीतील लोकांना प्राधान्य. मो. ८७८८२२८१३०.

**ऑफिस कामासाठी** अर्जंट लेडीज व जेन्टस् भरती करून घेणेचे आहे. शिक्षण १२ वी च्या पुढे चालेल. वेळ ११ ते ५ पर्यंत, बाळासो भोसले, जांभळी, मो. ९२७०५८१४५२.

**कापड दुकानात** कामासाठी लेडीज/जेन्टस् पाहिजेत. शिवशक्ती कलेक्शन, डेक्कन जवळ, इचलकरंजी. मो. ९५७९३९३६३६.

**ड्रायव्हिंग शिकवण्यासाठी** ट्रेनर पाहिजे व १२ वी शिक्षण, संगणक ज्ञान असणारी ऑफिस कामाकरीता मुलगी पाहिजे. (फुलटाईम). संपर्क- दयानिधी मोटर ट्रेनिंग स्कुल. ९७६६८४२७५७.

**श्री पेट** शॉप जवाहर नगर कामासाठी महिला कामगार पाहिजेत तसेच कॅटफुड, डॉगफुट, होलसेल दरात मिळतील. मो. ९९६०६२२४०८.

**कॉर्पोरेट ऑफिसमध्ये** ऑफिस कामासाठी कॉम्प्युटर नॉलेज असलेले अनुभवी लेडीज/पुरूष पाहिजे. इंग्रजी/मराठी भाषा अवगत, इचलकरंजी. मो. ९९२३४६०४३०.

**Reqrired Field** Sale Executive BBa/MBA Good communication Skill, Ichalkaranji. cont 7090969802.

**१० वी पास**-नापास मुले पाहिजे. गरजूंनी भेटावे. मो. ८३०८००११६१.

**ब्युटीशियन पाहिजे** अनुभवी व शिकाऊ चांगला पगार व आकर्षक इन्सेटीव्ह दिला जाईल. पत्ता- माऊली सलून, जवाहर नगर, इचलकरंजी.

**ऑफिस क्लार्क** कम अकौंटट पाहिजे. शिक्षण-बी.एस्सी/बी.कॉम, वय २० ते ३०, थोरात चौक, इचलकरंजी. ९८२३०२६७३७.

**कामगार पाहिजे** इलेक्ट्रीक दुकानामध्ये मोटर रिपेअरसाठी शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजे. पगार १२ हजार, रविराज इलेक्ट्रीकल्स, गणेशनगर. मो. ९९२१९१४२४२.

**सर्व्हिसिंग आणि** ग्रिसिंगसाठी शिकाऊ व अनुभवी कामगार पाहिजे. मो. ९९२२४९९२३२.

**इचलकरंजी किडस** वेअरमध्ये अनुभवी व फ्रेशर व मुली पाहिजेत. मो. ९९२२६२४६७६.

**EXECUTIVE ASSIANT** Male/Female, English Speaking good in MS Office And AI TOOLS, Graduation Must, Call 9405584026.

**पाहिजे जेन्टस्** १, अनुभव ६ महिने, टॅली (टॅली प्राईम)+टेक्स्टाईल डाटा एन्ट्री स्किल एमएस ऑफिस आवश्यक. मो. ९९२३७९९३३३.

**VI सिम** विक्रीसाठी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार पीएफ+ईएसआयसी सुविधा. मो. ८५३०७६६४२९.

**शिक्षक पाहिजेत** १) हिंदी/मराठी २) क्रिडा शिक्षिका ३) क्लार्क ४) माळी कामगार. मो. ८७८८०९९६९३.

**पार्ट टाईम संध्याकाळी** ६ ते ११.३० टेबल सर्व्हीससाठी जेंटस कामगार पाहिजे. शहापूर, कोरोची रोड. सावली सोसायटी, संपर्क- ७३९७८११५२२

**कापड पेढीवर** अनुभवी दिवाणजी व हेल्पर आणि अनुभवी अकौंटंट पाहिजे. संपर्क-कनक टेक्स्टाईल, ईदगाह मैदानजवळ, इचलकरंजी. फोन-७४४७३४५०६६, ८३७८०६८८४८

**कॅफेसाठी कामगार पाहिजे.** (मुलगा/मुलगी) संपर्क- मंगलमुर्ती टॉकीजरोड, महेश क्लबजवळ, इचलकरंजी. फोन-७२१८८२८००८

**सर्व्हींसिंगसाठी** अनुभवी कामगार पाहिजेत. संपर्क-८७८८३६३७९६, ९८२३९८५४६३, इचलकरंजी.

**पाहिजेत.** लक्ष्मी इंड. इस्टेट हातकणंगले येथे नामांकित कंपनीत स्पेक्ट्रो ऑपरेटर मायक्रो इन्स्पेक्टर, प्रोडक्शन सुपरवायझर, कोअर शॉप इन्स्पेक्टर, जॉब इन्स्पेक्टर, इलेक्ट्रीशियन, फिटर त्वरीत पाहिजे. दहावी, बारावी, बी.एस्सी, आयटीआय मुलांनी संपर्क साधावा. मो. ९८३००१४४९९, ८३०८८३७७७२

**कामगार पाहिजे.** जनरल स्टोअर्समध्ये कामासाठी पार्टटाईम मुलगा पाहिजे. संपर्क-वैभव ट्रेडर्स, सरस्वती मार्केट. ९२७१८६४१२४

**दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे.** संपर्क-७०५७०२८३०४

**अकौंटंट पाहिजे.** इचलकरंजी मधील नामांकित टेक्स्टाईल फर्ममध्ये जेंटस अकौंटंट पाहिजे. संपर्क-८३२९११५८४४

**पाहिजेत.** अनुभवी अकौटंट जेंटस व डाटा एंट्रीसाठी मुलगा पाहिजे. संपर्क-७२१८१४६६५५

**पाहिजेत.** हेल्पर-४, पगार८५०० ते ९००० दिवसा एकच शिफ्ट-८ तासचे काम, हॉलमार्क हॉस्पिटल फर्निचर, शहापूर रोड, सावली सोसायटीजवळ, इचलकरंजी. ९४२३२७५२३२, ९९२२१४२०४०

**हेअर ऑईल विक्री करिता** सेल्समन पाहिजेत फिरतीची आवड आणि स्वत:ची दुचाकी आवश्यक संपर्क- ९६३७७४५४४६

**VMC ऑपरेटर पाहिजेत** अनुभवी/शिकाऊ ESI सुविधा उपलब्ध. संपर्क-९३७०४१०४४९

**लेडीज स्टाफ पाहिजे-** मगदूम आयुर्वेदीक क्लिनीक, गांधी पुतळा, इचलकरंजी. संपर्क-७३८५११२०३९

**पाहिजेत-** आईस्क्रीम शॉपमध्ये फुलटाईम स्टाफ पाहिजे. आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क - ९८६०५७०४०४

**ऑफीस कामासाठी मुलगा पाहिजे-** कॉलेज स्टुडंट चालेल. संपर्क- श्री साई समर्थ वेअर हाऊस, आझाद टॉकीज, इचलकरंजी. ७८७५६९९९२४

**पाहिजे-** पार्वती इंडस्ट्रीजमध्ये नामांकित कंपनीमध्ये अनुभवी वार्पिंग, खरड दिवाणजी पाहिजे. संपर्क- ७७२००१८४०६

**पाहिजेत-** पार्वती इंडस्टीज मधील कंपनीमध्ये मेंडींग कामासाठी पुरूष व महिला पाहिजे. शिक्षण १०वी/१२वी. संपर्क-७७२००१८४०६

**ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर हवेत-** पार्वती इस्टेट जवळील टेक्स्टाईल मिलसाठी खालील गाड्या आवश्यक आहेत. छोटा हत्ती, सुपर, टाटा माझा. इच्छुकांनी संपर्क साधावा. संपर्क- ७७२००१८४०६

**मेन्स वेअर शॉपसाठी** कामगार/सेल्समन पाहिजे. फुलटाईम/पार्टटाईम. संपर्क- ७०६०९११७११ व्यंकटराव हायस्कुलजवळ, इचलकरंजी.

**सेल्स एक्झिक्युटीव्ह पाहिजेत-** किमान बारावी पास, उत्तम संभाषण कौशल्य असलेले फ्रेशर अथवा अनुभवी लेडीज अथवा जेंटस् सेल्स एक्झिक्युटीव्ह पाहिजे. फॅशन, डिजायनिंग झालेल्यांना प्राधान्य. संपर्क-९४२११०५४४४

**अकौंटंट पाहिजे-** Tally Erp, अकौंटींग, जीएसटी रिटर्न तसेच बॅक री कन्सिलेशनची संपूर्ण संपूर्ण माहिती असलेला किमान १ वर्षापर्यंत अनुभव असलेल्यांनी रिझ्युमसह भेटावे. संपर्क-९४२११०५४४४

**Tele Sales Required-** We are looking for a Tele sales Executive with good communication and customer handling skills. Contact- Miracle Industries. 9175492404

**Accountant Required-** Knowledge of Tally. Contact - Miracle Industries. 9175492404

**कामगार पाहिजे-** कॉम्प्युटर ऑपरेटर, स्टॉक मेंटनन्स, सेल्समन, कापड दुकानात कामासाठी संपर्क- ७७९६७७२७७७

**मित्र सहयोग मायक्रो** असोशिएटशन मध्ये ऑफिसबॉय कम क्लार्क पाहिजे. सर्व्हे कामाकरीता मायक्रो फायनान्स अनुभव व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. पत्ता- प्रियदर्शिनी कॉलनी, इचलकरंजी. फोन-९८८१४४७६२४

**पाहिजेत.** नामांकित कंपनीमध्ये शाहूनगर, चंदूर येथे महिला प्रतिनिधी अकौंटींग तसेच टेलिकॉलिंगकरिता कन्नड भाषा येणे आवश्यक. ९४२२५३५०९१

**पाहिजेत.** सेल्स एक्झीक्युटिव्ह (लेडीज/जेंटस) गोडावून कामासाठी हमाल पाहिजे. ७४९८४३२५०२, ७५५९७९३५५५

**त्वरीत व्हीएमसी ऑपरेटर पाहिजे.** पार्टटाईम/फूलटाईम फक्त नाईट शिफ्टसाठी चालेल. आकर्षक पगार मिळेल. संपर्क-९१३९९३४३१५, सांगली नाका, इचलकरंजी.

**ऑपरेटर पाहिजे.** सीएनसी/व्हीएमसी संपर्क- सिग्नेट इंटरनॅशनल प्राय. लि. श्री लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, हातकणंगले. फोन-९८५००५७५६३

**गरजू व निर्व्यसनी** टेम्पो ड्रायव्हर पाहिजे. ट्रान्सपोर्ट लायसन्स आवश्यकता आहे. मो. ९०२२११०१९८

**बेडशीट,चादर,**कारपेट दुकानात कामगार पाहिजेत. संपर्क- ओम एंटरप्राईज, कल्पना टॉकीज समोर, बंगला रोड, इचलकरंजी. मो. ९३७३७८५९५५.

**दिवाणजी पाहिजे** एअरजेट खातेमध्ये हुशार व अनुभवी दिवाणजी पाहिजे. मो. ९२७३९५३४५६,८८०५२४२६७८

**Following Posts** Urgently Required Trainer-4, Peon-2, Telecallers-4, Fresher/Experienced, Salary+Incentive. Contact 9158891885, 9822658476.

**शॉपमध्ये पार्ट** टाईम/फुलटाईम सेल्समन लेडीज/जेन्टस पाहिजेत. मो. ९२८४४०१०१६. इचलकरंजी.

**मेडिकल फर्निचर** तयार करणाऱ्या कंपनीमध्ये हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क- ७०८३८४८९४६ शहापूर.

**लेडीज कामगार** पाहिजे. अनुभवी चहा करता येणारे. संपर्क- लय भारी चहा, आनाज गॉगल शेजारी, कबनूर, मो. ८९५६४९५०५०.

**पाहिजेत माल** वाहतूक गाडीवर दिवाणजी कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- डी.बी. छाबडा, मेन रोड, गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. ९०२१४३३३६६, ७०५७५१५१४७.

**पाहिजेत धान्य** गोडाऊनमध्ये दिवाणजी कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- डी. बी. छाबडा, मेन रोड, गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. ९०२१४३३३६६, ७०५७५१५१४७.

**पाहिजेत डिजीटल** मार्केटिंग व सेल्ससाठी पुरूष/विवाहित महिला पाहिजे. मो. ९४२२०४७२१९.

**धान्य दुकानात** मार्केटिंगसाठी सेल्समन पाहिजेत. संपर्क- डी. बी. छाबडा, मेन रोड, गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मो. ९०२१४३३३६६, ७०५७५१५१४७.

**होलसेल किराणा** दुकानात २ अनुभवी कामगार पाहिजेत. माल वाहतूक इलेक्ट्रीक गाडीवर ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- संस्कार ट्रेडर्स, ९८६०८०७५५८, ९९७५२३४६५१.

**लेबर कॉन्ट्रॅक्टर** पाहिजे. श्री लक्ष्मी इंडस्ट्रीज, हातकणंगले. मो. ७५१७४००६८९.

**रिसेपनिस्ट पाहिजे** हॉस्पिटलमध्ये कामासाठी. संपर्क- सुशिलादत्त आर्थोपेडिक सेंटर, महासत्ता चौक, इचलकरंजी. मो. (०२३०) २४३७५७९.

**कार वॉशिंग** व पॉलीशसाठी शिकाऊ व अनुभवी कामगार पाहिजे. एजी कार वॉश, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ८७८८०२६०१६.

**टेकईट सुपर** मार्केटमध्ये स्टाफ भरती चालू आहे. (वय १८ ते ३५). कॅशियर, हाऊस किपिंग, सेल्सबॉय, सेल्सगर्ल. संपर्क- ९८८१८०००५३, ९५११७४३७७३.

**गारमेंटचे काज,** बटण, ओव्हरलॉक वगैरे मशिन. लॉटमध्ये विकणे. मो. ९८८१९०९०९९.

**इचलकरंजीमध्ये नामांकित** साडी व रेडीमेड ड्रेस दुकानात कामगार आणि हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार+कमिशन. मो. ८९५६९९९९३०, ८९९९६६०३६०.

**फॅमिली रेस्टारंट** व बारमध्ये अनुभवी वेटर पाहिजेत. मो. ९५९५६०४७४७.

**Hiring in** SBI Life Insurance Male/Female/Retire Person. House Wife, Ichalkaranji Location:- Part time/Full time working. 9970019548.

**Workers Required.** For Machineshop. CNC-VMC Operator-2, Quality Inspector-3, Store/Purchase-1, Quality Incharge-1, Helper-1. Contact- 9158434345. Shri Padmavatiauto Components, Korochi.

**जेंटस पाहिजे.** बेसिक १३०००/- पगार व एक्स्ट्रा इन्सेंटिव्ह. संपर्क- ९६०४०००८४५

**त्वरीत सिक्युरिटी गार्ड नेमणे.** खंजिरे इंडस्ट्रियल इस्टे, आभार फाटा, इचलकरंजी परिसर ८ तास व १२ तास, आकर्षक पगार. संपर्क-९८२२२२९९२७, ९८२२३५३८४०.

**Rangate Glass & Aluminium:** AI & Automation Executive आणि 2-ITI कर्मचारी आवश्यक. शहापूर, इचलकरंजी. संपर्क-७३८५७६१८४६

**लेडीज पाहिजे.** कॉम्प्युटर व टेलीफोन ऑपरेटर. संपर्क- ९६०४०००८४५

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती मालवाहतुक गाडीवर लायसनधारक (LMV-TR) अनुभवी व हुशार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ९८९०२२०९६३, ७५१७५०६६८२

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे.** ड्युटी ८ तास आकर्षक पगार, संपर्क- माने फौंड्री, इचलकरंजी. फोन- ७२१९२८६२८४, ९८६०८१४४६३

**पाहिजेत. १)** B.Sc Chemistry Laboratory+Production Supervisor-2 Post (exp./fresh) 2) ITI-Filter and electrician-1 post. (2 to 4 years exp.) 3) हेल्पर कामासाठी कामगार पाहिजेत. अनुभवानुसार आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क-८५३००७१२१०, ९९२२९३०७७६

**इचलकरंजीमधून** कॉलेजच्या बसवर ड्रायव्हर पाहिजेत. बॅच बिल्ला धारकांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. संपर्क-८९७५९३४१७३, ९६९७९८३०३६

**इचलकरंजी मधील** नामवंत हार्डवेअर दुकानामध्ये सिक्युरिटी गार्ड पाहिजे. वेळ- डे ड्युटी, १२ तास आकर्षक पगार मिळेल. संपर्क-९१३०३९११९०७, ८७८८३२८२२८

**कामगार पाहिजे.** इलेक्ट्रीकल्स कामासाठी शिकाऊ व अनुभवी पगार अनुभवावरून ठरवला जाईल. ९६८९०५०५७९, इचलकरंजी.

**कापडाच्या दुकानात** अनुभवी जेन्टस्, सेल्समन पाहिजेत. पगार १०,००० ते १५,०००/-+ कमिशन देवू. मो. ८३९०५३४१४३.

**इचलकरंजी येथील** व्हेज रेस्टॉरंटमध्ये वेटर, कॅप्टन, मुले/मुली त्वरीत पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य .आकर्षक वेळेवर पगार, जेवणाची सोय, बाहेरगावचा असल्यास राहण्याची सोय. मो. ९१४५३६०३६०, ९८९०२१७६५१.

**लेडीज वेअर** शॉपीसाठी लेडीज कामगार पाहिजे. पार्ट टाईम/फुलटाईम, हॉटेल ताराजवळ, इचलकरंजी. मो. ९४२३८६०१७६.

**नितीन एंटरप्रायजेस** ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे व मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे. पत्ता- मॅक बिल्डींग, रेमंड चौक, ५ स्टार एमआयडीसी, कागल व इचलकरंजीमध्ये मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे. मो. ९९२२७१८१००, ९५२७५१८१००.

## * कर्ज विषयक *

**तारण १५ लाख** व्यावसायिक सबसिडी. तारण कर्ज ३५% सबसिडी व्यावसायिक व होम लोन व मॉरगेज व २.५ एकरच्या पुढे शेतीवर लोन मिळेल. मो. ९६२३२३०४४६.

**कर्ज मिळेल** घर बांधणेसाठी किंवा तारण कर्ज. ग्रामीण भागात असेसमेंट उतान्यावर त्वरीत कर्ज मिळेल. मो. ७९७२७६०२९७.

## * बोअरवेल *

**सिध्देश्वर बोअरवेल**-आमचेकडे ४।।'' व ६।।'' बोअरवेल योग्य दरात मारून मिळेल. सांगली नाका, इचलकरंजी. मो. ८५५४९८४५६३, ७७७५९३७५७२

## * भाड्याने देणे घेणे *

**शाहू कॉर्नर** मुसळे बिल्डींगमधील पहिल्या मजल्यावरील २२५ स्क्वे. फूटाचे २ दुकनगाळे पतसंस्था, ऑफिस, ब्युटी पार्लर करिता भाड्याने देणे. संपर्क - ९४२२०४४९१४, ९१७५८३३९३९

**वन रूम** किचन व ७०० स्क्वे.फूट हॉल सर्व सोईनीयुक्त भाड्याने देणे आहे. पत्ता- आशिर्वाद लोकमान्य नगर, आझाद चौक, कोरोची. ८८८८१३०८३७, ९६२३२४११७८.

**शेड भाड्याने** देणे इचलकरंजी येथील डॉ. विलास जोशी दवाखान्याजवळ, माने फौंड्री मागे १००० स्क्वेअर फूट शेड भाड्याने देणे आहे. मो. ८६६८२१९७६३.

**भाड्याने देणे** १८ बाय २०=३६० स्क्वे.फूटचे फर्निचरसह ऑफिस, बँक, फायनान्स कंपनीसाठी पार्किंगसह मेन रोडटच, थोरात चौक जवळ, ७३९१९२१५४५.

**सर्व सोईनीयुक्त** ग्राऊंड फ्लोअरवर १ बीएचके भाड्याने देणे आहे. चव्हाण मळा, महालक्ष्मी मंदिर जवळ, खोतवाडी ग्रामपंचायतमागे, खोतवाडी, मो. ९०११६५५६३३.

**भाड्याने देणे. दवाखाना,ऑफिस** हॉस्पिटल इ.साठी उपयुक्त जागा भाड्याने देणे. पत्ता- स्टेशन रोड, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९७३००४१६१४.

**इचलकरंजी-हातकणंगले** मेन रोडटच पार्वती स्टील शेजारी, कोरोची हद्दीत १४,००० स्क्वे.फूट रिकामा प्लॉट त्यातील १००० पत्र्याचे शेड व १०० स्क्वे.पत्र्याचे ऑफीस सहीत भाड्याने देणे आहे. ९४२१८८८०००.

**जनता चौक** आडत पेठ, दुसरा व तिसरा मजला १००० स्क्वे.फूट ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. मो. ९९२२५४८२८५, ९८५०६४४७८५.

**१००० स्क्वे.**फूटाचा आरसीसी हॉल सर्व सोईनीयुक्त भाड्याने देणे. बंगला रोड, जनता बँकेजवळ, इचलकरंजी. मो. ९४२१९७६६९६.

**उत्तरमुखी आरसीसी** गाळे भाड्याने देणे आहे. ७५० स्क्वे.फूटाचे २ गाळे महासत्ता चौक, ८० फुटी रोडटच, इचलकरंजी. ९९७०००५५५८, ९६९७००५५५८.

**शेड भाड्याने देणे.** २५ बाय ३० चे गोडावून किंवा कोणत्याही व्यवसायासाठी भाड्याने देणे. आमराई मळा, इचलकरंजी. फोन- ७६२०३६५८३९

**१ बीएचके गहाणवट देणे आहे.** रू. ३ लाख. ताबा एक महिन्यानंतर पार्वती इंडस्ट्रिज गेटसमोर, कोल्हापूरी हॉटेलमागे, खोतवाडी. संपर्क-९७६६११३८८०

**फूल फर्निश्ड ऑफिस गाळा** ४५० स्क्वे. फूट उत्तम-प्रकाश टॉकीसमोर भाड्याने देण्याचा आहे. संपर्क- ९८९०१६१७९८ इचलकरंजी.

**भाड्याने देणे.** तिरंगा कॉलनी कबनूर येथे सर्वसोयीनियुक्त आरसीसी १ बीएचके भाड्याने देणे. संपर्क-९९२१८०७२६८

**भाड्याने देणे.** वखार भागमध्ये इमारत गाळा, बँक, पतसंस्था, शोरूम साठी फर्निचरसह १६५० स्क्वेअर फूट व बेसमेंट १६५० स्क्वेअर फूट. मो. ९९२२९२७९१०.

**भाड्याने देणे** पहिल्या मजल्यावर सर्व सोईनीयुक्त १ बीएचकेचे २ फ्लॅट भाड्याने देणेचे आहे. पत्ता- मॉडर्न हायस्कूलजवळ, गांधी, विकासनगर, इचलकरंजी. मो. ९०७५८४१२०५.

**गाळा भाड्याने देणे.** १० बाय १५ आरसीसी गाळा, पूर्व व उत्तरमुखी अजित पवार मळा, आमराई रोड, इचलकरंजी. फोन-९७३०९५६५५६

**घर भाड्याने पाहिजे.** मुस्लिम फॅमिलीसाठी २ बीएचके चे २ किंवा ४ रूम हॉल किचन असलेले स्वतंत्र घर पंचवटी टॉकीज ते अलायन्स हॉस्पिटल, तीनबत्ती चौक परिसर. संपर्क- ८२०८४७२०४५, ९९७००७५४११

**छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद**

# पाणीपट्टी वसुलीसाठी महापालिकेची धडक मोहीम

■ कोल्हापूर ता.१८ (प्रतिनिधी)

**महानगरपालिकेच्या शहर पाणीपुरवठा विभाग वसुली पथक तसेच अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करण्यासाठी आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांच्या सूचनेनुसार महापालिकेच्या वतीने चार उपद्रव शोध पथके स्थापन करण्यात आली आहेत.**

थकीत पाणीपट्टी वसुली तसेच अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. १८ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या एक महिन्याच्या कालावधीत महापालिकेच्या या पथकांमार्फत एकूण ५३ लाख ८२ हजार ८१८ रुपयांची पाणीपट्टी वसुली करण्यात आली आहे. सदरची कारवाई अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर उपायुक्त नागेंद्र मुतकेकर, परितोष कंकाळ, जल अभियंता हर्षजीत घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपद्रव शोध पथक व पाणीपट्टी वसुली विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

# प्रधानमंत्री अन्न सूक्ष्म प्रक्रिया उद्योगाचा फायदा बचत गटांनी घ्यावा- भिंगारदिवे

■ कोल्हापूर ता.१८ (प्रतिनिधी)

**आत्मनिर्भर भारत अंतर्गत कृषी विभागाची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग अर्थात योजना. या योजनेत प्रति सदस्य ४० हजार तर प्रति स्वयंसहायता गटासाठी कमाल ४ लाख रुपये इतके खेळते भांडवल मिळते. या योजनेचा फायदा बचत गटांनी करून घेवून आपला आर्थिक विकास साधावा असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी अरुण भिंगारदिवे यांनी केले.**

वडणगे येथील हनुमान तरुण मंडळ येथे 'लोकसंवाद' कार्यक्रमावेळी ते बोलत होते.सहा. कृषी अधिकारी श्रीमती माधुरी पाटील यांनी शेतकऱ्यांनी ऊस पिकासाठी ठिबकचा उपयोग करावा असे आवाहन करून गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार योजने संदर्भात सविस्तर माहिती दिली.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले आहे.सार्वजनिक लोकसहभागातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभर 'लोकसंवाद - २०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा 'लोकसंवाद-२०२६'चा प्रमुख उद्देश आहे. या लोकसंवाद उपक्रमावेळी योगेश भगत, बाबासाहेब जवंदाळ,श्रीधर काटे, महादेव पाटील,पंकज मिरजे, प्रकाश कदम,कुंडलिक पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# हाजी अजीज खान यांचे निधन

■ इचलकरंजी,ता.१८-

**शहरातील मुस्लिम समाजाचे मार्गदर्शक हाजी अजीज खान यांचे आकस्मिक निधन झाले.**



अजीज खान हे केवळ एका समाजाचे मार्गदर्शक नव्हते, तर सर्वधर्मीयांना आपलेसे करणारे, गरजूंच्या मदतीला धावून जाणारे आणि माणुसकीला सर्वाधिक महत्त्व देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या दातृत्वाचा हात नेहमीच गरजूंसाठी पुढे राहिला. त्यांच्या अचानक जाण्याने सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्रात पोकळी निर्माण झाली असून,समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.अंत्यसंस्कारावेळी हजारो नागरिकांनी अश्रू नयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# आपटे वाचन मंदिरतर्फे जिल्हा साहित्य संमेलनाचे आयोजन

■ इचलकरंजी,ता.१८–

**येथील शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी आपटे वाचन मंदिरच्या वतीने १३ डिसेंबर रोजी एक दिवसीय जिल्हास्तरीय साहित्य संमेलन इचलकरंजीत आयोजित आले आहे.**

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या वतीने यावर्षी कोल्हापूर जिल्ह्यासाठी साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी आपटे वाचन मंदिरची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या विद्यमाने हे साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार असून सुप्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत प्रा. सुनीलकुमार लवटे हे या संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

माजी परराष्ट्र सचिव आणि लेखक डॉ. ज्ञानेश्वर मुळे संमेलनाचे उद्घाटन करतील. संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रकाश आवाडे भूषवणार आहेत. या संमेलनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने लेखक प्रवीण बांदेकर, कवी श्रीधर नांदेडकर, लेखक डॉ.मिलिंद कुलकर्णी हे निरीक्षक म्हणून उपस्थित असतील.

समारोपास साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ज्येष्ठ सदस्य प्रा.अविनाश सप्रे उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात कोल्हापूर जिल्ह्यातील राजन गवस, कृष्णात खोत,किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ या साहित्य अकादमी विजेत्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. दोन प्रकाशक आणि दोन पुस्तक विक्रेते यांचाही प्रातिनिधिक सन्मान केला जाणार आहे. 'बदलते सामाजिक वास्तव आणि मराठी साहित्य' असा साहित्य संमेलनाचा विषय आहे. या संमेलनासाठी शासकीय अधिकारी, साहित्यिक, वक्ते, कलावंत, जिल्ह्यातील ग्रंथालय प्रतिनिधी उपस्थित राहणार असून सर्व साहित्य प्रेमी आणि वाचन प्रेमी रसिकांनी तसेच शाळा, महाविद्यालय मधील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी या संमेलनात उत्साहाने सहभागी व्हावे असे आवाहन आपटे वाचन मंदिरच्या अध्यक्ष सुषमा दातार यांनी केले आहे.

# दहावी,बारावी बोर्ड परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर

■ कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी– मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२७ ला तर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र म्हणजे इयत्ता दहावीची परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च, २०२७ या दरम्यान होणार असल्याचे राज्य मंडळाचे सचिव डॉ.दिपक माळी यांनी जाहीर प्रकटनाव्दारे सांगितले.**

शाळा व कनिष्ठ महाविद्यालय तसेच विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याच्या हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याच्या दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२७ च्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर करण्यात येत असल्याचे मंडळाव्दारे सांगण्यात आले.

# वृत्तपत्र विक्रेत्यांचे नऊ आक्टोबरला राज्यभर मोर्चे

## कल्याणकारी मंडळासाठी आंदोलनाची हाक

■ कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)–

**स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या अंमलबजावणीसाठी ९ ऑक्टोंबरला राज्यात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर परिवारासह मोर्चा काढण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य विक्रेता संघटनेच्या कार्यकारिणी बैठकीत करण्यात आला.**

राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली व कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर म्हणाले, गेली अनेक वर्षे संघटनेच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळासाठी संघटना प्रयत्न करत आहे. अनेक निवेदने, आंदोलने, बैठका झाल्या. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षापूर्वी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची घोषणा केली.मात्र अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. या कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आता रस्त्यावरची लढाई करावी लागेल.

उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांच्या चर्चेनंतर पाटणकर यांनी आंदोलनाची घोषणा केली.

बैठकीस रविंद्र कुलकर्णी, विनोद पन्नासे, दिनेश उके, चंद्रकांत घाटोळ, बाबू जलदेवार, वर्धा संघटनेचे दत्तात्रय सगर, विशाल रासनकर, दिपक वाघमारे, नरहरी लिंगायत, शिवाजी वाकोडे परभणी,अंकुश परब, सुरेश चौगुले, परशराम सावंत, राजाराम पाटील, रविराज शेटे, उत्तम चौगुले सांगोला आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह जिल्हाध्यक्ष, सचिव उपस्थित होते.

# कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता मोहिम

■ कोल्हापूर,ता.१८ (प्रतिनिधी)–

**सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्यासह कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबविली.**

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अजय पवार, निवासी उप जिल्हाधिकारी गजानन गुरव, उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिल्लारी, उपजिल्हाधिकारी शक्ती कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण, तहसीलदार नाथाजी सकट, नायब तहसीलदार दिगंबर सानप, नितीन तापसे पाटील, नम्रता शिराणी व विविध शाखांचे अधिकारी–कर्मचारी तसेच महानगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड म्हणाले, सेवा संकल्प अभियान संपूर्ण जिल्हाभर राबवण्यात येत असून, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत साचलेला कचरा, प्लास्टिक जमा करण्यात आले. तसेच परिसरातील झाडे–झुडपे छाटून परिसर निट नेटका करण्यात आला. महसूल विभागामार्फत संपूर्ण जिल्हाभरात जिल्हाधिकारी कार्यालयापासून ते तलाठी कार्यालयापर्यंत ही स्वच्छता मोहीम राबविली जात असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिळून जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर स्वच्छ केला.

# विभुती संकपाळची जवाहर नवोदय विद्यालयात निवड

■ हुपरी,ता.१८–



**विद्यामंदिर मानेनगर, रेंदाळ या शाळेची इ. ५ वीची विद्यार्थीनी विभुती धनाजी संकपाळ हिची जवाहर नवोदय विद्यालय (कागल) येथे निवड झाली. सन २०२६–२७ मध्ये इ. ६ वीच्या वर्गात तिला प्रवेश मिळाला आहे.**

या यशासाठी विभुतीला शिक्षिका श्रीमती अर्चना भरते यांचे मार्गदर्शन लाभले. विभुतीच्या या यशाबद्दल शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थांनी तिचे कौतूक केले आहे.

## जाहीर नोटीस

मौजे कबनुर येथील गट नंबर ९२९ / अ पैकी क्षेत्र ११४.३५ चौरस मिटर ची जागा मिळकत यासी चतु:सिमा– पुर्वेस– श्री सचिन पाटील व अजित पाटील यांची मिळकत. पश्चिमेस – २० फुट रस्ता. दक्षिणेस– श्री शारव्वा जत्ती यांची मिळकत. उत्तरेस – सिमा गावीत यांची मिळकत. सदरची मिळकत श्री.राकेश सुभाष आलुगडे रा.कोल्हापुर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही.

ता. १७/०९/२०२६.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं.९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णनः जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील गट नं. ७४७ /अ यापैकी लिहून देणार यांचे मालकीची क्षेत्र हे.०.२०.०० आर यापैकी प्लॉट नं. A३ चे क्षेत्र ९९१.९२ चौ.फुटची खुली जागा मिळकत. यासी चतुःसिमा : पुर्वेस: प्लॉट नं. A२ ची मिळकत. पश्चिमेस–प्लॉट नं. A४ ची मिळकत.दक्षिणेस :चंद्रकांत पटेल यांची मिळकत. उत्तरेस : २० फुट रूंदीचा रस्ता. सदरची मिळकत १ ) युवराज सदाशिव खाडे रा. मल्लेवाडी, वगैरे ५ यांचे कब्जे मालकीची असून यांचेकडून राजेंद्र शिवा सुळकुडे रा. शहापूर यांनी खरेदीपूर्व करारपत्राने घेतलेली मिळकत आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून करारपत्र करून दिलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही दि. १८/०९/२०२६.

**ॲड.बाबासो एम. पाटील**
१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी,इचलकरंजी.
मो.नं. ९२२६८८७००१

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ३४९ पैकी प्लॉट नंबर २५ व २६ चे एकत्रित क्षेत्र ४२४९ चौरस फुटची मिळकत सर्व यासी चतु:सिमा– पुर्वेस – प्लॉट नं.२४, पश्चिमेस – प्लॉट नं. २७, दक्षिणेस– गट नं. ३५० उत्तरेस – २० फुट रस्ता, सदरची मिळकत ही श्री प्रशांत आत्माराम केरले रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.१६/०९/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं.९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णनः जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील गट नं. ६३९,६४१,६४२,६४३ यापैकी गट नं. ६४१ मधील बिगरशेती प्लॉट नं. ३६चे क्षेत्र १०३३ चौ. फुट ९६.०० चौ.मी.ची खुली जागा मिळकत. यासी चतुः सिमा : पुर्वेसः प्लॉट नं. ३५ ची मिळकत. पश्चिमेस: प्लॉट नं. ३७ ची मिळकत. दक्षिणेस : ३ मीटर रूंदीचा रस्ता. उत्तरेस : प्लॉट नं. ३३ ची मिळकत. गजानन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. तारदाळ यांचे मालकीची असून संस्थेने सदर मिळकत आनंदा शंकर खचनाळे रा. इचलकरंजी यांना ॲलोट केलेली आहे. व त्यांचेकडून राजेंद्र शिवा सुळकुडे रा. शहापूर यांना खरेदीपुर्व करारपत्राने घेतलेली मिळकत आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून खरेदीपुर्व करारपत्र करून दिलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही दि. १८/०९/२०२६.

**ॲड.बाबासो एम. पाटील**
१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी,इचलकरंजी.
मो.नं. ९२२६८८७००१

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन :– जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मुळची शहापूर येथील व सध्या का। इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या मिळकतीचा क.ग.नं. १७६ याचा सि.स.नं. १८३५४/२०/पैकी प्लॉट नं. १० क्षेत्र १००.२८१ चौ.मी. याचे १०७९ चौ. फुटाची खुली जागा यांसी चतु:सिमा पुर्वेस– प्लॉट नं. ११ ची मिळकत, पश्चिमेस–प्लॉट नं.९ ची मिळकत,दक्षिणेस– ९ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस–सदर गट नंबर पैकी शिल्लक मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री विकास लक्ष्मीनारायण धुत, श्री वाजीद मुसा तासगावे, श्री गणेश विठ्ठल कारके, श्री राहूल बाळू सावरतकर व श्री विजय आप्पासो दशिंगे, रा. इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत करारपत्राने विक्री करणेचे ठरले आहे.सबब,वर नमुद मिळकती बाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज,आरक्षण, तारण गहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता. १८/०९/२०२६ इ.रोजीचे.

**ॲड.सुनिल सु. धुपदाळे**
रा.१७/२९४ पुजारी मळा,राजमातानगर इचलकरंजी
मो.नं. ९३२६०२२३८५

बीड,ता.१८–पावसाने दडी मारल्याने बीड जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

सोयाबीन,कापूस, मूग, उडीद आणि तूर यांसारखी पिके करपून गेली आहेत.अशातच अंबाजोगाई येथे शुक्रवारी पहाटे जोरदार पावसाने हजेरी लावल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ३५८ पैकी क्षेत्र हे.०.१९ आर ची जागा मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस – श्री परशराम जाधव यांची मिळकत. पश्चिमेस– श्री. अनिलकुमार जैन व श्री. कोपार्डे यांची मिळकत. दक्षिणेस– श्री विठ्ठल जाधव यांची मिळकत. उत्तरेस – ३३ फुट सरकारी रस्ता सदर ची मिळकत श्री. राजेंद्रकुमार नेमीचंद जैन रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री.मनिष जुगलकिशोर मणियार. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे अशिलांकडून संचकार रक्कम संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १७/०९/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं.९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

शहर इचलकरंजी येथील रि.स.नं. ६५६/१ अ पैकी प्लॉट नं. २ चे क्षेत्र १८३६ चौरस फुट ची जागा मिळकत. यासी चतुः सिमा– पुर्वेस – ३० फुट रस्ता, पश्चिमेस–कलावंत यांची मिळकत, दक्षिणेस–२० फुट रस्ता, उत्तरेस– बी.एन.पाटील यांची मिळकत. सदर मिळकत ही अनिल महादेव पाटील रा. खोतवाडी यांचे कब्जे वहिवाटीची मिळकत असुन यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी संचकार पावती केलेली आहे. सदर मिळकती संदर्भात आय सी आय सी आय या बँकेव्यतिरिक्त कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.१७/०९/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं.९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नंबर ३९८ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर ४० याचे एकूण चौरस फुट १२०९.० याचे चौरस मिटर ११२.४२० ची जागा यांसी चतुः सिमा पुर्वेस–९ मीटर रूंदिचा रस्ता, पश्चिमेस–प्लॉट नंबर ३२ ची मिळकत दक्षिणेस–प्लॉट नंबर ३९ ची मिळकत, उत्तरेस प्लॉट नंबर ४१ ची मिळकत. याप्रमाणे चतु:सिमेतील जागा ही श्री रामस्वरूप नरसिंगलाल पुरोहित (पारीक) व सौ. उर्मिला रामस्वरूप पुरोहित (पारीक) रा. १८/२५३ इचलकरंजी यांच्या मालकीची असुन ती त्यांनी आमचे मित्र यांना करारपत्राने दिलेली आहे व सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा पुरोहित (पारीक) यांनी निर्वाळा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही करार, कर्ज, बोजा, गहाण, दान, वाटणी, हिस्सा वगैरे अधिकार असलेस आजपासुन सात (७) दिवसाचे आत खाली दिले पत्त्यावर पुराव्याचे कागदोपत्रानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत तक्रार न आल्यास मुदतीनंतर कसलीही तक्रार अगर हरकत आमचे मित्र यांचेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १७/०९/२०२६ इ.

**श्री. संजय मारूती घोरपडे (स्टँप रायटर),**
राजाराम स्टेडीयम, रजिस्टर ऑफिसजवळ, इचलकरंजी.
मो. नं. ९६२०८७९६९६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ३२० पैकी प्लॉट नं. १७८ चे क्षेत्र–७४–३४ चौ. मी. खुली जागा व घर मिळकत सर्व. यासी चतुःसिमा पुर्वेस– सदर गट नं. ची मिळकत, पश्चिमेस– ४.५ मीटर रस्ता, दक्षिणेस– प्लॉट नं. १७७ची मिळकत, उत्तरेस– प्लॉट नं. १७९ ची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही संभाजी तातोबा सपकाळे यांनी माया संदिप खापरे यांना बँक ऑफ बडोदा यांचेकडील सेल सर्टिफीकेटने दिलेली व त्यांचेकडुन दिपमाला महावीर प्रसाद शर्मा (दायमा) रा. इचलकरंजी यांनी करारपत्राने घेतलेली असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस.

सही ता.१८/०९/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन–जिल्हा कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी म.न.पा. हद्दीतील शहापूर येथील क.ग.नं.१७६ याचा सि.स.नं. १८३५४/२० पैकी प्लॉट नं. ९ क्षेत्र १००.२८ चौ.मी. ची खुली मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस :– प्लॉट नं. १०ची मिळकत. पश्चिमेस :–प्लॉट नं.८ ची मिळकत, दक्षिणेस :– ९ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस:–सदर गट नंबरपैकी शिल्लक मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट मिळकत त्यातील तदंगभूतवस्तु व इजमेंटचे हक्कासहची मिळकत.२)वर नमूद मिळकत ही श्री. विकास लक्ष्मीनारायण धुत, वाजिद मुसा तासगावे, गणेश विठ्ठल कारके, राहूल बाळू सावरतकर व विजय आप्पासो देशिंगे सर्व रा.इचलकरंजी यांचे मालकी, कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून त्यांचेशी करार करून संचकार रक्कम स्विकारलेली आहे.

३) सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध दावा, पोटगी, तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, करार मदार, आरक्षण वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून पाच (५) दिवसाचे आत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावा. मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही म्हणून दिली नोटीस.

ता.१८/९/२०२६.

**ॲड.सारंग सुरेश जोशी**
शिवप्रसाद १९/२४१,कमला नेहरू हौसिंग सोसायटी, इचलकरंजी. मो.नं.८१४९०१७०७७.

# सेवा संकल्प अभियानाला शाहूवाडी पं.समितीतून सुरुवात

मलकापूर,ता.१८(प्रतिनिधी)–

**सेवा संकल्प अभियानांतर्गत पंचायत समिती शाहूवाडीच्या कार्यालय परिसरात श्रमदान करून स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. सदर अभियान एक महिना राबविण्यात येणार आहे.**

पंचायत समितीच्या सभापती प्रियांका तानाजी भोसले, उपसभापती अमरसिंह नारायण खोत व गटविकास अधिकारी मंगेश रमेश कुचेवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे सदस्य तसेच शाहूवाडी तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एच. आर. निरंकारी, उपअभियंता अक्षय देसाई, बाल विकास प्रकल्प अधिकारी राहुल निपसे, शाखा अभियंता डी. एस. कांबळे, कनिष्ठ अभियंते बाबासाहेब कोळी, उत्कर्ष शितोळे, कृषी विस्तार अधिकारी अंकुश गोरे यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी यांनी श्रमदानात सहभाग घेतला. अभियानाच्या माध्यमातून कार्यालय परिसरासह विविध ठिकाणी स्वच्छता, जनजागृती व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळणेकरिता,

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील इचलकरंजी येथील रि.स.नं. ४२६/१ क, यामधील गुंठेवारी झालेले क्षेत्र हे. ०.१४.५ आर यामधील गुंठेवारी भूखंड क्र. ५अ, याचे क्षेत्र २१८.२५ चौ.मि.ची खुली गुंठेवारी बिगरशेती प्लॉट मिळकत, ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र हे. ०.०२.१८ यासी चतु:सिमा–पूर्वेस ४० फूट रूंदीचा रस्ता, पश्चिमेस श्री. भंडारी यांची मिळकत, दक्षिणेस भूखंड क्र. ५ ब ची तळंदगे यांची मिळकत, उत्तरेस भूखंड क्र. ३ ची डॉ. शहा यांची मिळकत व भूखंड क्र.४ ची रामगोंडा पाटील यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही सौ.सरिता रावसाहेब पाटील, रा. इचलकरंजी यांच्या मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून भरीव संचकार रक्कम स्विकारली आहे. वर नमूद मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेची हमी वरील मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिली आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री, करार,दावा,कब्जा,कूळ, तारणगहाण,बक्षीस, वाटणी, वारसा, वहिवाट, पोटगी, आरक्षण, संपादन, अन्य कोणाचा कर्ज, देणी अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्कसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काच्या कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर द्यावी. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही तारीख १८/०९/२०२६ इ. रोजी.

**ॲड.सुनिल जे.विभुते**
१३/११२७/२, महर्षि वाल्मिकी सोसायटी, पुजारी मळा, जुना चंदूर रोड, इचलकरंजी, मो.९८८१७०३८३८

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ, ता. हातकणंगले येथील क.ग.नं. ६३५ यापैकी भुखंड क्र. ३ ए चे क्षेत्र १६६–२७चौ.मी. ची खुली जागा मिळकत सर्व. यांसी चतुःसिमा पुर्वेस– २० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस–भुखंड क्र. ३ सी ची मिळकत, दक्षिणेस– भुखंड क्र. ३ बी ची मिळकत, उत्तरेस– भुखंड क्र. २ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील बिगरशेती खुली जागा मिळकत सर्व ही सविता नागेश पाटील रा. तारदाळ यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिल यांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवुन सदर ठरले व्यवहारापोटी खरेदीपुर्व करारपत्र करुन देवुन संचकार रक्कम स्विकारली आहे.सदर वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा पाटील यांनी आमचे अशिल यांना दिलेला आहे.

सदर वरील मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, करार, लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलाही हक्क,अधिकार,वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रासह समक्ष भेटून खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे अशिल वरील मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण करुन घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

दि.१८/०९/२०२६.

**ॲड.बाबासो एम.पाटील**
१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी,इचलकरंजी.
मो.नं. ९२२६८८७००१

## जाहीर समज

सर्व लोकांना कळणेकरीता,

मौजे कबनूर येथील गट नंबर ६१० मधील ५१७५ चौरस फुटाची तुकडा नंबर २४ व तुकडा नंबर २५ ची प्लॉट मिळकत व त्यावरील घर मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. शौकत युसूफ मुजावर यांनी इचलकरंजी येथील दिवाणी न्यायालयात रे.क.नं. २१५/२०२६ चा खरेदीपत्र पूरे होऊन मिळणेचा, हक्कज्ञापनाचा व कायम मनाई ताकीदीचा दावा श्री. महमंदहनिफ बाबालाल शिरहट्टी वगैरे ७ यांचे विरुध्द दाखल केला असून सदर दावेचे कामातील मनाई अर्जावर मे.कोर्टानी कारणे दाखवा चा हुकूम केला आहे. सदर काम मे. न्यायाधिशसो गायकवाड मॅडमसो, यांचे कोर्टात दावा पेडींग असून सदर कामी श्री.महमंदहनिफ बाबालाल शिरहट्टी वगैरे हे हजर झाले आहेत, मात्र अद्याप म्हणणे दिले नाही. सदर दावेची माहिती असताना श्री.महमंदहनिफ बाबालाल शिरहट्टी वगैरे, प्रतिवादी नं. ७ मिळकतीचे मूळ मालक यांचे संगनमताने मिळकतीच्या सरकारी कागदोपत्री फेरबदल करणेच्या हालचालीत आहेत.

सबब सदर दावेतील व वर नमूद नोटीसीत नमूद केले मिळकतीबाबत कोणीही कोणताही खरेदी, विक्री, कर्ज बोजा अगर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. तसा व्यवहार केलेस तो मे. कोर्टातील दावेस व मनाई अर्जास बाधा पोहचवणारा होणार आहे. इतकेच नव्हे तर सदर बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्यास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. सबब पेडींग असलेल्या दावेची समज व्हावी, म्हणून प्रसिध्द केली जाहीर नोटीस सही तारीख :– १८/०९/२०२६

**ॲड.सुभाष ए.येलपले**
१२/२२७, साई शिवाजीनगर इचलकरंजी. मो.९८२२३२१३५७

# रेंदाळसह १५ गावांच्या गावठाणची मोजणी होणार

हुपरी,ता.१८(वार्ताहर)–

**हातकणंगले विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून गावठाण भागाची अधिकृत मोजणी न झाल्याने रखडलेला प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे. आम.डॉ.अशोकराव माने यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मतदारसंघातील रेंदाळसह १५ गावांची तात्काळ आणि मोफत गावठाण मोजणी होणार असून,हुपरी नगरपरिषद हद्दीतील प्रलंबित सिटी सर्व्हे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.**



मतदारसंघातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये मिळकतधारकांच्या केवळ १९७० च्या जुन्या नोंदी उपलब्ध आहेत. भूमी अभिलेख विभागामार्फत प्रत्यक्ष सिटी सर्व्हे मोजणी न झाल्याने नागरिकांच्या नावांची नोंद नगर भूमापन मालमत्ता पत्रकावर झालेली नव्हती. प्रॉपर्टी कार्ड नसल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना बँकांकडून गृहकर्ज, व्यावसायिक कर्ज मिळण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. तसेच प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ घेताना मालकी हक्काचा कायदेशीर पुरावा देणे कठीण जात होते आणि जमिनीच्या खरेदी–विक्री व्यवहारातही फटका बसत होता.या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आमदार डॉ. माने यांनी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,कोल्हापूर यांच्याकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. त्यानुसार आता रेंदाळ, इंगळी, रुई, साजणी, तिळवणी, अतिग्रे, माणगाव, रांगोळी, पारगाव, यळगुड, पट्टणकोडोली, दुर्गेवाडी, तळंदगे, आळते आणि शिरोली (पु.) या १५ गावांमध्ये प्रत्यक्ष गावठाण मोजणी प्रक्रियेला गती मिळणार आहे.

■ प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न मार्गी लागणार

■ हुपरीचा सिटी सर्व्हे करण्याचे निर्देश

दुसरीकडे, हुपरी ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपरिषदेत झाल्यानंतरही प्रभाग क्र. ५ ते ९ या भागातील सिटी सर्व्हे प्रलंबित राहिला होता. प्रशासनाने आता हुपरीचा हा प्रलंबित सिटी सर्व्हे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे हजारो मिळकतधारकांना मोठा दिलासा मिळाला असून, या कामासाठी भाजप जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सचिन मेथे व अशोक महाजन यांनीही पाठपुरावा केला आहे.

## स्वयं खोतचे बुध्दिबळ स्पर्धेत यश

हातकणंगले,ता.१८(प्रतिनिधी)–



रत्नदीप हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कबनूरतर्फे आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत सेंट पॉल्स इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी स्वयं गुरुदास खोत याने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले.

त्याला शाळेचे चेअरमन राजकुमार राव व सेक्रेटरी महेश राव तसेच शाळेच्या प्रिन्सिपल वृषाली मगदूम तसेच क्रीडाशिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.स्वयंची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



बॉक्सिंग स्पर्धेतील यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक.

## डीकेटीई इंग्लिश मीडियम हायस्कूलचे बॉक्सिंग स्पर्धेत यश

इचलकरंजी,ता.१८–

**येथील डी.के.टी.ई. सोसायटीचे, इंग्लिश मीडियम हायस्कूलने इचलकरंजी महानगरपालिका शालेय शासकीय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत यश संपादन केले.**

या स्पर्धेत १९ वर्षाआतील मुलांमध्ये आदित्य रुग्गे,देवराज गळतगे, रोहित पाथरवट,प्रज्वल तुरंबेकर, जितेंद्र जाट,विकास चौधरी, सिद्धेश कित्तूरकर, नवेद शेख,प्रथमेश रुग्गे,ऋग्वेद एकांडे, विष्णु चौधरी. १९ वर्षाआतील मुलींमध्ये मैथिली राऊळ, मैथिली कुंभार, श्रावणी ठोंबरे, सारंगी साने, खूशबू सिंग, समिक्षा मडीवाळ. १७ वर्षाआतील मुलांमध्ये चिन्मय कदम, वरद स्वामी, सनी गुप्ता, आर्यन सोनवणे, रेहान बागवान. १७ वर्षाआतील मुलींमध्ये सोनाक्षी सिंग,अनुष्का गोंदुकुप्पे,तन्वी शिंदे, शांभवी कुलकर्णी, वेदिका फुटाणे, मनस्वी घुबडे. १४ वर्षाआतील मुलांमध्ये राहत सोलापुरे, उत्कर्ष भंडारे, अवनीश आभाळे यांना गोल्ड मेडल व प्रमाणपत्र प्राप्त झाले. यशस्वी खेळांडूना क्रीडा शिक्षक अरविंद गावडे, सौ.स्नेहा लेले यांचे मार्गदर्शन तर मुख्याध्यापिका सौ.भारती कासार यांचे प्रोत्साहन लाभले.सदर खेळाडूंचे,मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन कल्लाप्पाण्णा आवाडे, व्हा.चेअरमन प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सौ.सपना आवाडे, सौ. रेवती आवाडे, संस्थेचे सर्व व्यवस्थापन समिती सदस्य यांनी अभिनंदन केले.



हिंदी दिन कार्यक्रमात प्रतिमा पूजनप्रसंगी हबीब खान,आर.एन.आळतेकर व अन्य शिक्षक वर्ग.

## साई इंग्लिश स्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा

इचलकरंजी,ता.१८–

**येथील श्री साई शिक्षण संस्थेच्या साई इंग्लिश स्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम प्रमुख पाहुणे प्रोफेसर हबीब खान यांच्या हस्ते व मुख्याध्यापक आर.एन.आळतेकर व मिलिंद कांबळे यांच्या उपस्थितीत सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**

हिंदी दिनानिमित्त भित्ती पत्रकाचे आयोजन केले होते. प्रास्ताविक नाजनीन नदाफ यांनी करुन हिंदी भाषेचे महत्व सांगून हिंदी भाषेचा विकास कसा झाला.या विषयी आपले मत व्यक्त केले.तर प्रोफेसर खान यांनी हिंदी भाषेचे महत्व सांगून वाचनामुळे आपला मानसिक विकास कसा होतो हे उदाहरणाद्वारे सांगितले.मिलिंद कांबळे यांनी हिंदी भाषेविषयी विचार प्रकट केले तर मुख्याध्यापक आर.एन.आळतेकर यांनी भाषेविषयी आपले विचार मांडले.यानंतर विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ.महादेव नरके यांची आयएसटीईच्या सदस्यपदी निवड

कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)–



**कसबा बावडा येथील डी.वाय. पाटील पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.महादेव नरके यांची नवी दिल्लीच्या इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) या संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारी परिषद सदस्यपदी (नॅशनल एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल मेंबर) दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे.**

डॉ.नरके यांच्या या निवडीमुळे डी. वाय. पाटील ग्रुपला राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय डी.पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ.ए.के.गुप्ता यांनी त्यांचे अभिनंदन केले.या निवडीसाठी आयएसटीईचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या संधीच्या माध्यमातून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी काम करून आयएसटीई आणखी नावारूपाला आणू,असा विश्वास डॉ.नरके यांनी व्यक्त केला.



## कै.बी.एच.पाटील दूध संस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

टाकवडे,ता.१८(प्रतिनिधी)–

**टाकवडे (ता.शिरोळ) येथील कै. बी. एच. पाटील दूध व्यवसायिक संस्थेची ३४ वी वार्षिक सभा करवीर देवालयाच्या हॉलमध्ये संपन्न झाली. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन यशवंत पाटील हे होते.**

प्रारंभी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अहवाल वाचन संस्थेचे सचिव संजय पाटील यांनी केले. सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.संस्थेच्या दूध उत्पादक सभासदांना आकर्षक बक्षीस व भेटवस्तू देण्यात आली. दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्यावतीने बक्षीस देऊन गौरवण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष यशवंत पाटील यांनी मनोगतामध्ये संस्थेचा झालेला विकास सांगून संस्था स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्ये कार्यरत असून दूध उत्पादकांनी संस्थेस सहकार्य करावे,असे आवाहन केले.यावेळी संस्थेचे सभासद, कर्मचारी वर्ग व नागरिक उपस्थित होते. देवगोंडा पाटील यांनी आभार मानले.

# हँडबॉल स्पर्धेत गोविंदराव व मणेरे हायस्कूलचे वर्चस्व

इचलकरंजी,ता.१८–

**इचलकरंजी महानगरपालिका जिल्हास्तर शालेय शासकीय हँडबॉल स्पर्धेत येथील गोविंदराव हायस्कूलच्या १७ वर्षाखालील मुले व मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले.**

या स्पर्धा नुकत्याच गोविंदराव हायस्कूल,इचलकरंजी येथे पार पडल्या.१४, १७व१९ वर्षाखालील मुले व मुली अशा गटांमध्ये ही स्पर्धा खेळवण्यात आली.बाद फेरी पद्धतीने खेळवल्या गेलेल्या या स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुले यांच्या अंतिम सामन्यात गोविंदराव हायस्कूलने डीकेटीई इंग्लिश मीडियम स्कूलवर ५–० व मुलींच्या अंतिम सामन्यात गोविंदराव हायस्कूलने मराठी मीडियम हायस्कूलवर ६–० अशी एकतर्फी मात करून या दोन्ही गटांचे विजेतेपद गोविंदराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या संघाने पटकावले.तर १४ वर्षाखालील मुलांच्या गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच १४ वर्षे मुलींच्या अंतिम सामन्यात मणेरे हायस्कूलने मराठी मीडियम हायस्कूलवर व १९ वर्षाखालील मुलींच्या अंतिम सामन्यात मणेरे हायस्कूलने श्रीमंत गंगामाई गर्ल्स स्कूलवर मात करून या दोन्ही गटाचे विजेतेपद हे मणेरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या शाळेने पटकावले तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटात तृतीय क्रमांक प्राप्त करीत या दोन्ही शाळांनी या स्पर्धेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.



जिल्हास्तर हँडबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी कृष्णाजी बोहरा, संजय शेटे यांसह अन्य मान्यवर व विद्यार्थी.

प्रारंभी या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ श्री ना.बा.एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन कृष्णाजी बोहरा यांच्या हस्ते पार पडला. यावेळी इचलकरंजी महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी संजय शेटे, शेखर शहा, गोविंदराव हायस्कूलचे मुख्याध्यापक एस.व्ही.पाटील, उप मुख्याध्यापक ए.बी.कांबळे, पर्यवेक्षक ए.एम.जामदार, एस. बी.बखेडी,ए.आय.बाणदार, अमित कागले, संदीप लाड, राहुल जोशी आदिंची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ.आर.पी. कुलकर्णी यांनी तर अमितकुमार पाटील यांनी आभार मानले.



## शिरोळ तालुका माध्यमिक शाळा सेवक पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

कुरुंदवाड,ता.१८ (प्रतिनिधी)–

**येथील शिरोळ तालुका माध्यमिक शाळा सेवकांची सहकारी पतसंस्थेची ४६ वी वार्षिक सभा विक्रांत मल्टीपर्पज हॉल तेरवाड रोड येथे पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सभापती सुनील कांबळे हे होते.**

प्रारंभी सभापती सुनील कांबळे यांनी स्वागत करून अहवाल सादर केला.संस्थेचे भाग भांडवल एक कोटी ६० लाख ४१ हजार, ठेवी १५ कोटी ७० लाख २५ हजार, कर्ज १४ कोटी २४ लाख ५८ हजार, थकबाकी शून्य टक्के, नफा ३० लाख २८ हजार ५०३ इतका झाला असून १३ टक्के लाभांश जाहीर केला. विषय पत्रिकेचे वाचन चिटणीस संजय पोद्दार यांनी केले.सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दिली.सभेस उपसभापती रियाज जमादार व सर्व संचालक, सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

# पै.बंडामामांवर औषधोपचारासाठी लाखाची मदत



पै.बंडा पाटील–रेठरेकर यांना आ.सतेज पाटील यांच्याकडून एक लाखाची मदत देण्यात आली त्यावेळी उपस्थित मान्यवर.

## आ.सतेज पाटील यांचा पुढाकार

कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)–

**मामा तुम्ही काळजी करू नका, तुम्ही लवकर बरे व्हाल. तुम्हाला बरं करण्यासाठी, लागेल ते औषध उपचार करण्यासाठी तुमच्या पाठीशी सदैव आहे,अशी ग्वाही देत जिल्ह्याचे नेते काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी बंडा पाटील (मामा) यांची चौकशी केली.**

शाहूवाडी तालुक्यातील रेठरे येथील १९६४ च्या टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलेले पैलवान बंडा पाटील–रेठरेकर यांच्या आजारपणाबाबत आमदार सतेज पाटील यांनी आस्थेने विचारपूस करून एक लाखाची मदत दिली. तसेच उपचारासाठी त्यांना डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यास मोफत उपचार केले जातील, अशी ग्वाही दिली.

दरम्यान,बंडा पाटील मामा यांचे चिरंजीव दिनेश पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितलं की, सतेज पाटील यांनी दोन वर्षांपूर्वी देखील आम्हाला मामांच्या आजारपणात फार मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांनी त्यावेळी देखील आम्हा कुटुंबियांना आधार देऊन मामांना औषध उपचारसाठी सहकार्य केलं होतं आणि आज पुन्हा एकदा त्यांनी स्वतः मामांशी संवाद साधला आणि मामांना लागेल तो औषध उपचार करण्याची ग्वाही दिली. हे आमच्यासाठी खूप अनमोल आहे.

# अतिग्रेतील प्राचीन हनुमान मंदिराला 'ब' वर्गचा दर्जा

हातकणंगले,ता.१८(प्रतिनिधी)–

**अतिग्रे गावच्या प्राचीन हनुमान मंदिराला शासनाचा 'ब' वर्ग दर्जा प्राप्त झाल्याचा शासन निर्णय ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आमदार अशोकराव माने आणि सरपंच सुशांत वड्ड यांना देण्यात आला आहे.**

अतिग्रेच्या हनुमान मंदिराची उभारणी रामदास स्वामी यांनी केली होती. या मंदिराला शासनाचा 'ब' वर्ग दर्जा मिळावा यासाठी गेली अनेक वर्ष ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी पाठपुरावा करत होते. अतिग्रेचे लोकनियुक्त सरपंच सुशांत वड्ड आणि ग्रामपंचायत सदस्य यांनी गेली दोन वर्ष चिकाटी ठेवत पाठपुरावा करून 'ब' वर्ग दर्जा मिळविल्याबद्दल ग्रामस्थांतून आनंद साजरा केला जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जनसुराज्य पक्षाचे आमदार विनय कोरे, खासदार धैर्यशील माने , आमदार अशोकराव माने यांच्या सहकार्यामुळे हा निर्णय शक्य झाल्याचे ग्रामस्थाचे मत आहे.



'ब'वर्ग दर्जाचा शासन निर्णय ग्रामविकास मंत्र्यांच्या हस्ते स्विकारताना आम.अशोकराव माने,सरपंच सुशांत वड्ड व इतर.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १८/०९/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वा.
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
महकता बदन
नॉटी आँटी
७ वा.
A प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १८ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
टोकीओ ड्रीफ्ट
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A







गुरु
शुक्रवार,ता. १८ पासून रोज ४ खेळ
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२.३०*३.३०*६.३०*९.३० वा.
जेन – Z चा आक्रोश व संतप्त
तरुणाईचा एल्गार शहरात घुमणार



जयंती – २ (मराठी चित्रपट)

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow




"हनुमान अंश" (हिंदी)
01:30 PM, 04:15 PM
07:15 PM, 09:45 PM
"मिर्झापूर: द मूव्ही" (हिंदी)
01:00 PM, 03:30 PM
06:45 PM, 10:15 PM
"रेसिडेंट ईविल" (हिंदी)
11:00 AM, 04:45 PM
10:30 PM
"व्हाइब" (हिंदी)
10:30 AM, 12:30 PM
07:00 PM
डॉल्बी ॲटमॉस आणि 7.1 जेबीएल (JBL) साऊंड सिस्टीममध्ये सिनेमांचा थरार अनुभवा!
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11




वाइब (HIN) (A)
11.00am, 03.30, 10.00pm
हनुमान अंश (HIN) (U)
12.30, 07.30, 10.15pm
मिर्झापूर: द मूव्ही (HIN) (A)
11.30am, 03.30, 06.30, 10.30pm
रेसिडेंट ईव्हिल (HIN) (A)
10.30am, 05.00pm
जयंती 2 (MAR) (U/A)
02.00, 07.00pm
आता पहा कोणताही मूवी शो फक्त 100 पासून पुढे








**सातारा गणेश दर्शन**

१) सातारा शहराचा मानाचा महागणपती अर्थात सम्राट गणेश मंडळाची भव्य गणेश मूर्ती. २) सोमवार पेठेतील अमृत तरुण मंडळ अर्थात एटीएम ग्रुपची सुरेख गणेश मूर्ती. ३) सोमवार पेठेतील आझाद हिंद मंडळाच्या मानाच्या गणेशाची भव्य मूर्ती लक्ष वेधून घेणारी आहे. ४) यादोगोपाळ पेठेतील अजिंक्यतारा गणेश मंडळाची भव्य सिंहासनावर बसलेली गणेश मूर्ती. ५) मोती चौकातील श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह मंडळाची फेटाधारी गणेश मूर्ती. ६) शेटे चौकातील प्रकाश मंडळाने श्री शंकर पार्वती गणेश ही मानाची गणेश मूर्ती पर्यावरण पूरक बनविली आहे. (छाया-अतुल देशपांडे, सातारा.)








**म्हैसाळ गणेश दर्शन**

१) मोरया मित्र मंडळाचा लालबागचा राजा गणपतीच्या धर्तीवरील गणेश मूर्ती. २) शिवभक्त मित्र मंडळाची दगडूशेठच्या रूपातील गणेश मूर्ती. ३) शिवराज परिवारची जय मल्हार अर्थात खंडोबा महाराजांच्या रूपातील गणेश मूर्ती. ४) जय भवानी मित्र मंडळाची श्रीकृष्णाच्या रूपातील आकर्षक गणेश मूर्ती. ५) वर्चस्व ग्रुपचा चिंतामणी. ६) महाबली ग्रुपची विठ्ठलाच्या रूपातील गणेश मूर्ती. (छाया : श्रीधर जाधव, म्हैसाळ)

# कृष्णा बँकेचा व्यवसाय २००० कोटी रुपयांपर्यंत नेणार-भोसले

कराड,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

**कृष्णा सहकारी बँकेने ५५ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण केली असून, बँकेच्या विस्ताराला गती देण्यासाठी पुढील पाच वर्षांचे नियोजन करण्यात आले आहे. बँकेचा व्यवसाय २००० कोटी रुपयांपर्यंत नेण्याबरोबरच आवश्यक निकष पूर्ण करून रिझर्व्ह बँकेकडे शेड्युल्ड बँकेच्या दर्जासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या दिशेने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत,अशी माहिती बँकेचे चेअरमन आ.डॉ.अतुल भोसले यांनी दिली.**



कराड : कृष्णा सहकारी बँकेच्या वार्षिक सभेत बोलताना चेअरमन आ.डॉ.अतुल भोसले, व्यासपीठावर अन्य मान्यवर.

आटके टप्पा (ता.कराड) येथील विराज मल्टिपर्पज हॉलमध्ये कृष्णा सहकारी बँकेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते बँकेचे संस्थापक सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सभेचा प्रारंभ झाला.

डॉ. सुरेश भोसले यांनी, बँकेची आर्थिक घडी अधिक मजबूत ठेवण्यासाठी ठेवी, कर्जवाटप, भांडवल आणि एनपीए यांचा काटेकोर समतोल आवश्यक असल्याचे सांगितले. शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि रोजगारनिर्मिती यांना केंद्रस्थानी ठेवून बँकेने वाटचाल करावी. ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करीत अधिक सुलभ सेवा देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान जाधव यांनी वार्षिक अहवाल सादर केला. उपाध्यक्ष दामाजी मोरे यांनी स्वागत केले, तर संचालक शिवाजीराव थोरात यांनी आभार मानले.कृष्णा कारखान्याचे उपाध्यक्ष जे.डी.मोरे, संचालक अरविंद पाटील, सुनील पाटील, पाटण अर्बन बँकेचे चेअरमन चंद्रकांत कापसे,माजी जि.प.सदस्य शंकरराव खबाले यांच्यासह बँकेचे संचालक, व्यवस्थापन मंडळाचे पदाधिकारी, सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

**सभासदांना १२ टक्के लाभांश**

वार्षिक सभेत सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. सभेची मंजुरी मिळाल्यानंतर व्यासपीठावरूनच डॉ. सुरेश भोसले यांनी ऑनलाइन प्रणालीद्वारे लाभांशाची रक्कम सभासदांच्या बँक खात्यांवर वर्ग केली.

## गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप

पाटण,ता.१८(प्रतिनिधी)-

**लायन्स क्लब, सातारा एमआयडीसी व सिरम इन्स्टिट्यूट यांच्यावतीने ज्ञानचक्र सायकल प्रकल्प अंतर्गत पाटण तालुक्यातील दुर्गम भागातील ५१ शालेय गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले.**

घाणबी-वाटोळे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शैलेंद्र वैद्य, उज्वल फलटणे,याज्ञसेन पाटणकर, ॲड.करण पाटणकर, महेंद्र कदम, खंडू इंगळे, कुलदीप मोहिते यांच्या उपस्थितीत २५ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप केले. मुख्या. सावळाराम मोरे यांनी आभार मानले. दरम्यान, काठीटेक,वनकुसवडे येथील पद्मावती माध्यमिक विद्यालयातही २६ विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप केले.मुख्या. सुशीलकुमार कांबळे यांनी स्वागत केले.


## यशवंतराव चव्हाण विद्यालयात स्व.पी.डी.पाटील यांना अभिवादन

कराड,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

**कराड उत्तरचे भाग्यविधाते, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक तसेच सह्याद्री शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.पी.डी.पाटील यांचा १८ वा पुण्यस्मरणदिन यशवंतनगर (ता.कराड) येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयात संपन्न झाला.**

विद्यालयाचे ज्येष्ठ लिपिक अर्जुन वीर यांच्या हस्ते व स्व.पी.डी.पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक ए. एस.राऊत, संस्थेचे सचिव एस. डी.चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन के.बी.चव्हाण यांनी केले.दरम्यान, कारखाना कार्यस्थळावरील स्व.पी.डी.पाटील यांच्या स्फूर्तीस्थळावरही अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.



मिरज येथे 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करताना नागरिक.

## मिरजेत 'एक दिवा आशीर्वादाचा' उपक्रमास नागरिकांचा प्रतिसाद

मिरज,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत भाजपा मिरजच्या वतीने 'एक दिवा आशीर्वादाचा' हा उपक्रम कोळेकर मठ, मिरज येथे उत्साहात पार पडला.**

मोदी यांच्या २५ वर्षांच्या सेवाभावी कार्याचा सन्मान आणि विकसित भारताच्या संकल्पाला बळ देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी भाजपा प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाचे सचिव फारुख जमादार, नगरसेवक गणेश माळी,भाजपा सांगली शहर जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब आळतेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिक तसेच माता-भगिनींनी सहभाग घेतला. उपस्थितांनी एकत्रितपणे 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उत्तम आरोग्य,दीर्घायुष्य आणि निरंतर राष्ट्रसेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

## बुद्धिबळ स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

शिराळा,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

**शिराळा तालुका क्रीडा स्पर्धा अंतर्गत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल, शिराळा येथील विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये यश संपादन केले.**

न्यू इंग्लिश स्कूल, शिराळा येथे झालेल्या या स्पर्धेत संपूर्ण तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी, क्रीडाशिक्षक तसेच पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.१७ वर्षांखालील मुलांच्या गटात न्यू इंग्लिश स्कूलच्या हर्षद बनसोडे याने द्वितीय, पार्थ चौगुले याने चतुर्थ, तर कार्तिक रेके याने पाचवा क्रमांक मिळविला.१९ वर्षांखालील मुलांच्या गटात हर्षवर्धन पाटील याने प्रथम, संस्कार गंगाधर याने द्वितीय, मिथिलेश शेटे याने तृतीय, तर ऋषिकेश साळुंखे याने चतुर्थ क्रमांक पटकावला.१९ वर्षांखालील मुलींच्या गटात समीक्षा पाटील हिने द्वितीय, आदिती घोलपे हिने तृतीय, श्रेया देसाई हिने चतुर्थ, तर सृष्टी शिंगटे हिने पाचवा क्रमांक मिळवून शाळेच्या यशात भर घातली.या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत असून, त्यांना क्रीडाशिक्षक अरुण हाके, माणिक गावडे, मुख्याध्यापक अंगराज माजगावकर तसेच पर्यवेक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.

# जिल्ह्यात उमेद मॉल उभारणीचा मार्ग मोकळा

## बहुप्रतीक्षित शासन निर्णय अखेर जारी

सांगली,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

**सांगली जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना कायमस्वरूपी आणि हक्काची बाजारपेठ मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. जिल्ह्यासाठीच्या बहुप्रतीक्षित उमेद मॉल मंजूर झाला आहे.**

याबाबत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने अधिकृत शासन निर्णय जारी केला असून, उमेद मॉल उभारणीच्या दुसऱ्या टप्प्यात सांगली जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे.जिल्ह्यातील हजारो महिला बचतगटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी भक्कम व्यासपीठ निर्माण होणार आहे.

सांगली जिल्ह्यास उमेद मॉल मिळावा यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना मूर्त स्वरूप प्राप्त झाले. या प्रस्तावाला प्रशासकीय पातळीवर गती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले. सांगली शहरात ग्राहकांना सहज पोहोचता येईल, पुरेशी वर्दळ असेल आणि बचतगटांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळेल, अशा सर्व दृष्टीने सर्वाधिक उपयुक्त जागेची निवड करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्यानंतर श्री. विशाल आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती नंदिनी घाणेकर यांनी प्रस्तावित उमेद मॉलसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला.त्याचे शासनासमोर अत्यंत व्यावसायिक पद्धतीने तयार केलेले सविस्तर सादरीकरण करण्यात आले.सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यास आणि वस्तुनिष्ठ नियोजनामुळे सांगली जिल्ह्याच्या प्रस्तावाला शासनाची अधिकृत मान्यता मिळाली.

**बाजार पेठसह प्रभावी ब्रँडिंग, शाश्वत उत्पन्नाची संधी**

उमेद मॉल ही केवळ एक विक्रीची इमारत नसून या मॉलमध्ये महिला बचतगटांनी तयार केलेले खाद्यपदार्थ, मसाले, प्रक्रिया केलेली कृषी उत्पादने, वस्त्रप्रावरणे, हस्तकला, बांबू व पर्यावरणपूरक वस्तू, घरगुती उपयोगाच्या वस्तू यांसह विविध उत्पादनांचे एकाच छताखाली प्रदर्शन आणि विक्री करता येणार आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना केवळ बाजारपेठच नव्हे, तर स्वतंत्र ओळख, प्रभावी ब्रँडिंग आणि शाश्वत उत्पन्नाची संधी मिळणार आहे.

# आष्ट्यातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा

## नगराध्यक्षांकडे निवेदनाद्वारे मागणी

आष्टा,ता.१९(प्रतिनिधी)-

..............................

**नगरसेवक विजय मोरे यांनी आष्टा शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, या मागणीचे निवेदन नगराध्यक्ष यांना तर आठवडी बाजार दिनी वाहतूक पोलीस नेमावा या मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक यांना दिले.**



नगराध्यक्ष विशाल शिंदे यांना निवेदन देताना विजय मोरे, दीपक मेथे, अंकुश मदने, मुकुंद इंगळे.

यावेळी माजी नगरसेवक दीपक मेथे-पाटील, माजी नगरसेवक मुकुंद इंगळे,विलास पाटील,अंकुश मदने उपस्थित होते.पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आष्टा शहर व परिसरात दर शुक्रवारी, सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजाराच्यादिवशी नागरिकांची मोठी गर्दी होते.आष्टा-पेठ, आष्टा-सांगली या राज्यमार्गावर वाहनांची प्रचंड रहदारी असते.अनेक वाहन चालक बेजबाबदार वाहने चालवत असतात. त्याचा फटका नागरिकांना बसला आहे.या पार्श्वभूमीवर दुधगाव रोड नाका ते झंवर कमान आणि बाळासाहेब ठाकरे चौक परिसरात शुक्रवारी सायंकाळी चार ते रात्री आठ वाजेपर्यंत पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात यावा.

नगराध्यक्ष विशाल शिंदे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात मोकाट भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. ही कुत्री नागरिकांवर हल्ला करीत आहेत यामध्ये अनेक नागरिक जखमी झाले आहेत तेव्हा नगरपालिकेच्या वतीने भटके कुत्र्यांना पकडून निर्बिजीकरण करावे. शहरातील कुत्र्यांचा बंदोबस्त करून नागरिकांना सुरक्षित करावे.

# 'पी.डीं.'च्या नावाचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद

## सयाजी शिंदे यांचे गौरवोद्गार; शिंदेंचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव

कराड ,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

**शहराचे सलग ४३ वर्षे नगराध्यपद भूषवणाऱ्या आणि महाराष्ट्रातील सर्वात यशस्वी राजकारणी म्हणून नोंद झालेल्या स्व.पी.डी.पाटील यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद होत असल्याचे गौरवोद्गार चित्रपट अभिनेते देवराईचे संस्थापक सयाजी शिंदे यांनी व्यक्त केले.**



अभिनेते सयाजी शिंदे यांना पी.डी.पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करताना अरविंद जगताप,बाळासाहेब पाटील आदी मान्यवर.

येथील पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठानचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार अभिनेते शिंदे यांना ज्येष्ठ लेखक अरविंद जगताप यांच्या हस्ते प्रदान झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बाळासाहेब पाटील, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपाध्यक्ष प्रतापराव साळुंखे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ.अशोक गुजर, शिवाजी शिंदे उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, शहरासह ग्रामीण भागात वृक्षारोपणाची चळवळ सर्वत्र पसरली आहे. जिथे राजकारणी भांडत नाही.अशा गावातील सरपंचांनी आमच्याशी संपर्क साधावा, त्यांच्या गावात शेकडो झाडे लावण्यासाठी सह्याद्री देवराई प्रतिष्ठान काम करेल. तालुक्यातील वसंतगड, सदाशिवगड येथेही वृक्षारोपणाचे काम करत आहोत.

अरविंद जगताप म्हणाले, सयाजी शिंदे जिथं झाड नाही, अशाच गावात जाऊन झाडे लावण्याचा प्रयत्न करत आहे. सयाजी शिदे यांनी झाडांवर प्रचंड प्रेम केले ते नव्या पिढीला समजावे, त्यासाठी असे पुरस्कार आवश्यक आहेत.

नगराध्यक्ष यादव म्हणाले, ज्येष्ठ नेते पी.डी.पाटील यांनी दिलेल्या विचारांवर मार्गक्रमण करत आहोत. यापुढेही शहराचा विकास करताना त्याच व्यापक दृष्टीने काम करत राहू.

बाळासाहेब पाटील म्हणाले, सयाजी शिंदे यांच्या वृक्ष लागवड चळवळीप्रमाणेच सह्याद्री कारखान्याने अनेक वर्ष वृक्ष लागवड करण्याची परंपरा जोपासली आहे. कारखान्याची डोंगरावर असंख्य झाडे लावून ती जगवली आहेत.ॲड.मानसिंगराव पाटील, दिलीप चव्हाण, राजेंद्र माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ.गुजर यांनी स्वागत केले.प्रा.भरत महाडिक, प्रा.मृणालिनी शिंदे यांनी परिचय करून दिला.प्रा.डॉ.स्वाती सरोदे यांनी मानपत्र वाचन केले. दिलीप चव्हाण यांनी आभार मानले.

महासत्ता, इचलकरंजी
# भविष्यज्ञान
शनिवार, १९ सप्टेंबर २०२६

## Iनाव असलेल्या लोकांना परिपूर्ण जीवन जगायला आवडते



एखाद्या व्यक्तीचे नाव हे केवळ त्याची ओळखच नाही तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि स्वभावाविषयी अनेक गोष्टी प्रकट करते. अक्षरात अनेक खास गोष्टी दडलेल्या आहेत. साधारणपणे Iनाव असलेल्या लोकांना परिपूर्ण जीवन जगायला आवडते. त्याला कला आणि विज्ञानात खूप रस आहे.

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार Iनावाचे लोक खूप वक्तशीर असतात. हे लोक प्रत्येक काम वेळेवर सुरू करतात आणि वेळेवर पूर्ण करतात. कोणतेही काम करण्यापूर्वी हे लोक त्याचा खोलवर विचार करतात. कोणतेही काम विचारपूर्वक करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. हे लोक कोणतेही काम अतिशय वेगाने करतात. मेहनती असण्यासोबतच या नावाचे लोक खूप चपळ असतात. त्यांच्यात आळस अजिबात नाही. हे लोक आपल्या जोडीदाराची खूप काळजी घेतात.

करिअरमध्ये यशस्वी Iया नावाच्या लोकांना फालतू बोलणे अजिबात आवडत नाही. Iनावाची माणसे नेहमी त्यांच्या कामाकडे लक्ष देतात. हे लोक काहीही विचार न करता बोलत नाहीत. या लोकांमध्ये शहाणपण पूर्ण आहे. यामुळेच हे लोक त्यांच्या करिअरमध्ये खूप यशस्वी होतात. हे लोक समोरचा मुद्दा पटकन समजतात आणि दांभिक लोकांपासून हे अंतर ठेवतात.

ज्योतिषशास्त्रानुसार , इंग्रजीतील I या अक्षराने नाव सुरू, होणाऱ्या व्यक्ती संवेदनशील, दृढ निश्चयी आणि मनमिळाऊ स्वभावाच्या असतात. अक्षरावरून नाव असणाऱ्या व्यक्तींचे स्वभावविशेष:संवेदनशील आणि भावनिक स्वभाव: हे लोक खूप संवेदनशील असतात. छोट्या-छोट्या गोष्टींमुळे ते लवकर भावूक होतात. दुसऱ्यांचे दुःख त्यांना लवकर पाझर फोडते.दृढनिश्चयी आणि कष्टाळू: जे काम हातात घेतात, ते पूर्ण निष्ठेने आणि मनापासून करतात. आपला पक्का इरादा आणि दृढ हेतू ठेवून ते ध्येय साध्य करतात.वक्तशीर आणि अनुशासित: वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार हे लोक वेळेचे खूप पक्के (वक्तशीर) असतात. प्रत्येक काम वेळेवर सुरू करणे आणि वेळेवर संपवणे त्यांना आवडते. शिस्तबद्ध जीवन जगण्याकडे त्यांचा कल असतो.कला आणि विज्ञानाची आवड: या व्यक्तींना कला आणि विज्ञानात विशेष रस असतो. यांची कल्पनाशक्ती उत्तम असते.

हुशार व बुद्धिमान: Iहे लोक समजदार आणि बौद्धिकदृष्ट्या प्रगल्भ असतात. कठीण किंवा गुंतागुंतीचे विषय ते अगदी सहज समजून घेतात.आदर्शवादी: स्वतःचे जीवन एका आदर्श मार्ने जगण्याचा ते नेहमी प्रयत्न करतात. ते सुस्त बसणे किंवा आळस करणे पसंत करत नाहीत, तर सतत काही ना काही काम करत राहतात.

# पुढच्या वर्षी लवकर या...

## श्रीगणेशाची उत्तरपूजा कशी करावी?

गणपती बाप्पा कायम आपल्या घरी राहावा असं आपल्याला वाटतं पण शास्त्रानुसार बाप्पाचे विसर्जन करावेच लागते. तो आपल्या घरी नसला तरी त्याची कृपादृष्टी कायम तुमच्यावर आणि कायम तुमच्या कुटुंबावर असते, हे लक्षात ठेवा. बाप्पाचे आगमन आणि प्राणप्रतिष्ठा जशी आपण थाटामाटात विधीनुसार करतो तशीच असते श्रीगणेशाची उत्तरपूजा. चला तर पाहूया श्रीगणेशाची उत्तरपूजा कशी करावी.



गौरीहराचा नंदन, गजवदन गणपती ।। ध्यानि आणुनि सुखमूर्ती, स्तवन करा एके चित्ती । तो देईल ज्ञानमूर्ती, मोक्ष सुख सोज्वळ ।।

अशा या गणपती बाप्पाला हसतहसत निरोप द्यायचा असतो. जशी प्राणप्रतिष्ठा महत्त्वाची त्याचप्रमाणे विधीवत आणि शास्त्रानुसार श्रीगणेशाची उत्तरपूजा व्हायला हवी, त्याबद्दल माहिती देणारा हा लेख.

तुमच्याकडे कुलाचाराप्रमाणे ज्यादिवशी श्रीगणपतीचे विसर्जन करायचे असते त्या वेळी करावयाच्या उत्तरपूजेचा विधी पुढील प्रमाणे आहे.

दुपारी भोजनोनंतर पुन्हा स्नान करून सोवळे नेसून पाटावर बसून आचमन करावे व पुढील संकल्प करावा.

अद्येत्यादिपूर्वोच्चारितएवंगुणविशेषणविशिष्टायां शुभ- पुण्यतिथौ ममआत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्रात्यर्थं श्रीपार्थिवमहागणपतिदेवताप्रीत्यर्थं पंचोपचारैः उत्तरपूजनं करिष्ये।

असे म्हणून उदक सोडावे, नंतर गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य हे उपचार पूर्वी पूजाप्रयोगात सांगितलेल्या मंत्रांनी अर्पण करावेत.

उदाहरणार्थ-

श्रीपार्थिवमहागणपतये नमः। विलेपनार्थे चंदनं समर्पयामि। श्रीपार्थिवमहागणपतये नमः। पूजार्थे पुष्पाणि समर्पयामि। श्रीपार्थिवमहागणपतये नमः। धूपं समर्पयामि। श्रीपार्थिवमहागणपतये नमः । दीपं समर्पयामि। श्रीपार्थिवमहागणपतये नमः। नैवेद्यार्थे खाद्यनैवेद्यं समर्पयामि ।

नंतर विडा, दक्षिणा, फल ठेवावे. आरती, मंत्रपुष्प, दूर्वासमर्पण इत्यादी झाल्यावर प्रार्थना करावी. शेवटी,

अनेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारैः कृत उत्तर पूजनेन भगवान्? श्रीपार्थिवमहागणपतिः प्रीयताम्। असे म्हणून पाणी सोडावे.

प्रार्थना

कुटुंबांतील सर्वांनी गणपतीला गंध-फूल, दूर्वा वाहाव्यात. नमस्कार करावा. देवाची विशेष प्रार्थना हात जोडून करावी. ती अशी देवा गणराया, मी आपले चरणांचा दास आहे. माझ्या आकलनानुसार आणि यथाशक्ती नुसार मी आणि माझ्या कुटुंबाने तुझी पूजा केली आहे. जे अधिकउणे झाले असेल ते पूर्ण करून घ्या. माझ्या हातून, माझ्या मुलाबाळांचे हातून घडलेल्या अपराधांची क्षमा करून सपरिवार आमचे रक्षण करा. सर्वस्वी मी आपला दास आहे. माझ्या सर्व संकटांचा परिहार करून माझ्या उद्योगधंद्यांतील, नोकरीतील भासणाऱ्या अडचणी दूर करून त्यांत मला यश-लाभ व्हावा आणि प्रतिवर्षी असेच आनंदाने येऊन आमचे हातून सेवा करून घ्यावी. अधिक काय सांगू? माझा सर्व गोष्टी आपण जाणत आहात.

कृपादृष्टी ठेवा हीच प्रार्थना.

त्यानंतर मंगलमूर्ती मोरया ! पुढच्या वर्षी लवकर या ! अशी गर्जना सर्वांनी करावी. नंतर पुढील मंत्रांनी देवावर विसर्जनाच्या अक्षता बाहाव्या. तो मंत्र असा,

यान्तु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम्।
इष्टकामप्रसिद्धयर्थं पुनरागमनाय च ।।

अक्षता घातल्यावर मूर्ती जरा सरकवावी. नंतर इष्टमित्र, कुटुंबीय मंडळींसह ती मूर्ती जलाशय, नदी, समुद्र इत्यादी पवित्र स्थळी पोहोचवावी. जाताना देवाबरोबर दही-भात-पोहे

मोदक, करंज्या इत्यादी शिदोरी म्हणून देण्याचा प्रघात आहे. घरी परत आल्यावर सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती म्हणावी.

पूजा आपण स्वतःच केली असेल तर देवापुढील विडा-दक्षिणा ब्राह्मणाला द्यावी किंवा सत्कार्यार्थ अर्पण करावी.

## लाडक्या गणरायाला निरोप देताना या १० चुका टाळा



बाप्पाचं विसर्जन करताना खरंतर कामाची इतकी धावपळ असते की आपल्या नकळत आपल्या हातून चुका घडू शकतात. यामुळे दहा दिवस गणरायाची मनोभावे केलेली सेवा व्यर्थ जाऊ शकते. यामुळेच गणपती विसर्जनाच्या दिवशी काही गोष्टींची काळजी घेणं गरजेचं आहे.

गणपती विसर्जनाच्या दिवशी या गोष्टींची काळजी घ्या

विसर्जनाआधी घरी किंवा मंडळात गणपतीची पूजा करा. त्याचबरोबर, गणपतीला फळ, फूल, मोदक अर्पण करा.

गणरायाला निरोप देताना आपल्या चुकांची क्षमा मागा. तसेच, चांगली कामासाठी बाप्पाकडून प्रोत्साहन मागा. त्यानंतर विसर्जन करा.

गणपतीचं विसर्जन करताना संपूर्ण घरात एकदा गणपतीबरोबर प्रदक्षिणा घाला आणि गणपतीचे आशीर्वाद घ्या.

घरातून बाहेर पडताना गणपतीचं मुख घराच्या दिशेने ठेवा आणि पाठ बाहेरच्या दिशेने असू द्या. याच पद्धतीने गणपतीला विसर्जनाच्या ठिकाणी न्या.

विसर्जित करण्यात येणाऱ्या मूर्तीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी घ्या. तडा गेलेल्या मूर्तीचं विसर्जन अशुभ मानलं जातं.

गणपतीचं घाईगडबडीत विसर्जन करु नका. विसर्जनाच्या आधी शेवटची आरती करा आणि गणरायाकडे क्षमा मागा.

विसर्जन करताना मूर्तीला एकत्र पाण्यात घालू नका. हळुहळू मूर्ती पाण्यात सोडा.

विसर्जनाच्या वेळी उरलेल्या वस्तू इथे तिथे फेकू नका. या वस्तूंना मातीत पुरवा किंवा झाडाखाली ठेवा.

## गणपती बाप्पाला निरोप देताना मागे वळून पाहू नये?

गणपती बाप्पा आले की घरात किती आनंद असतो. ढोल ताशे, आरती, मोदक, सगळं कसं भरलेलं वाटतं. पण जसा विसर्जनाचा दिवस जवळ येतो तसं मन जड होतं.

विसर्जनाच्या वेळी एक प्रश्न सगळ्यांनाच पडतो बाप्पाचं विसर्जन केल्यानंतर मागे वळून पाहावं की नाही? मोठी माणसं नेहमी सांगतात की विसर्जन झाल्यावर मागे वळून बघू नका. पण असं का सांगतात? यामागे शास्त्र आहे की फक्त एक समज आहे? चला आज हेच जाणून घेऊया. :

मागे वळून न पाहण्यामागची भावना काय?

पहिलं आणि सगळ्यात महत्वाचं कारण म्हणजे भावनिक. बाप्पा १० दिवस आपल्या घरात असतो. आपण त्याची रोज पूजा करतो, त्याच्याशी बोलतो. तो आपल्या घरातलाच एक झाला असतो. त्याला पाण्यात निरोप देताना मनात खूप वाईट वाटतं. जर आपण विसर्जनानंतर परत मागे वळून पाहिलं तर तो मोह सुटत नाही. मनात सारखं वाटत राहतं की बाप्पाला अजून थोडा वेळ ठेवूया.म्हणून मोठी माणसं सांगतात की एकदा निरोप दिला की मागे वळू नका. मोहात अडकू नका. बाप्पा गेलाय हे मनाला समजवा आणि पुढच्या वर्षी तो परत येणार या आनंदात घरी जा.

दुसरं कारण काय सांगतात?

दुसरी एक मान्यता अशी आहे की, बाप्पा जाताना आपल्या घरातलं दुःख, अडचणी, संकटं सगळं सोबत घेऊन जातो. तो विघ्नहर्ता आहे. आपली सगळी विघ्नं तो दूर करतो.जर आपण विसर्जनानंतर मागे वळून पाहिलं तर आपण त्या दुःखांना परत बोलावतो असं मानलं जातं. म्हणून सांगतात की बाप्पा गेल्यावर मागे बघू नका, सरळ घरी जा. जेणेकरून घरातली नकारात्मकता पण त्याच्यासोबत जाईल आणि नवीन आशा घेऊन तुम्ही घरी याल.

शास्त्रात काय सांगितलं आहे?खरं सांगायचं तर कोणत्याही मोठ्या ग्रंथात असं लिहिलेलं नाही की मागे वळून पाहिलं तर पाप लागेल किंवा दोष लागेल. हा नियम नाही, ही एक लोकपरंपरा आहे. पूर्वीपासून चालत आलेली एक प्रथा आहे.जसं आपण एखाद्या पाहुण्याला स्टेशनवर सोडायला जातो आणि तो गेल्यावर जास्त वेळ तिथे उभे राहत नाही, तसंच आहे हे. एकदा निरोप दिला की विषय संपला. मनात त्याचाच विचार करत बसू नका.

मग नक्की काय करावं?

विसर्जनाच्या दिवशी बाप्पाची मनोभावे उत्तरपूजा करा. त्याला आवडणारा नैवेद्य दाखवा, आरती करा. विसर्जन करताना ''पुढच्या वर्षी लवकर या'' असं मनापासून म्हणा.बाप्पा पाण्यात विसर्जित केल्यानंतर नमस्कार करा आणि मागे न वळता घरी या. घरी आल्यावर हातपाय धुवा आणि घरातली थोडी साफसफाई करा. असं मानतात की बाप्पा गेल्यावर घरात पुन्हा सकारात्मकता येते.

# हातावरील ‘ही’ रेषा सांगते तुमच्या आरोग्याचे गुपित

काही लोक वारंवार आजारी पडतात. ते एका आजारातून बरे होतात, पण काही दिवसांतच त्यांना दुसऱ्या आजाराचा सामना करावा लागतो. त्यांना वर्षभर आरोग्याच्या काही ना काही समस्या जाणवतात, तर काही जण क्वचितच आजारी पडतात. त्यांचे आरोग्य वर्षभर चांगले राहते. तुमचे आरोग्य कसे असेल? याचे रहस्य तुमच्या तळहातामध्ये दडलेले आहे. तुमच्या हातावरील आरोग्य रेषा तुमच्या आरोग्याबद्दलचे संपूर्ण सत्य उघड करते. तळहातावर आरोग्य रेषा कुठे असते ते सविस्तर जाणून घेऊया

तळहातावर कुठे असते आरोग्य रेषा

हस्तरेखाशास्त्रानुसार सर्वप्रथम, ज्या लोकांच्या हातावर आरोग्याची रेषा नसते, ते इतरांपेक्षा अधिक निरोगी असू शकतात. हातावर रेषा असण्यापेक्षा ती असणे अधिक चांगले आहे. जेव्हा तुम्ही एखाद्या किशोरवयीन मुला-मुलीच्या हाताकडे पाहता, तेव्हा तुम्हाला कदाचित आरोग्याची रेषा दिसणार नाही, परंतु जर तुम्ही एखाद्या तरुण पुरुष किंवा स्त्रीच्या हाताकडे पाहिले, तर तुम्हाला ती रेषा दिसू शकते. याचा अर्थ असा की, तो किशोरवयीन मुलगा किंवा मुलगी त्या तरुण पुरुष किंवा स्त्रीपेक्षा अधिक निरोगी आहे.



आरोग्य रेषेला बुध रेषा असेही म्हणतात, कारण ती बुध पर्वताच्या दिशेने जाते. तळहातातील मनगटातून किंवा जीवन रेषेतून सुरू होऊन बुध पर्वताच्या दिशेने जाणाऱ्या रेषेला आरोग्य रेषा म्हणतात आणि ती बुध रेषेचा प्रभाव देखील दर्शवते. जेव्हा आरोग्य रेषा तयार होते, तेव्हा व्यक्तीने आपल्या आरोग्याबाबत सतर्क राहिले पाहिजे.

अशा व्यक्तींच्या हातांवर दिसून येते आरोग्य रेषा

ज्या लोकांना सांधेदुखी, संधिवात, यकृताच्या समस्या, पचनसंस्थेचे विकार आणि आमवाताचा त्रास असतो, त्यांच्या हातांवर आरोग्य रेषा असू शकते.

सापासारखी नागमोडी आरोग्य रेषा

जर तुमच्या हातावरील आरोग्य रेषा सापासारखी नागमोडी असेल, तर तुमचे आरोग्य खराब आहे. तुम्ही सतत आजारी असता. वर्षभर तुम्हाला सतत कोणत्या ना कोणत्या त्रासाला सामोरे जावे लागते.

आरोग्य रेषेवर बेट तयार होणे

जर तुमची आरोग्य रेषा बेटासारखा आकार घेऊ लागली किंवा साखळीसारखी दिसू लागली, तर तुम्हाला फुफ्फुसांशी संबंधित समस्या जाणवू शकतात. अशा व्यक्तींना दम्याचा त्रासही होऊ शकतो.

तुटलेल्या आरोग्य रेषेचा अर्थ

ज्या लोकांच्या हातावरील आरोग्य रेषा तुटलेल्या असतात, त्यांना अनेकदा पोट आणि पचनाच्या समस्या जाणवतात. यामुळे वेदना देखील होऊ शकतात.

वाकडी आरोग्य रेषा

ज्या लोकांची आरोग्य रेषा वाकडी असते, त्यांना यकृताशी संबंधित समस्या किंवा आजार होण्याची शक्यता जास्त असते. त्यांनी आपल्या यकृताची काळजी घेतली पाहिजे.

## साप्तहिक राशीभविष्य

### १९ सप्टेंबर २०२६ ते २५ सप्टेंबर २०२६

**अडचणींवर मात कराल**

**मेष :** तुम्ही जे काम हाती घ्याल त्यात यशस्वी होणार आहात. आपल्या प्रयत्नांना चांगले यश मिळणार आहे. आपण सर्व अडचणींवर मात करणार आहात. आपला आत्मविश्वास चांगला असणार आहे. नोकरीमध्ये आपली परिस्थिती चांगली असणार आहे. आगीपासून सावध राहणे. डोळ्यांवरील इजा होण्याची शक्यता आहे. आरोग्याच्या तक्रारींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. उष्णतेचा त्रास होण्याची शक्यता. नवीन ओळख होण्याची शक्यता त्यातून आपणाला लाभ होणार आहे. आपला सामाजिक दर्जा वाढेल.

**स्थावराबाबतचे प्रश्न सुटतील**

**वृषभ :** कुटुंबातील प्रश्न सुटतील. इतरांच्या मताला प्राधान्य द्या. शांतपणे निर्णय घ्या. कार्यक्षेत्रात परिश्रमाला पर्याय नाही हे लक्षात ठेवा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. स्थावर बाबतचे प्रश्न सुटतील. जमीन-जुमला या विषयीचे व्यवहार गतिमान होतील; परंतु वादविवाद टाळणे महत्त्वाचे ठरेल. व्यवसायातील परिस्थिती समाधानकारक राहील. कुटुंबातून पत्नीचे सहकार्य मिळेल. मित्रमंडळी, आप्तेष्ट, नातेवाईक भेटल्यामुळे आनंदात भर पडेल. कोणाशीही मतभेद टाळा. कोणत्याही लहान मोठ्या आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगणे हिताचे ठरेल.

**आव्हाने स्वीकारा**

**मिथुन :** आपल्याला निरनिराळ्या वेळेस निराळी आव्हाने स्वीकारावी लागतील. ती आव्हाने स्वीकारा. त्याचा आपल्याला भविष्यात फायदा मिळेल. नोकरीमध्ये जास्त काम करावे लागेल. वेळेचे नियोजन फायदेशीर ठरेल. वरिष्ठांची मर्जी राहील. हाताखालील लोकांचे सहकार्य मिळेल; परंतु वादविवादाचे प्रसंग टाळा. शिस्त व नियम पाळा. एखादी महत्त्वाची व्यक्ती भेटेल. हाती घेतलेल्या कामात हमखास यश प्राप्त होईल. कुटुंबीयांकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. येणाऱ्या समस्यांचा आपण यशस्वीरीत्या सामना कराल.

**कार्यमग्न राहा**

**कर्क :** आपण आपल्या कार्यक्षेत्रात अधिक लक्ष दिल्यास आपली कार्ये त्वरेने होतील. महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. चालढकल किंवा आळस नको. कार्यमग्न राहणे हिताचे ठरेल. त्याचप्रमाणे नियोजनाचा फायदा मिळेल. व्यवसाय नोकरी या ठिकाणी सुलभ वातावरण राहील. महत्त्वाच्या कामात यश मिळवाल. बोलण्यापेक्षा कृतीला महत्त्व द्या. विद्यार्थ्यांनी अध्ययनात अधिक परिश्रम करण्याची गरज. कुसंगती टाळा. वेळ वाया घालवू नका. गुरुजनांचे मार्गदर्शन तसेच मदत मिळेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. नोकरी-व्यवसायात प्रगती करता येईल.

**उत्साह वृद्धिंगत होईल**

**सिंह :** आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक बाबतीत कामाचा ताण जाणवेल; परंतु कामे आपण उत्साहाने पार पाडाल. विविध कामांसाठी धावपळ होण्याची शक्यता राहील. कलाकार साहित्यक्षेत्रातील जातक व विद्यार्थी यांना अनुकूलता मिळेल. कलाकारांना नवीन कामे मिळतील. तसेच प्रसिद्धीसह मानसन्मान मिळून धनलाभ होईल. राहत्या घराबद्दलचे प्रश्न मिटतील. तसेच राहत्या घरात भौतिक सुखसुविधा वाढविण्यासाठी खर्च आनंदाने कराल. स्थावर विषयक प्रश्न सुटू लागतील. नोकरीत वरिष्ठांशी जुळवून घ्या.मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील.

**स्पर्धा जाणवेल**

**कन्या :** नोकरी-व्यवसायात स्पर्धक बलवान होतील. तसेच हितशत्रूंच्या कारवाया वाढतील. आपण शांत राहा. तसेच आपल्या कामाकडे लक्ष द्या. कुटुंबात मित्र मंडळ यांच्या वर्तुळात कार्यस्थळ वाद-विवाद टाळा. घरातील सदस्यांच्या म्हणण्याला प्राधान्य द्या. किरकोळ वाद-विवादांकडे दुर्लक्ष करा; परंतु आर्थिक परिस्थिती उत्तम राहील. महत्त्वाची कामे करू शकाल. यश लाभेल. व्यवसायात नियोजनाला महत्त्व प्राप्त होईल. मित्रमंडळी, नातेवाईक, आप्तेष्ट यांच्या गाठीभेटी होतील. मोठे निर्णय घेताना त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

**इतरांना मदत कराल**

**तूळ :** आपल्या जवळील व्यक्तीला किंवा नातेवाइकांपैकी कोणालातरी आपल्या मदतीचीची आवश्यकता भासेल ती मदत आपण स्वतःहून कराल. एखाद्याला काही शिकवून त्याचे हित जोपासाल. जमीन-जुमला, स्थावर मालमत्ता याविषयीचे प्रश्न सोडविता येतील. विद्यार्थी वर्गाला त्यांच्या परिश्रमाचे अपेक्षित श्रेय मिळेल. जुन्या मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील. कार्य क्षेत्रापेक्षा कुटुंबात आपला वेळ जास्त जाईल. नावलौकिकात भर पडेल. कुटुंबीयांसमवेत आनंदात वेळ जाईल. कामाचा ताण जाणवेल.

**प्रसिद्धी व आर्थिक लाभ मिळतील**

**वृश्चिक :** यश प्रसिद्धी व आर्थिक लाभ देणारा हा कालावधी असेल. जुन्या गुंतवणुका भरघोस आर्थिक लाभ मिळवून देतील. नव्या गुंतवणुका करताना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घ्या. स्थावर संपत्ती जमीन-जुमला यांचे रेंगाळलेले व्यवहार गतिमान होतील. वरिष्ठांशी बोलताना योग्य शब्दांचा वापर करा. काही वेळेस संवेदनशील प्रसंगाला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. नोकरीमध्ये वादविवाद टाळा. राजकारण, गटबाजी नको. कलाकार व साहित्यक्षेत्रातील जातकांना प्रसिद्धीसह आर्थिक लाभ मिळतील. नावलौकिकात भर पडेल.

**मिश्र फळे मिळतील**

**धनु :** विविध प्रकारच्या कार्यालयीन व कौटुंबिक अडथळ्यांचा अनुभव घ्यायला लागेल. अप्रिय गोष्टींचा अनुभव येईल. काही वेळेस मनाविरुद्ध निर्णय स्वीकारावे लागतील. नोकरीच्या ठिकाणी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचा प्रयत्न करावा. आपल्यातील कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. कुटुंबात व मित्रमंडळ यांच्या वर्तुळामध्ये वाद-विवाद टाळणे हितकारक ठरेल. व्यवसायात आर्थिक देवाणघेवाणीवरून वादविवादाची शक्यता. व्यवसायातील जुनी येणी वसूल होतील. त्यामुळे आपण आपली कर्जे चुकती करू शकाल.

**महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील**

**मकर :** बरेच दिवस आपल्या मनातील असलेली एखादी महत्त्वाची इच्छा अथवा महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल. त्यासाठी प्रयत्न कमी पडता कामा नयेत याची खबरदारी घ्या. स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होऊ शकते. त्यादृष्टीने प्रयत्न केल्यास त्या प्रयत्नांना यश प्राप्त होईल. वाहन चालवताना वाहनाच्या वेगावर नियंत्रण आवश्यक. अतिआत्मविश्वास नुकसानीस कारणीभूत ठरू शकतो. लहान मोठे आर्थिक व्यवहार करताना सावधानता बाळगा. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. दाम्पत्य जीवनातील वाद-विवाद, कलह सदृश्य प्रसंगात बदलू शकतात. प्रवासाचे योग घटित होत आहेत. प्रवास कार्य सिद्ध होतील.

**रागावर नियंत्रण आवश्यक**

**कुंभ :** रोजच्या दैनंदिन कामात कुटुंबात व कार्यस्थळी आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील. काही बाबतीत आपला राग अनावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नोकरीच्या ठिकाणी वरिष्ठांशी मतभेद टाळणे अत्यावश्यक. तसेच सहकाऱ्यांना समजून घ्या. त्यांचे पूर्ण म्हणणे ऐकून घ्या. स्वतः शांत राहिल्यामुळे मनावरचा ताण कमी होईल. स्थावर इस्टेट तसेच वडिलोपार्जित संपत्तीबद्दलचे वाद-विवाद संपुष्टात येतील. भावंडांशी समजूतदारपणे वागा. जोडीदाराच्या लहरीपणामुळे वाद-विवाद संभवतात. विशेषतः भागीदारी व्यवसायात भागीदाराबरोबर वाद-विवाद टाळा.

**नशिबाची साथ मिळेल**

**मीन :** नशिबाची साथ मिळाल्याने यशाची वाटचाल करणे सुलभ होईल. आपल्या समोरील कामे थोड्याच प्रयत्नात होत असल्याचे अनुभव येतील. कामकाजाचा व्याप वाढणार आहे. विरोधकांची भीती बाळगण्याचे कारण नाही. खेळाडू व राजकीय क्षेत्रातल्या जातकांना काळ अनुकूल राहील. एखाद्या धार्मिक किंवा सामाजिक कार्यात सहभागी होता येईल. यशदायी आणि सुंदर अशा कालावधीचा अवश्य लाभ घेता येईल. महत्त्वाची कामे करून घ्या. मनातील इच्छा परतीचा हा काळ असल्याने एखादे अवघड काम अथवा एखादी महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल.

# आगाशिवनगरमध्ये बंद खोक्यात घुसला बिबट्या

## कुत्र्यांच्या पाठलागामुळे वस्तीकडे मोर्चा; सव्वा तासाच्या प्रयत्नांनंतर पिंजऱ्यात जेरबंद

कराड,ता.१८ (प्रतिनिधी) –

**आगाशिवनगर येथील भरवस्तीत अपार्टमेंटच्या शेजारील बंद खोक्यात पाच महिन्यांचा नर बिबट्या घुसल्याने शुक्रवारी सकाळी परिसरात खळबळ उडाली. वन विभाग आणि वर्ल्ड वाईल्ड हार्ट रेस्क्युअर नाईट टीमने सुमारे सव्वा तासाच्या प्रयत्नांनंतर बिबट्याला कोणतीही इजा न होता सुखरूप बाहेर काढून पिंजऱ्यात बंद केले. पुढील उपचारासाठी त्याला वराडे येथील आरोग्य केंद्रात नेण्यात आले.**

आगाशिव डोंगर परिसरातून हा बिबट्या अन्नाच्या शोधात डोंगराच्या पायथ्याकडे आला असावा, अशी प्राथमिक माहिती आहे. व्यायामासाठी डोंगरावर जात असलेल्या अवधूत गोसावी यांना पायथ्याजवळ बिबट्या दिसला. त्याचवेळी सुमारे १५ ते २० कुत्र्यांनी बिबट्याला घेरल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कुत्र्यांच्या हल्ल्यात बिबट्याला इजा होण्याची शक्यता लक्षात घेऊन गोसावी यांनी कुत्र्यांना हुसकावून लावले आणि बिबट्याच्या मागे



राहून त्याला सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी मार्ग मिळवून दिला.

कुत्र्यांचा पाठलाग सुरूच असल्याने बिबट्या डोंगराच्या पायथ्यापासून कराड–ढेबेवाडी मार्ग ओलांडून दोन अपार्टमेंटच्या मधील मोकळ्या जागेत पोहोचला. तेथे असलेल्या बंद खोक्याचे दार उघडून गोसावी यांनी बिबट्याला त्यामध्ये जाण्यासाठी जागा करून दिली. बिबट्या खोक्यात गेल्यानंतर त्यांनी दार बंद केले आणि तत्काळ वन विभागाशी संपर्क साधला. परिस्थितीची माहिती मिळताच वन विभागाचे पथक तातडीने दाखल झाले. गर्दी वाढल्याने वन विभागाने पोलिसांची मदत घेतली. यानंतर रेस्क्यू पथकाने आवश्यक खबरदारी घेत बिबट्याला खोक्यातून बाहेर काढण्याची कार्यवाही सुरू केली. सुमारे सव्वा तासाच्या प्रयत्नांनंतर बिबट्याला सुखरूपपणे पिंजऱ्यात बंद करण्यात आले.



मिरज येथील श्रीधर मोतुगडे या गणेशभक्ताने घरी साकारलेला बैलगाडीवर विराजमान बाप्पांचा शर्यतीचा देखावा.



अलाटवाडी (ता. हातकणंगले) येथील अलका तोडकर, प्राजक्ता तोडकर व प्रीती तोडकर यांनी शुक्रवारी रात्री बांधलेली गंगा–गौरीची आकर्षक पूजा.

# लग्नासाठी पैसे लागणार असल्याचे भासवून सात लाखांची फसवणूक

आष्टा,ता.१८(प्रतिनिधी)–

**भावाच्या लग्नासाठी व प्रापंचिक खर्चासाठी पैसे लागणार आहेत असे भासवून त्या बदल्यात जमीन गहाण मुदत खरेदी देतो असे सांगून सात लाख रुपये घेतले. मात्र सदरची जमीन दुसऱ्या कोणाला मुदत गहाण दिली असल्याने सात लाख रुपयांची फसवणूक केली असल्याची फिर्याद सुदेश संजय भोळे यांनी आष्टा पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार आष्टा पोलिसात विनायक विलास सपकाळ, अमित पवन कोळी (दोघे रा.आष्टा ता. वाळवा) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे.**

विनायक सपकाळ याने भावाच्या लग्नासाठी, व प्रापंचिक खर्चासाठी, लोकांचे देणे भागवण्यासाठी पैशाची आवश्यकता आहे असे सांगून सुदेश भोळे यांच्याकडून सात लाख रुपये घेतले. त्याबदल्यात विनायक सपकाळ याचे नावे असलेली मर्दवाडी येथील शेतजमीन गट नं.१२७/१/२अ / १ब, एकूण क्षेत्र ०.२० आर ही गहाण स्वरुपी मुदत खरेदी देतो असे दोहत ठरले. ठरल्यानुसार सुदेश याचेकडून वेळोवेळी ऑनलाईन, चेकव्दारे व रोख असे एकूण ७,००,००० रुपये घेतले.मात्र शेतजमीन परस्पर राहूल रघुनाथ जाधव (रा. कसबे डिग्रज) यास गहाण स्वरुपी दिली. खरेदीपत्र करून देवून फिर्यादीची ७,००,००० रुपयांची विनायक सपकाळ व अमित कोळी यांनी फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# अन्नपूर्णा शुगरचा गळीत हंगाम शुभारंभ

## अडीच लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट

साके,ता.१८(वार्ताहर)–

**यंदाच्या गाळपासाठी कारखाना पूर्ण क्षमतेने सज्ज आहे. यावर्षी अडीच लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ऊस उत्पादकांसह कारखान्याच्या सर्व घटकांनी सहकार्य करावे.शेतकऱ्यांच्या हिताची जाणीव ठेवून कारखाना मार्गक्रमण करत आहे. सभासद,शेतकरी,कर्मचारी यांच्या उत्कर्षासाठी कारखाना नेहमीच बांधिल राहिल,असा ठाम विश्वास अन्नपूर्णा शुगर अँड जॅगरी वर्क्स लिमिटेडचे संस्थापक संजयबाबा घाटगे यांनी व्यक्त केला.**

केनवडे येथील कारखान्याच्या सातव्या गळीत हंगामाच्या मोळीपूजन शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अन्नपूर्णा शुगरच्या गळीत हंगामाचा शुभारंभ महेश जाधव यांच्या हस्ते काटापूजन महेश देशपांडे व त्यांच्या पत्नी पावणी देशपांडे यांच्या हस्ते झाले. श्री सत्यनारायण पूजा सोनूसिंह घाटगे व उज्वला घाटगे या दाम्पत्यांच्या हस्ते झाली.



अन्नपूर्णा शुगरच्या मोळीपूजन प्रसंगी महेश जाधव, नाथाजी पाटील,राजवर्धन नाईक–निंबाळकर,विजय जाधव,राहूल चिकोडे, संजयबाबा घाटगे, अंबरिषसिंह घाटगे,विरेन घाटगे आदी. छाया– सागर लोहार)

घाटगे पुढे म्हणाले, कारखान्याची उभारणी प्रतिकुल परिस्थितीमध्ये करण्यात आली आहे. कारखाना कर्जमुक्त झाला की,शेतकरी सभासद,कर्मचारी यांना चांगले दिवस नक्की येतील असा माझा विश्वास आहे. अनेक वर्षे मी इतर पक्षाचे काम केले आहे. परंतू स्व.आम. पी.एन.पाटील सोडल्यास आम्हाला कोणीच मान सन्मान दिला नाही. तो आज भारतीय जनता पार्टीमध्ये मिळत आहे.त्याबद्दल मी भारतीय जनता पक्षाचा आभारी आहे.

महेश जाधाव म्हणाले, बदलत्या जडणघडणीत कागल तालुक्यातून संजयबाबा घाटगे व अंबरिषसिंह घाटगे यांची ताकद मिळाली आहे. अशा निष्ठावत घाटगे गटाकडे भारतीय जनता पार्टीने विषेश लक्ष द्यावे अशी विनंती मी वरीष्ठांना केली आहे.

कारखान्याचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर अंबरिषसिंह घाटगे म्हणाले, कारखाना उभारणीसाठी नाम. चंद्रकांत पाटील,माजी आम.सुरेश हाळवणकर,मंत्री हसन मुश्रीफ,केडीसीसी बँकेचे विशेष सहकार्य लाभले. आमच्यावर विश्वास ठेवून १४ हजारपेक्षा अधिक सभासदांनी रोखींने शेअर्स रक्कम जमा केली. हे राज्यातील कारखानदारीतील एकमेव उदाहरण आहे. कारखान्याने यंदा गाळप क्षमता वाढविण्यासाठी तांत्रिक दुरूस्त्या केल्या आहेत. त्यामुळे यंदा प्रतिदिन २ हजार मेट्रीक टन गाळप केले जाणर आहे.

कार्यक्रमास नाथाजी पाटील, राजवर्धन नाईक–निंबाळकर,विजय जाधव,राहूल चिकाडे, अरूंधती घाटगे,जि.प.सदस्या सुयशा घाटगे, तेजस्वीनी भोरे,दिनकर पाटील, एम.बी.पाटील,के.के.पाटील,मल्हारी पाटील, राजू भराडे,धनराज घाटगे,ए.वाय.पाटील,रणजित मुडूकशिवाले, एकनाथ पाटील,विरेन घाटगे, अॅड.अमर पाटील,नानासो कांबळे,दतात्रय दंडवते, सातापा तांबेकर,संजय चिंदगे, सुरेश सोनगेकर,अशोक पाटील,बाजीराव पाटील, महादेव ठाणेकर,शामराव पोवार,धोंडिराम एकशिंगे,भैरू कोराणे, उत्तम वाडकर उपस्थित होते. स्वागत दत्तोपंत वालावलकर यांनी केले. आभार रमेश जाधव यांनी मानले.

# किसनराव आवळे स्मृतिदिनानिमित्त उद्या राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धा

कोल्हापूर,ता.१८ (प्रतिनिधी)–

**स्मृतीशेष किसनराव आवळे प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ नेते स्मृतीशेष किसनराव आवळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी २० सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता कोल्हापूर येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात राज्यस्तरीय खुल्या वक्तृव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.महाराष्ट्रातील वक्तृत्वप्रेमी युवक–युवती, विद्यार्थी तसेच इच्छुक स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक अंतिम कोल्हापूरकर आणि आदित्य म्हमाने यांनी केले आहे.**

स्पर्धेसाठी विविध सामाजिक,संविधानिक आणि समकालीन विषयांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये 'स्मृतीशेष किसनराव आवळे : व्यक्ती आणि कार्य', 'भारतीय संविधान आणि मानवतावाद', 'आजचा युवक : आज, काल आणि उद्या', 'आरक्षण : वाद आणि विपर्यास', 'भारत माझा देश', 'जात, धर्म आणि माणूस' तसेच 'भारतीय स्त्रीचा आत्मस्वर' या विषयांचा समावेश आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकास १०००० रू.(दोन हजार रुपये रोख आणि पुस्तके), द्वितीय क्रमांकास ७०००रू. (एक हजार रुपये रोख आणि पुस्तके) आणि तृतीय क्रमांकास ५००० रू. (पाचशे रुपये रोख आणि पुस्तके) असे बक्षीस देण्यात येईल. याशिवाय पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार असून, प्रत्येकास ५०० रुपयांची पुस्तके दिली जातील.स्पर्धेचा कालावधी पाच मिनिटांचा (४+१ मिनिटे) असून, प्रवेश शुल्क १०० रुपये आहे. विशेष बाब म्हणजे प्रवेश शुल्काच्या मोबदल्यात प्रत्येक स्पर्धकास २०० रुपये किमतीची पुस्तके आणि सहभागाचे आकर्षक प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

किसनराव आवळे यांच्या सामाजिक, मानवतावादी व वैचारिक कार्याची नव्या पिढीला ओळख व्हावी, तसेच युवकांमध्ये वक्तृत्वकला, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक प्रश्नांविषयी चिकित्सक विचार निर्माण व्हावा, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत अधिकाधिक इच्छुकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन स्मृतीशेष किसनराव आवळे प्रतिष्ठानतर्फे अब्राहमआवळे यांनी केले आहे.

## शाहूपुरीतून दुचाकी लंपास

कोल्हापूर, ता.१८(प्रतिनिधी)

**शाहूपुरी सहावी गल्ली परिसरातून चोरट्याने पार्क केलेली दुचाकी लंपास केली. १२ ते १३ सप्टेंबरदरम्यान हा प्रकार घडला. याप्रकरणी वैभव संजय पोवार (वय २५, रा. शाहूपुरी, सहावी गल्ली) यांनी शाहूपुरी पोलिसांत फिर्याद दिली.**

पोवार यांनी मोटारसायकल चाजनीज गाडीजवळ लावली होती. त्यानंतर काही वेळाने पाहणी केली असता मोटारसायकल चोरीला गेल्याचे आढळले.

# केंद्रीय गृह-सहकार मंत्री अमित शहा आज एकसंब्यात

## बिरेश्वर मुख्यालयाचे होणार उद्घाटन

चिक्कोडी,ता.१८(प्रतिनिधी)–

**केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा शनिवारी १९ रोजी एकसंबा येथे येणार आहेत.श्री बिरेश्वर को–ऑप. क्रेडिट सोसायटी च्या (मल्टीस्टेट) नूतन प्रशासकीय मुख्यालयाचे उद्घाटन व जाहीर सभेसाठी उपस्थित राहणार आहेत. एकसंबा येथे शनिवारी दुपारी १ वाजता आयोजित भव्य सोहळ्यात देशभरातील आणि महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा राज्यातील दिग्गज नेत्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्यासाठी या भव्य सोहळ्याचे संयोजक, जोल्ले ग्रुपचे संस्थापक, बेळगाव जिल्हा बँकेचे अध्यक्ष व माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले आणि जोल्ले ग्रुपच्या सहसंस्थापिका, निपाणीच्या आमदार शशिकला जोल्ले यांच्याकडून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा दौऱ्याची जोरदार तयारी केलेली आहे.**



एकसंबा येथील बिरेश्वर मुख्यालयाची इमारत.

कार्यक्रमास केंद्रीय शिक्षण आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, केंद्रीय अवजड उद्योग आणि पोलाद मंत्री एच.डी. कुमारस्वामी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, कर्नाटक भाजपचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र, विधानसभेचे विरोधी पक्षनेते आर. अशोक, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते सी. नारायणस्वामी आणि बेळगावचे खासदार व माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रम स्थळाच्या परिसरामध्ये आठ ठिकाणी वाहनाच्या पार्किंगची सोय करण्यात आली आहे.तसेच उपस्थितांना व्यासपीठावरील चित्रण पाहायला मिळावे यासाठी डिजिटल स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे.

# डीकेटीईच्या अभिनंदन माने याची इटलीत उच्च शिक्षणासाठी निवड



उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल अभिनंदन माने याचा सत्कार करताना डॉ.एल.एस.आडमुठे व इतर.

इचलकरंजी, ता.१८–

**डीकेटीईच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागातील अभिनंदन माने याची उच्च शिक्षणासाठी इटलीतील युनिर्व्हसिटी ऑफ नॅपल्स फेड्रिको–२ येथे स्कॉलरशिपवर निवड झाली आहे.विद्यापीठाचे क्युएस जागतिक क्रमवारीत ३७९ वे स्थान असून, अभिनंदनला विद्यापीठाकडून ७ लाख रुपयांची शैक्षणिक शिष्यवृत्ती तसेच राहण्याची सुविधा व विद्यावेतन मिळणार आहे. या निवडीमुळे डीकेटीईच्या विद्यार्थ्यांची परदेशात उच्च शिक्षण घेण्याची परंपरा कायम राहीली आहे.**

विशेष म्हणजे, परेदशी विद्यापीठातील प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया अभिनंदनने स्वतःच्या प्रयत्नांतून पूर्ण केल्याने या प्रक्रियेसाठी होणारा अतिरिक्त खर्चही त्याने वाचविला.

डीकेटीईमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरींग अभ्यासक्रमातील मेटॅलर्जी, मशिन टुल्स अॅड प्रोसेसिंग, वर्कशॉप प्रॅक्टीस, टूल इंजिनिअरींग मेकॅट्रॉनिक्स इंडस्ट्रीयल अॅटोमेशन, हायड्रॉलिक्स व न्युमॅटिक्स या विषयांचा त्याच्या शैक्षणिक प्रगतीला फायदा झाला. डीकेटीईचे जगभरातील ३२ हून अधिक आंतरराष्ट्रीय विद्यापीठाशी सामंजस्य करार असून, त्यातून विद्यार्थ्यांसाठी जागतिक उच्च शिक्षणाच्या संधीची दारे खुली झाली आहेत. परदेशात उच्च शिक्षणासाठी डीकेटीईने निर्माण केलेल्या संधीमुळे टेक्स्टाईल व इंजिनिअरींग क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटला आहे,असे गौरवोद्गार डॉ.सपना आवाडे यांनी काढले.संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ.सपना आवाडे,कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व विश्वस्त यांचे सहकार्य तर प्रा.डॉ.एल.एस.आडमुठे, प्रा.डॉ.व्ही. आर.नाईक, डॉ.व्ही.ए.कांबळे, प्रा.आर.डी.पाटील व अन्य प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.



हळदी येथे उपडाकघराच्या उद्घाटनप्रसंगी खा. धनंजय महाडिक, आ. चंद्रदीप नरके, रमेश पाटील व इतर.

# डिजिटल युगातही पोस्ट सेवेवरील विश्वास कायम : खा.महाडिक

हळदी, ता.१८ (प्रतिनिधी) –

**डिजिटल व्यवहारांचे युग आले असले तरी पोस्ट सेवेवरील नागरिकांचा विश्वास आजही कायम आहे. ब्रिटिशकाळापासून पोस्ट खात्याने विश्वासार्ह सेवा दिली असून, बदलत्या काळानुसार पोस्ट खात्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. त्यामुळे पोस्ट सेवा अधिक गतिमान झाली असून, खातेदारांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन खा.धनंजय महाडिक यांनी केले.**

करवीर तालुक्यातील हळदी येथील उपडाकघराचा शुभारंभ झाला. या उपडाकघराचा दहा पोस्ट ऑफिसअंतर्गत येणाऱ्या ४७ गावांतील नागरिकांना लाभ मिळणार आहे. हळदीला स्वतंत्र पिनकोड मिळाल्याने गावाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. या उपडाकघरामुळे परिसरातील नागरिकांना पोस्टाच्या विविध सेवा गावातच उपलब्ध होणार आहेत.

आ. चंद्रदीप नरके म्हणाले, पोस्ट सेवेवर नागरिकांचा मोठा विश्वास आहे. सुकन्या समृद्धी योजनेसह पोस्टाच्या विविध बचत योजना चांगल्या पद्धतीने सुरू आहेत. बदलत्या युगाची गरज ओळखून पोस्ट ऑफिसने कात टाकत आधुनिक स्वरूपात सेवा देणे गरजेचे आहे.प्रास्ताविकात डाक सेवा गोवा परिक्षेत्राचे निर्देशक रमेश पाटील यांनी, पोस्टाच्या विविध योजनांची माहिती दिली.

यावेळी नवीन खातेदारांना पासबुक तसेच नवीन आधारकार्डचे वितरण झाले. यावेळी हंबीरराव पाटील, नामदेवराव पाटील, बळी पाटील, सर्जेराव पाटील, प्रताप पाटील, बाजीराव पाटील, शिवाजी पाटील, ग्रामविकास अधिकारी अश्विनी पाटील, डाकघर अधीक्षक वैभव वाघमारे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व खातेदार उपस्थित होते.

# उंब्रजजवळ मालट्रकच्या केबिनला आग

## नागरिकांच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

कराड,ता.१८ (प्रतिनिधी)–

**पुणे–बंगळूर महामार्गावरून पुण्याहून कराडच्या दिशेने निघालेल्या मालट्रकच्या केबिनने उंब्रज परिसरात अचानक पेट घेतल्याने काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. आगीची तीव्रता वाढत असताना स्थानिक नागरिक, कराड अर्बन बँकेचे अधिकारी–कर्मचारी, युवक, पाण्याचा टँकर चालक आणि पोलिसांनी तातडीने मदतकार्य हाती घेतल्याने आग आटोक्यात आणण्यात आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.**



मालट्रक पुण्याहून कराडच्या दिशेने जात असताना उंब्रज परिसरात त्याच्या केबिनमधून अचानक मोठ्या प्रमाणात धूर येऊ लागला. काही क्षणांतच केबिनने पेट घेतल्याचे निदर्शनास येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. आगीमुळे महामार्गावरील वाहतुकीवरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली. दरम्यान, कराड अर्बन बँकेच्या उंब्रज शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत बँकेतील अग्निशामक सिलिंडर घटनास्थळी आणले. त्याच्या सहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच पाण्याचा पुरवठा करून आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

आगीने अधिक तीव्र रूप घेतल्याचे लक्षात येताच साई राज अर्थमूव्हर्स व वॉटर सप्लायरचा पाण्याचा टँकर घटनास्थळी दाखल झाला. टँकरच्या सहाय्याने आगीवर पाण्याचा मारा करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात ठेवत महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.आगीमध्ये मालट्रकची केबिन जळून खाक झाली. ट्रकला आग लागण्याचे नेमके कारण तसेच ट्रकमधील मालाचे किती नुकसान झाले, याची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

## तिजोरीतील मोबाइल चोरट्याने लांबविला

कोल्हापूर ता.१८(प्रतिनिधी)

**घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून चोरट्याने घरात प्रवेश केला. तिजोरीत ठेवलेला मोबाइल चोरून नेल्याचा प्रकार प्रतिभानगर येथे घडला. याप्रकरणी अशोककुमार सोनारामजी मीना (वय २०, रा. प्रतिभानगर, कोल्हापूर) यांनी राजारामपुरी पोलिसांत फिर्याद दिली.**

मीना यांच्या घराचा दरवाजा उघडा होता. त्यावेळी चोरट्याने घरात प्रवेश करून तिजोरीत ठेवलेला मोबाइल लंपास केला. याबाबत राजारामपुरी पोलिसांत नोंद झाली आहे.

## मोपेडला धडक देऊन कार चालक पसार

कोल्हापूर, ता.१८(प्रतिनिधी)–

**मोपेडला धडक देऊन चालकास जखमी केल्यानंतर चारचाकी चालक वाहनासह पसार झाला. हा प्रकार राजारामपुरी सहावी गल्ली, माळी कॉलनी येथे घडला. याप्रकरणी अज्ञात चारचाकी चालकाविरुद्ध राजारामपुरी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.**

विनायक रामचंद्र आढाव (वय ४६, रा. लक्ष्मीनगर, रुकडी, ता. हातकणंगले) हे मोपेडवरून जात होते. त्यावेळी चारचाकीने त्यांच्या मोपेडला धडक दिली. या अपघातात आढाव जखमी झाले. धडकेनंतर चालक वाहनासह पसार झाला. आढाव यांच्या फिर्यादीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## महिलेची आत्महत्या

कोल्हापूर, ता.१८(प्रतिनिधी)

**निगवे दुमाला (ता.करवीर) येथे महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आशा भैरू मिसाळ (वय ४१) असे मृत महिलेचे नाव आहे.**

आशा मिसाळ यांनी शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास राहत्या घरातील तुळईला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतला. हा प्रकार निदर्शनास येताच नातेवाईकांनी त्यांना खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.


महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# ई–निविदा

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण विभाग – १ अंतर्गत उपविभाग कदमवाडी, परिते , पन्हाळा, कळे, कोडोली, गगनबावडा, फुलेवाडी व शाहुवाडी येथील RCI एल.टी.(शेतीपंप व्यतिरिक्त) व २० kw पेक्षा कमी भार असलेल्या लघुदाब ग्राहकांचे मासिक रीडिंग (मोबाईल पद्वारे/ IR/RF मीटर HHU व्दारे) वीज बिल प्रिंटींग व बिल वाटप कामाकरिता एक वर्षाच्या करारावरती नोंदणीकृत ठेकेदारांकडून खालीलप्रमाणे ई निविदा मागविण्यात येत आहे.

| उपविभाग | ई–निविदा क्र. | ई निविदा मुल्य रु. लाखात | ई निविदा शुल्क रु. | ई निविदा बयाना रु. |
|---|---|---|---|---|
| कदमवाडी | T–०४/२६–२७ | २१.०० | २९५०/– | २१०००/– |
| परिते | T–०५/२६–२७ | २७.०० | २९५०/– | २७०००/– |
| पन्हाळा | T–०६/२६–२७ | १२.०० | ११८०/– | १२०००/– |
| कळे | T–०७/२६–२७ | १९.०० | ११८०/– | १९०००/– |
| कोडोली | T–०८/२६–२७ | २८.०० | २९५०/– | २८०००/– |
| गगनबावडा | T–०९/२६–२७ | ६.०० | ११८०/– | ६०००/– |
| फुलेवाडी | T–१०/२६–२७ | ३०.०० | २९५०/– | ३००००/– |
| शाहुवाडी | T– ११/२६–२७ | ३८.०० | २९५०/– | ३८०००/– |

सदर ई–निविदा भरण्याची अंतिम तारीख दि.१८.०९.२०२६ @२३:५५ राहील. सविस्तर ई निविदा https://etender.mahadiscom.in/eatapp/ ह्या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. अधिक माहितीकरिता ग्रामीण विभाग – १, ७८७५७६९२०५ याचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

KOPZ-PRO- १८५ /२०२६-२७

कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग – १.

दैनिक महासत्ता
शनिवार, ता. १९ सप्टेंबर २०२६

SPORTS



**इचलकरंजी गणेश दर्शन** : १) संग्राम चौक कला, क्रीडा व सांस्कृतिक युवक मंडळाची श्रीकृष्ण सोबत मयूर विराजमान असलेली गणरायाची १९ फुटी मूर्ती. २) गोसावी गल्ली येथील डी. एम. बॉईज गणेशोत्सव मंडळाची २३ फुटी माशावर विराजमान असलेले विष्णू रूपातील गणेश मूर्ती. ३) रिंग रोडवरील गजवक्र मंडळाचा भव्य देखावा. ४) गजानन गणेशोत्सव मंडळ (गावभाग, कोरोची)ची आकर्षक मूर्ती. (छाया : छोटूसिंग, सारंग दास)

## नेमबाजांची निवासव्यवस्था ५० कि.मी.अंतरावर

नागोया,ता.१८–

**भारतीय नेमबाजांचे निवासस्थान आणि सरावाचे ठिकाण यांतील अंतर तब्बल ५० किलोमीटर आहे. संघाच्या वरिष्ठ प्रशिक्षकांनीच याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. साहजिकच नेमबाजांना सराव तसेच स्पर्धास्थळी ने–आण करण्यासाठी बराच वेळ लागत आहे.**

आम्ही अपेक्षा आणि सकारात्मक विचारांसह जपानमध्ये दाखल झालो. मात्र येथील व्यवस्था आणि व्यवस्थापन तसे नाही. यजमान देशाची प्रतिमा वेगळी आहे; पण प्रत्यक्ष आयोजन त्यास साजेसे वाटत नाही. भारतीय नेमबाज रेंजपासून ५० किलोमीटर दूर वेगवेगळ्या हॉटेलांमध्ये उतरले आहेत, असे भारताच्या प्रशिक्षकांनी सांगितले. भारतीय संघात दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेती मनू भाकर, आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदकविजेती ईशा सिंग यांच्यासारखे पदकाचे अनेक दावेदार आहेत. मात्र लांब पल्ल्याच्या प्रवासामुळे खेळाडूंना रोज थकवणाऱ्या प्रवासाला सामोरे जावे लागत आहे.खेळाडूंची सरावासाठी ने–आण हीच मोठी समस्या आहे; पण आपण काय करू शकतो? नेमबाजी रेंजच्या आसपास कोणतेही हॉटेल नाही. तसे हॉटेल असते, तर आम्ही आधीच तिथे पोहोचलो असतो. आम्हाला बरेच दूरचे हॉटेल देण्यात आले आहे, असेही प्रशिक्षक म्हणाले.

## बांगलादेशसोबतचा सामना रद्द झाल्यास भारत थेट अंतिम फेरीत

नवी दिल्ली,ता.१८–

**आशियाई क्रीडाच्या क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघ उपांत्य फेरीत पोहोचला आहे. नागोया येथील कोरोबोगेई स्पोर्ट्स पार्कमध्ये खेळल्या गेलेल्या चौथ्या उपांत्यपूर्व सामन्यात भारताने जपानचा ८ गडी राखून धुव्वा उडवत उपांत्य फेरीत स्थान मिळवले.अंतिम फेरी गाठण्यासाठी भारताचा सामना २० रोजी उपांत्य फेरीत बांगलादेशशी होणार आहे.**

भारत –बांगलादेश यांच्यातील बाद फेरीचा सामना मुसळधार पावसामुळे रद्द झाल्यास भारतीय संघ थेट अंतिम फेरीसाठी पात्र ठरेल. उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी कोणताही राखीव दिवस ठेवण्यात आलेला नाही. जर सामना पूर्णपणे पावसामुळे रद्द झाला आणि डकवर्थ–लुईस नियमासाठी आवश्यक असलेली किमान षटकेसुद्धा खेळता आली नाहीत, तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील उच्च रँकिंग आणि स्पर्धेतील उच्च सीडिंग असलेला संघ विजेता घोषित केला जातो.

# बॉर्डर–गावस्कर ट्रॉफीच्या वेळापत्रकात बदलाची शक्यता

## भारत–ऑस्ट्रेलियामध्ये २१ जानेवारीपासून कसोटी मालिका

नवी दिल्ली,ता.१८–

**जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यातील स्थानाच्या दृष्टीने भारतीय संघासाठी ऑस्ट्रेलियाविरुद्धची आगामी कसोटी मालिका अत्यंत महत्त्वाची आहे. २१ जानेवारी ते ३ मार्च २०२७ या कालावधीत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जाणाऱ्या या प्रतिष्ठित बॉर्डर–गावस्कर ट्रॉफीच्या प्रस्तावित वेळापत्रकात मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथ्या सामन्याचे यजमानपद रांचीच्या जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियमला गमवावे लागू शकते, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे.**



जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात भारताच्या पूर्व भागात सूर्य खूप लवकर मावळतो, ज्यामुळे प्रकाशाची मोठी कमतरता निर्माण होते. अशा परिस्थितीत, कसोटी सामन्यात दररोज अनिवार्य असणारा पूर्ण ९० षटकांचा खेळ आयोजित करणे हे व्यवस्थापनासमोर मोठे आव्हान ठरू शकते.पूर्व भारतातील रांचीमध्ये फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात (१९–२३ फेब्रुवारी) सायंकाळी ४:३० ते ५:०० च्या दरम्यान अंधार पडतो. यामुळे केवळ खेळण्याचा वेळच कमी होत नाही, तर खेळ न झाल्यामुळे सामना अनिर्णित राहण्याचा धोकाही मोठ्या प्रमाणात वाढतो.

अतिथंडीमुळे रांचीमधील खेळपट्टी भारतीय फिरकी गोलंदाजीच्या रणनीतीसाठी फारशी अनुकूल नसेल, असा अंदाज आहे. परिणामी, संघ व्यवस्थापनाने हा सामना रांचीऐवजी अशा ठिकाणी हलवण्याची शिफारस केली आहे, जिथे सूर्यप्रकाश आणि थंडीची फारशी अडचण येणार नाही. या सामन्याच्या यजमानपदासाठी सध्या विशाखापट्टणम, हैदराबाद किंवा राजकोट ही शहरे प्रबळ दावेदार मानली जात आहेत.

दरम्यान, मालिकेतील तिसरा कसोटी सामना ११ ते १५ फेब्रुवारी दरम्यान आसाममधील गुवाहाटी येथे होणार आहे. ईशान्य भागातच असलेले गुवाहाटी आपले यजमानपद कायम ठेवण्याची शक्यता आहे, कारण तेथे वेन्यू बदलला जाणार नाही. तथापि, थंडी आणि अंधाराचा विचार करता गुवाहाटी कसोटी सामन्याची वेळ बदलली जाऊ शकते आणि हा सामना नेहमीपेक्षा अंदाजे ३० मिनिटे लवकर सुरू केला जाऊ शकतो.

**बॉर्डर–गावस्कर ट्रॉफी २०२७ : – पहिली कसोटी २१–२५ जानेवारी दरम्यान नागपूर येथे होईल. दुसरी कसोटी २९ जानेवारी २ फेब्रुवारी दरम्यान चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर होईल.तिसरी कसोटी ११–१५ फेब्रुवारी दरम्यान गुवाहाटी येथे होणार असून सामन्याच्या वेळेत बदल होऊ शकतो. चौथी कसोटी १९–२३ फेब्रुवारीदरम्यान रांची येथे होणार असली तरी अतिथंडीमुळे येथील सामन्याचे ठिकाण बदलण्याची दाट शक्यता आहे.पाचवी कसोटी २७ फेब्रुवारी ३ मार्च दरम्यान अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होईल.**

# जपानवर दणदणीत विजयासह भारताची उपांत्य फेरीत धडक

## शेफाली वर्माची नाबाद ४० धावांची खेळी

नवी दिल्ली,ता.१८ –

**हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाने अपेक्षेप्रमाणे दमदार कामगिरी करत एशियन गेम्स–२०२६ची विजयी सुरुवात केली.भारतीय संघाने शुक्रवारी जपानचा एकतर्फी सामन्यात ८ विकेट्सनी पराभव करत विजयासह उपांत्य फेरीतही प्रवेश केला आहे. भारतीय संघाला थेट उपांत्यपूर्व फेरीतून खेळण्याची संधी मिळाली होती.**



भारताने नाणेफेक जिंकून जपानला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले.जपानने सावध आणि संथ सुरुवात केली. मात्र, पॉवरप्लेमध्ये त्यांनी एकही विकेट गमावली नाही.त्यामुळे जपानचा संघ चांगली धावसंख्या उभारेल,असे वाटत होते. मात्र,सातव्या षटकापासून जपानच्या विकेट्स झपाट्याने पडू लागल्या.अखेर २०व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर जपानचा शेवटचा फलंदाज बाद झाला आणि संपूर्ण संघ अवघ्या ५७ धावांवर गारद झाला.

भारताने ५८ धावांचे सोपे लक्ष्य अवघ्या पाच षटकांत दोन विकेट्स गमावून गाठले. भारताला पहिली विकेट श्रीचरणीने मिळवून दिली.सातव्या षटकातील दुसऱ्या आणि तिसऱ्या चेंडूवर सलग दोन विकेट्स घेत तिने जपानच्या फलंदाजीला खिंडार पाडले.जपानच्या केवळ दोन फलंदाजांना दुहेरी आकडा गाठता आला. त्यापैकी अयाका काटो स्टॅफर्डने सर्वाधिक २५ धावा केल्या. तिची सलामीची साथीदार हारुना इवासाकीला १० धावा करता आल्या.

भारताकडून श्रीचरणीने चार षटकांत अवघ्या १० धावा देत दोन षटके निर्धाव टाकली आणि चार विकेट्स घेतल्या. शेफाली वर्माने दोन विकेट्स घेतल्या. श्रेयंका पाटील आणि दीप्ती शर्माच्या खात्यात प्रत्येकी एक विकेट आली. जपानच्या दोन फलंदाज धावबाद झाल्या.मात्र, जपानच्या गोलंदाजांनी भारताच्या दोन विकेट्स मिळवत काही काळ भारतीय संघाला धक्का दिला. या दोन विकेट्स घेतल्यानंतर जपानच्या संपूर्ण संघाचा आनंद गगनात मावत नव्हता.

स्मृती मानधनाच्या जागी शेफाली वर्मासोबत डावाची सुरुवात करण्यासाठी आलेली गुणालन कामिलिनी दुसऱ्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर खाते न उघडताच बाद झाली. त्यानंतर भारती फुलमाळीही तिसऱ्या षटकातील चौथ्या चेंडूवर तंबूत परतली. दुसऱ्या बाजूला शेफाली वर्मा मात्र आक्रमक अंदाजात फलंदाजी करत राहिली. तिने १५ चेंडूंमध्ये ६ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ४० धावा कुटल्या. त्यानंतर ऋचा घोषने षटकार ठोकत भारताचा विजय निश्चित केला. ऋचा ६ चेंडूंमध्ये २ षटकारांच्या मदतीने १२ धावा करून नाबाद राहिली.

# भारताकडून इंडोनेशियाचा पराभव

## बुद्धिबळ ऑलिम्पियाड : महिला संघाचा फिनलंडवर विजय

समरकंद,ता.१८ –

**बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या दुसऱ्या फेरीत भारताने खुल्या आणि महिला अशा दोन्ही गटांत विजय मिळवला. खुल्या गटात भारताला इंडोनेशियाविरुद्ध २.५–१.५ असा विजय मिळवण्यासाठी झुंज द्यावी लागली, तर महिला संघाने फिनलंडचा ३.५–०.५ असा पराभव करत सहज विजय नोंदवला.**

पहिल्या फेरीत विश्रांती देण्यात आल्यानंतर पुनरागमन करणाऱ्या आर. प्रज्ञानानंदने इंडोनेशियाच्या सुशांतो मेगारांतोविरुद्ध काळ्या सोंगट्यांनी पहिल्या पटावर प्रदीर्घ सामना खेळला. सामना एंडगेमपर्यंत पोहोचला आणि ७९ चालींनंतर दोन्ही खेळाडूंनी बरोबरी मान्य केली. निहाल सरीनने भारताला पहिला विजय मिळवून दिला. पांढऱ्या सोंगट्यांनी आयएम आरिफ अब्दुल हाफिजविरुद्ध खेळताना निहालने हळूहळू दबाव वाढवला आणि अंतिम टप्प्यात सामरिक आघाडी मिळवली. ३७. एनसी ५+ नंतर हाफिजने सामना सोडून दिला. ऑलिम्पियाडमधील निहालचा हा सलग दुसरा विजय ठरला.डी. गुकेशला काळ्या सोंगट्यांनी आयएम सात्रिया दुटा चहायाविरुद्ध विजयाचा मार्ग मिळाला नाही. स्थिती साधी झाल्यानंतर गुकेशने सलग क्वीन चेकच्या माध्यमातून सामना बरोबरीत राखला आणि ५१. क्यूडी+ नंतर सामना ड्रॉ झाला.विदित गुजराती आणि आयएम नायका बुधिधर्मा यांच्यातील सामनाही बरोबरीत संपला.



महिला गटात भारताने फिनलंडविरुद्ध ३.५–०.५ असा विजय मिळवला. कोनेरू हम्पीला या फेरीत विश्रांती देण्यात आल्याने वैशाली रमेशबाबूने पहिल्या पटावर मोर्चा सांभाळला. तिला अनास्तासिया केइनानेनने कडवी झुंज दिली. ८८ चालींनंतर सामना बरोबरीत सुटला. उर्वरित तीनही पटांवर भारताच्या खेळाडूंनी विजय मिळवला. दिव्या देशमुखने जोहाना पासिकांगस–तेल्लाचा ३८ चालींत पराभव केला. वंतिका अग्रवालने सर्वात वेगवान विजय नोंदवत सारा–ओलिव्हिया सिप्पोलाचा अवघ्या २२ चालींत पराभव केला.

# अवैध तिकीट विक्री प्रकरणी १९ जणांना बेड्या

## भारत–अफगाणिस्तान मालिके दरम्यान पोलिसांची कारवाई

नवी दिल्ली,ता.१८–

**भारत विरुध्द अफगाणिस्तान टी–२० मालिका झाली, ज्यात भारतीय संघाने ३–० ने विजय मिळवला. या मालिकेदरम्यान, दिल्ली पोलिसांनी क्रिकेट सामन्यांच्या तिकिटांच्या काळाबाजारावर कारवाई करत एक मोठे यश मिळवले.अरुण जेटली स्टेडियमच्या परिसरात अवैध तिकीट विक्री प्रकरणी १९ जणांना अटक करण्यात आली.**

भारत विरुद्ध अफगाणिस्तान मालिकेदरम्यान, दिल्ली पोलिसांनी अवैध तिकीट विक्री आणि पुनर्विक्रीवर कारवाई करण्याच्या उद्देशाने तीन दिवसीय विशेष मोहीम राबवली. तिकिटांच्या काळाबाजारासाठी तेरा एफआयआर नोंदवण्यात आले. अटक केलेल्या १९ आरोपींकडून ७१ क्रिकेट सामन्यांची तिकिटे आणि ७,४०० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. पोलिसांनी गुप्त माहिती, छुपी पाळत आणि बनावट ग्राहक म्हणून वावरत अवैध तिकीट विक्रीची पुष्टी केली. दिल्ली गेट मेट्रो स्टेशन, एमजी रोड, बीएसझेड रोड आणि जेपीएन पार्क यांसारख्या स्टेडियमजवळील परिसरात विशेष दक्षता वाढवण्यात आली होती.


पोलिसांच्या म्हणण्यानुसार, काही आरोपी कमी किमतीत तिकीट मिळवून ते प्रेक्षकांना जास्त किमतीत विकण्याचा प्रयत्न करत होते. साधारणपणे, जेव्हा अधिकृत वेबसाइटवर तिकिटे विकली जातात, तेव्हा लोक सामना पाहण्यासाठी कोणतीही रक्कम मोजायला तयार असतात. काळाबाजार करणारे याच प्रेक्षकांना लुटतात.


# श्री गौरी पूजन निमित्त श्री विठ्ठल–रुक्मिणी, महालक्ष्मी मातेस पारंपरिक सुवर्ण अलंकार

पंढरपूर,ता.१८ (प्रतिनिधी)–

**श्री गौरी पूजन निमित्त श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल, रुक्मिणी माता व महालक्ष्मी मातेस आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. सुवर्ण अलंकारांनी सजलेले तिन्ही देवतांचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी तसेच दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी झाली.**

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, पितांबर, कौस्तुभ मणी, दंडपेट्या व हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा व शिरपेच, मत्स्य जोड, विविध पदरी माळा, लॉकेट, मोहर माळा, पुतळ्याची माळ, जवेची माळ, तुळशीची माळ, एकदानी व चंद्रहार आदी अलंकार परिधान करण्यात आले आहेत. रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या व तोडे जोड, तारवड जोड, चिंचपेटी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची व पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा आदी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, मोत्याची कंठी एक पदरी, चंद्रहार पाच पदरी, लक्ष्मी पेंडल लॉकेटसह, तांदळ्या





हार सात पदरी, अष्टपैलू मण्याची कंठी आठ पदरी, नेकलेस आदी अलंकारांनी सजविण्यात आले आहे, अशी माहिती श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

**या पारंपरिक अलंकारांमुळे श्री विठ्ठल, रुक्मिणी माता व महालक्ष्मी मातेचे रूप अधिकच मनोहारी, तेजस्वी व भक्तिमय दिसत असून, हे विलोभनीय रूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.**

# निवड समितीसंदर्भात निर्णय होणार

## बीसीसीआयच्या शताब्दी वर्षाच्या तयारीला प्रारंभ

मुंबई,ता.१८–

**भारतीय क्रिकेट नियामक बोर्डाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी झाली. बैठकीत निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यासह बोर्डाच्या शताब्दी वर्षाच्या तयारीबाबतही माहिती देण्यात आली.**

दरम्यान, निवड समितीचे अध्यक्ष आगरकर यांचा कार्यकाळ ६ ऑक्टोबर २०२६ ला संपणार आहे.निवड समितीबाबत निर्णय घेण्यासाठी काही पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती बैठकीनंतर बीसीसीआयच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने प्रसारमाध्यमांना दिली. बीसीसीआयच्या ९५ व्या एजीएममध्ये विविध राज्य क्रिकेट संघाच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता.या बैठकीत बंगाल क्रिकेट असोसिएशनचे प्रतिनिधी सौरव गांगुली आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचे प्रतिनिधी व्यँकटेश प्रसाददेखील उपस्थित होते.

वरिष्ठ निवड समितीच्या अध्यक्षांच्या निवडीशिवाय बीसीसीआय ज्यूनियर निवड समितीची सर्व पाच पदे भरण्याच्या प्रक्रियेबाबतही विचार करत आहे. यादरम्यान मुंबई क्रिकेट असोसिएशनने बोर्डाकडे काही प्रमुख सामन्यांवेळी मुंबईचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा अशी विनंती केली आहे. वानखेडे स्टेडियममध्ये मागील दोन वर्षांपासून कोणताही कसोटी सामना खेळवला गेला नाही. येथे मागील अखेरचा कसोटी सामना २०२४ च्या अखेरीस न्यूझीलंडविरुद्ध खेळवला गेला होता. वानखेडेमध्ये पुढील वर्षाच्या सुरुवातीला पहिल्यांदा होणाऱ्या महिला चॅम्पियन्स लीग व महिला प्रीमियर लीगच्या काही सामन्यांचा समावेश आहे.

**२०२८ मध्ये पार पडणाऱ्या बीसीसीआयच्या शताब्दी वर्षाच्या आयोजनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. हे शताब्दी वर्ष डिसेंबर २०२७ ला सुरू हात असून २०२८ पर्यंत वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरे केले जाणार आहे. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात हा एक महत्त्वपूर्ण क्षण ठरणार आहे.**

## संजूला संघातून वगळणे कठीण निर्णय होता

नवी दिल्ली,ता.१८–

**वैभव सूर्यवंशीचा टी २० संघात अंतिम अकरात समावेश करण्यात यावा यासाठी चाहत्यांकडून, माजी खेळाडूंकडून दबाव असताना प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी मात्र वैभवला संधीची प्रतीक्षा करावी लागेल असे म्हटले आहे.**

गेल्या दीड ते दोन वर्षांपासून संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा ही जोडी सलामीवीराच्या भूमिकेत आहे. या जोडीच्या झंझावाती खेळाच्या बळावरच भारतीय संघाने टी२० वर्ल्डकप जिंकला. मात्र वर्ल्डकपनंतर संजूला मोठी खेळी करता आलेली नाही. संजूऐवजी वैभवला संधी मिळाली अशी मागणी केली जात आहे. वैभवने आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक धावा करत ऑरेंज कॅप पटकावली होती.